# श्री नाथलीलामृत

## श्री संत एकनाथ महाराज यांचे ओविबद्ध चरित्र



लेखक : कै. वासुदेवराव देव महाराज, टेंभूर्णीकर

प्रस्तावना

डॉ. सौ. कुमुद गोसावी
स्नेहकुंज, सरस्वती कॉलनी पूर्व, औरंगाबाद
दूरध्वनी : ०२४० - २३३४२९०

**निमित्त श्री नाथलीलामृत - श्री संत एकनाथ महाराज यांच्या ओवीबद्ध चरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचं**

मराठी सारस्वतातील संत चरित्रांचं समृद्ध दालन मोठ लक्षणीय आहे. त्यातील संत चरित्रं समाजाला सत्प्रेरणा देत, नवऊर्जा चेतवत दिशादर्शक ठरली आहेत म्हणून तर आज एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या लाटेवर हिंदोळतानाही श्री नाथलीलामृत या नाथचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचा प्रकाशन योग येत आहे. वै. देवमहाराजांची ही ओवीबद्ध रचना अत्यंत प्रासादिक आहे.

ओवी ही तर मराठी वाङ्मयाची गंगोत्री, आस्वादकाशी अंतरीचं गुज सांगणारी म्हणून तर देव महाराजांनी तिचीच निवड केली. नि पैठणच्या युगसंजीवक नयनदर्शी नाथचरित्राची अतिशय अभ्यासपूर्वक गुंफण केली. निवडक प्रसंग-चित्रणातून श्रीनाथलीला जनता जनार्दनाच्या अंतरंगापर्यंत पोचतील याची सर्वार्थानं काळजी वाहिली. अवघ्या अकरा अध्यायांतून नाथ-चरित्रकथा चितारताना

त्यातील महत्त्वाचे धागे सुटू न देता आवश्यक जागी जरतारी वीणही घातली. त्यामुळे ही चरित्ररूपी पैठणी रसिकांना भावल्यामुळेच ती पुन:श्च एकवार आपल्या भेटीला येत आहे. देव महाराजांनी अत्यंत बहारदार उपमा, दृष्टान्तांची बेलबुट्टी तिच्यावर काढली आहे.

**तरी तु माझिया निमित्तेची जाण । माये हे चरित्र करावे पूर्ण । तु जे का बोलविशी बोल म्हणून । तेचि मी लिहीन निश्चये ।।१.६।।**

या चरित्रातील पहिल्या अध्यायातील शुभारंभी सरस्वती वंदनाच अशी बोलकी झालेली आहे की त्यातून लेखकाच्या प्रांजळ भूमिकेसह पुढील गतीची कल्पना येते. चरित्रासंबंधी वाचकांच्या मनातील उत्कंठा वाढत जाते. त्या जिज्ञासेनं पुढील वाचनासाठी गती प्राप्त होते, तिच्यातील रसाळता मनाला भावते.

प्रस्तुत पहिल्या अध्यायातील संत भानुदास महाराजांच्या (नाथांचे पणजोबा) चरित्र मागोव्याची लाभलेली पार्श्वभूमी श्री नाथलीलामृताच्या पुढील कथनाला अत्यंत साजेशी आहे. कारण संत भानुदासांनी आपल्या प्रबळ भक्तीनं जर पंढरीचा पांडुरंग विजयनगरहून पंढरपूरला परत आणला नसता तर समस्त वारकऱ्यांना त्यांच्या जीवीचा जीवलग विठोबा कसा भेटला असता? आषाढी कार्तिकी वारीचा अनुपम जीवनानंद कसा लुटता आला असता? त्यादृष्टीनं पाहता लेखकाची चरित्र रचनेतील दृष्टी कशी व्यापक, सर्वस्पर्शी आहे हे ध्यानी येतं.

**हाची आमुचा चरित्र नायक । भानुदास कुळीचा कुळदीपक । जेणे प्रपंच परमार्थाचे रूप एक**

। प्रत्यक्ष करूनिया दाविले ।।१.३६।।

या प्रमाणे आपण नाथांसारख्या चरित्रनायकाची निवड का केली? याचं मध्यवर्ती सुत्रही लेखक कवीनं प्रारंभीच सांगून ठेवलं आहे. प्रपंच आणि परमार्थ यांना एकरूप देणाऱ्या एकनाथांचं चरित्र कथन प्रापंचिकांना अधिक आपलसं वाटावं, त्यातून त्यांनी आत्मकल्याण साधावं त्यासाठीच हा चरित्र रचना प्रपंच !

नाथ गुरूगृही देवगिरीगडावर किल्लेदार संत जनार्दन स्वामीकंडं असताना घडलेल्या प्रसंगवर्णनातूनही चरित्र-नायकाच्या लीला रंगवण्यातही रचनाकारांनी जीवनादर्शांना विशेष स्थान दिलेलं दिसून येतं. लोकांनी त्यातून बोध घ्यावा ही लोककल्याणाची भूमिका त्यात अंतर्भूत आहेच.

चमत्काराशिवाय नमस्कार केला जात नाही. या गृहित तत्त्वानुसार देवमहाराजांनीही नाथ चरित्रातील अद्‌भूत घटनांचं चित्रण आपल्या या रचनेत केलं असलं तरी ते कुठंही अतिरंजीत होणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली आहे. त्यामुळे नाथचरित्राचं वास्तव दर्शन घडतं. मग तो नाथांनी आपल्या सद्‌गुरूची - किल्लेदार संत जनार्दनस्वामींची. साधना समाधी भंग होऊ नये म्हणून त्यांचाच योद्धयाचा वेश अंगावर चढवून नि त्यांचीच शस्त्रं - तलवार हाती घेऊन त्यांच्याच घोड्यावर स्वार होऊन जो लढा दिला त्याचेही चित्रण करताना देव महाराजांनी वास्तवाचं भान राखलं आहे.

**परचक्री होऊन हल्लकल्लोळ । हाणाहाण सवेची जाहली ।।**

असा अल्पवयातच नाथांवर युद्धाचा प्रसंग आला असताना त्यांनी आपल्या सद्‌गुरूंची समाधी-साधना भंग पाऊ नये म्हणून त्यांच्याच युद्ध वेशातून समर्थ लढा देत विजय प्राप्त केला । त्याची संगती लावताना रचनाकार म्हणतात.

**श्रोते ऐकावे ते सावधान । ऐसे व्हावया काय कारण । तरी गुरूशिष्या माजी ते दुजेपण । किंचित काही ते नसेची ।।३.७७।।**

असा गुरू-शिष्यातील अभेदभाव सर्वथैव अनुसरणीय आहे. हेच या रचनेतून समाजमनावर रचनाकारला बिंबवायाचे आहे, हे स्पष्ट होतं. या प्रसंगातून भक्ती आणि शक्ती यांचा सुरेल संगम सहज साधला गेला आहे. असे अत्यंत अर्थवाही प्रसंगचित्रण या चरित्रग्रंथाच्या पुढील सर्वच अध्यायांतून आलेलं आहे. ९ व्या अध्यायातून आलेल्या या प्रसंगातून नाथांना उमीचंद सावकारानं कर्जफेडीसाठी घातलेली शपथ (पृ. ५०), श्रीखंड्यारूपानं साक्षात भगवंतानं अर्धरात्री जाऊन केलेली रूपयांची कर्जफेड नि पांडुरंगाची आण म्हणून नाथांनी दोन दिवस केलेला अन्नत्याग सारंच विलक्षण परंतु तरीही अर्थवाही । सर्वसामान्यजनांना भक्त आणि भगवंत यांच्यातील जवळीकेतेचं नातं सांगणारा हा प्रसंग होय.

**द्रव्य घेऊन मी कागद दिधला । पुसाकी तुमच्या श्रीखंड्याला ।** असं दुसरे दिवशी येऊन सावकार नाथांना सांगतो त्यावेळी नाथांना सत्य जाणून म्हटलं,

**प्रत्यक्ष पांडुरंग येऊन भेटला । भाग्य तुझे म्हणोनिया ।।** घडलेला प्रकार उमगताच उमीचंद नाथांना शरण येतो, भक्तीमार्गी लागतो अशा या नाथलीलांच्या दर्शनानेही लोकांनी स्वार्थाच्या जाळातून बाहेर यावं. भगवदभक्तीत रमावं, आयुष्याचं सोनं करून घ्यावं. यासाठी तर हे नाथलीला दर्शन.

अकराव्या अध्यायातून देव महाराजांनी चितारलेलं नाथ समाधिवर्णन तर कमालीचं हृदय हेलावून सोडणारं तरीही खूप काही सांगून जाणारं, अर्थगर्भ प्रत्ययकारी असंच. नाथांनी अखेरचं किर्तन करून गोदामातेच्या कुशीत शिरून जलसमाधी घेतली.

**लोक हंबर्डा फोडती नाथा पाहून । म्हणती देव तो आमुचा चालिला ।।११.३१।।**

या प्रसंग चित्रणातून नाथांनी अखेरच्या श्वासापर्यंत अनेका लोकोत्तर, लोककल्याणकारी व युगप्रवर्तक कार्य केलं त्याची पावतीच मिळते. म्हणून तर ते लोकनाथ ठरले. आपल्या पाऊणलाख वाङ्मयरचनेतून अखंड साद घालत राहिले. त्यातूनच अशी **सगुण चरित्रे, परमपवित्रे सादर वर्णावी** या भावनेनं रचली जातात. रसिक वाचकांकडून आस्वादली जातात. त्यांच्या अनेक आवृत्त्याही निघतात. तेव्हा प्रस्तुत **श्रीनाथलीलामृत** या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचंही समस्त वाङ्मयप्रेमी, रसिक वाचक स्वागतच करतील असा नाथचरणी प्रार्थनापूर्वक जोगवा मागते. कै. वासुदेवराव देव महाराजांच्या पावन स्मृतीला वंदन करते.

## श्री नाथलीलामृत

## ।। अध्याय १ ।।

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गुरूभ्योनमः । श्रीगोपाळकृष्णायनमः । जय जयाजी पार्वतीनंदना ।। विघ्ननाशका गजवंदना । ग्रंथारंभी तुज मूषकवाहना । वंदन सद्भावें करीतसे ।।१।। तुझे करिताची बाप्पा स्मरण । विघ्नें पळती रानोरान । आता ग्रंथ व्हावयालागी पूर्ण । बुद्धिदाता होई तूं ।।२।। घेऊनिया तुझे आशीर्वचन । मागुता वंदीन सरस्वति लागून । माता तू मी तव बालक पूर्ण । ओसंगा निज कृपे घेईका ।।३।। मी तो असे हा बुद्धिहीन । नेणें भक्ति ना ज्ञान । तरि तूं जिव्हाग्री राहून । चरित्र बोलवी दयाळे ।।४।। तुझी कृपा जहालिया वरी । मग लेखनाची काय ती थोरी । ऐसा विश्वास ठेवूनी अंतरी । ठाण मांडूनिया बैसलो ।।५।। तरी तू माझिया निमित्तेची जाण । माझे हे चरित्र करावे पूर्ण । तू जे का बोलविशी बोल म्हणून । तेचि मी लिहीन निश्चये ।।६।। आता वंदीन कुळ दैवता । नृसिंह अवतार प्रसिद्ध चवथा । रक्षावया निजभक्ता । स्तंभी प्रगट जहालाशी ।।७।। ऐसा भक्त सखा तू निर्धारी । दैत्यांतका नरहरी । मस्तक ठेविले चरणावरी । कृपा दृष्टी रक्षीकीं ।।८।। तोची आठव होता चित्ती । प्रत्यक्ष देखीली सद्गुरू मूर्ती । दृष्टि देखाताचि अति प्रीती । पायीं मिठी घातिली ।।९।। काकासाहेब सद्गुरूनाथ । परंपरा यांची जी म्हणवित । त्या माजी श्रीगुरू रंगनाथ । स्वामी माझा असेकीं ।।१०।। मूळ पुरूषापासूनी समस्तां । दंडवत घालीन प्रीती आता । किं जो जो दृष्टी पदार्थ पहाता । तुजविण आन नसेची ।।११।।

असो ज्याचे उदरिं पावलो जनन । आणिक सृष्टि ही देखिली जाण । तैसाचि हा आजि सूदिन । ज्याचेनि देखिला ।।१२।। ऋग्वेदि द्विजकुळ भूषण । पिता माझा लक्ष्मण । माता ती सुंदराबाई जाण । प्रेमे वंदिली उभयता ।।१३।। व्यास वाल्मीकादि करूनी । वसिष्ठ आणि गौतम मुनी । जे का श्रेष्ठ कवि या त्रिभुवनी । महिमा अद्भूत जयाचा ।।१४।। त्या सकळाचे चरणी माथा । ठेवूनी होईन त्या प्रार्थिता । कार्य सिद्धी तत्त्वता । व्हावी व्हावी म्हणऊनी ।।१५।। तुम्ही सकळ श्रोतेजन । प्रत्यक्ष दिसता कीं श्रीहरि समान । तुमची चरण धुळी ती शिरी वंदून । कार्यारंभ करीन मी ।।१६।। मज देखुनिया मंदमती । वीट न मानावा आपुले चित्ती । वदविता असे तो जगत्पति । मी तो निमित्तमात्र असेची ।।१७।। त्याचा वरद हस्त शिरी म्हणून या पुर्वी नवरत्नादि ग्रंथाचे लेखन । जहाले असे जे विदित पूर्ण । तुम्हा लागी असेची ।।१८।। असो संत चरित्रे परम पावन । श्रवणेंचि तात्काळ जाय अज्ञान । मग तो सर्वची जनीं जनार्दन । ऐसे प्रत्यय येतसे ।।१९।।
दुर्लभ असे संत दर्शन । म्हणूनिया करावे चरित्रावलोकन । प्रत्यक्ष दर्शन आणि अवलोकन । फळ एकची निश्चये ।।२०।। प्रपंच अवघाची दु:खरूप पूर्ण । येथे न घडेची परमार्थ साधन । यालागी प्रपंच सांडावा मुळीहून । तरीच परमार्थ नेटका ।।२१।। ऐशिया विचारे ची प्रपंच त्यागिती । बाह्यात्कारें परमार्थी लागती । परी संसारी मन निश्चती । राहे, न निघेची सर्वथा ।।२२।। बंध मोक्षासी जे जाण । एक असे मनची कारण । ऐसे आहे शास्त्र वचन । असत्य नोहेची सर्वथा ।।२३।। अनेक जन्मीचे जे संस्कार । जीवा पाठी असती ते साचार । यालागी न सुटे तो संसार

। काही केलिया निश्चये ।।२४।। परमार्थ साधावया पाही । संसार हा सांडावा लागत नाही । संसारी असुनीया तो परमार्थ पाही । सहज साधेची निश्चये ।।२५।। जेणें प्रपंच करूनी परमार्थ साधिला । ऐसा क्वचितचि सापडे विरळा । धन्य तोची त्यानें उभय कुळाला । सहजा सहजी उद्धरिले ।।२६।। आता होऊनीया सावधान । श्रवण करावे ते चरित्र येथून । जेणें प्रपंची राहूनी परमार्थ साधन । सहजा सहजी साधिले ।।२७।। ऐसा तो महाराज भानुदास कुळी । प्रत्यक्ष अवतरलासे वनमाळीं । आदर्श आम्हां जडजीवा सकळी । उद्धरिले जेणें निज कृपे ।।२८।। प्रतिष्ठान नामे पुण्यपुरी विख्यात असे गोदातीरी । शास्त्री पंडित तैसे सदाचारी । असंख्य वसती येथेची ।।२९।। ऐशा या पुण्यक्षेत्री जाण । देशस्थ ऋग्वेदि एक ब्राह्मण भानुदास ऐसे त्या नामाभिधान । शके तेराशे सत्तरीं जहाल से ।।३०।। याचे उदरीं चक्रपाणी नामे सुपुत्र जहालासे हरिभक्त थोर । चक्रपाणीं लागी साधार । सुपुत्र एक जहालासे ।।३१।। नामे सूर्यनारायण तयासी म्हणतीं । केवळ सात्त्वींकांचीं ते प्रत्यक्ष मूर्ती । सदा सर्वकाळ तो ईश्वरभक्ति । करूनिया प्रपंची वर्ते जो ।।३२।। पुढे शके चवदाशे पस्तीशी । पुत्र जहालासे त्या गुणराशी । निधान सापडावे दरिद्रयाशी । तैसे पितयासी जहाले ।।३३।। परी जन्म काळी मूळ नक्षत्र म्हणून । माता पिता गेली निजधामा लागून । आजा आजी करीती संगोपन । बाळाचे त्या निज प्रीती ।।३४।। भानुदास कुळी हा एकटाची जाण । एकनाथ ठेविले नामानिधान । पितामह त्या प्रीति ऐक्याची म्हणून । हाक मारी ती सर्वदा ।।३५।। हाची आमुचा चरित्र नायक । भानुदास कुळीचा कुळदीपक । जेणें प्रपंच परमार्थांचे रूप

एक । प्रत्यक्ष करूनिया दाविले ।।३६।। आता सिंहावलोकनें करून । मागील पहावे अनुसंधान । भानुदासाचे उपनयन । यथा समयी जहालेसे ।।३७।। उपनयन संस्कार होताची जाण । बटूनें करावे तें वेदाध्ययन । म्हणूनिया भानुदासा लागून । पित्यानें ठेविले गुरूगृही ।।३८।। परी भानुदासाचे लक्ष परमार्थीं । वेदाध्ययन नावडे त्याचे चित्तीं । पुत्राते देखुनिया ऐशा रीति । पिता क्षोभे सहजची ।।३९।। म्हणें नावडे यासी वेदाध्ययन । कणव उपाय योजावा यालागून । धाकदपट प्रसंगी ताडण । करूनिया व्यर्थची सर्वहि ।।४०।। पुत्राचे देखुनी ऐसे लक्षण । चिंतामग्न पितायाचे मन । म्हणें पुत्र उदरी आलासे बुद्धिहीन । उपाय नसेची सर्वथा ।।४१।। पिता कर्म कांडी पूर्ण । पुत्राचे नकळे परमार्थीं मन । प्रसंगेचि एकदा कु:शद्धे ताडण । पुत्रा लागीते केलेसे ।।४२।। पुत्राचे अल्पवय असून । ह्रदयीं खोचले ते वाग्बाण । तात्काळ पित्याशीं न कळताची जाण । गृहत्याग केलासे तयानें ।।४३।। ग्रामाबाहेर येताची जाण । नयनीं देखिले मंदिर जीर्ण । त्या माजीं तळघरीं जाऊन । कवणा न सांगताचि बैसला ।।४४।। जीर्ण होते मंदिर म्हणूनी । दर्शना न जाती तेथे कोणी । सूर्य नारायणाची मूर्ती देखुनी । बाळ भक्त तेथेची बैसला ।।४५।।आसवे वाहती नयतांतून । मूर्तीवरी त्या दृष्टी ठेवून । आराधना करी मनापासून । सदभाव ठेवूनी अंतरी ।।४६।। दोन दिवस यापरी लोटता । प्रत्यक्ष आला तेथे सविता । ब्राह्मणरूप धरूनी तत्वता । सामोरा ठाकलासे येऊनी ।।४७।। दुग्ध पात्र एक पुढे ठेवून । म्हणें बाळा करीरे दुग्ध प्राशन । कष्टलासी बहु तुं दिवस दोन । म्हणूनिया तातडी मी आलोसे ।।४८।। ऐसे परीसताचि ब्राह्मण वचन । भानुदास पुसतसे त्या

लागून । महाराज आपण कोठील कोण । सांगुनी संशय फेडावा ।।४९।। हास्यमुखें बोले ब्राह्मण । तुं ज्याचे करितोसी आराधन । तोची असे मी सूर्यनारायण । प्रसन्न तुजवरी जहालोसे ।।५०।। मग वरदहस्त ठेवूनी शिरी । भानुदासाशी म्हणे तमारी । याच जन्मी तुज भेटेल श्रीहरि । धन्य तुं होशील जगी या ।।५१।। असो सप्त दिवस पर्यंत । अनुष्ठान केले पुढे सतत । इकडे पिता दु:खी बहूत । शोध न लागेची पुत्राचा ।।५२।। दुग्ध नोहे ते अमृत पान । करिता सप्त दिन प्राशन । मूर्ति दिसे दैदीप्यमान । भानुदासाची तेधवा ।।५३।। भानुदासाचे परमार्थी मन । म्हणुनिया प्रत्यक्ष त्या घडले दर्शन । सवित्याचे तैसे आशीर्वचन । प्राप्त जहाले सहजची ।।५४।। या परी बाळ भक्ताचे समाधान । होताची गृही आला आपण होऊन । पिता त्या देखताची पुढे धावून । हृदयी धरीयेले सुपुत्रा ।।५५।। पुत्र वात्सल्य बहु कठीण । म्हणेरे बाळा होतासी कोठे जाण । आश्रुपुर ते नयनातून । एकसरेची वाहती ।।५६।। बोलता शब्द न निघे मुखातून । घडला वृत्तांत सांगे तो बाळ होऊन । वृत्तांत ऐकताची पित्याचे मन । आनंदे भरूनी गेलेसे ।।५७।। धन्यवाद देऊनी पुत्रासी । म्हणे रे बाळा तूं आमचे कुशी । येऊनिया केले धन्य आम्हाशी । धन्य वंश तुझेंनि ।।५८।। असो बाल्यावस्था संपताची जाण । पित्याने कुलवधु योग्य पाहून । आप्तइष्टां समवेत सुमुहूर्त काढून । विवाह संपूर्ण केलासे ।।५९।। अल्पची काळ तो ऐसा लोटता । निजधामा गेली माता पिता । प्रपंचभार पूर्णची आता । भानुदासा शिरी पडिलासे ।।६०।। प्रपंची पाहिजे वित्त । जैसे का परमार्थी असावे चित्त । चित्तावीण संसारी वित्त । कधी कल्पांति लाधेना ।।६१।।

वित्ता वीन प्रपंच पाही । कैसा न चले कधी कांहीं । उपासमार होतसे सदासर्वदाही । अन्न वस्त्रा वीन सर्वदा ।।६२।। परमार्थ रंगी जो रंगला । तो काय गणी या दुर्दशेला । वरी सगे सोयरे येऊनी त्याला । समजाविती यत्नेचि ।।६३।। म्हणती काही देऊन तुम्हासी भांडवल । व्यापार करीता राखावे मुद्दल । वरी जे कां होईल प्राप्त सकळ । त्यामाजी प्रपंच करावा ।।६४।। सचोटीने केलीया व्यवहार । मुद्दल फिटेल सत्य सत्वर । दुर्दशा न होता हा संसार । चालेला निश्चय असो द्या ।।६५।। परीसताची सकळाचे वचन । म्हणे तुमची आज्ञा प्रमाण । बुद्धिदाता रूक्मिणीरमण । सर्वत्र सकळाचा असेचि ।।६६।। त्याचीच आज्ञा म्हणून । यथा शक्ति ते भांडवल घेऊन । अंगेची जाऊनी पेठेतुन वस्त्रादि यथा रूचि आणिले ।।६७।। चाटीपणाचा हा व्यवहार पाहून । भानुदासा हासती कुटिल जन । असत्याविण हा व्यवहार कठीण । चालणें अशक्य सर्वथा ।।६८।। व्यवहार कैसा चाले पाहू म्हणती । येर येरासी ऐसे बोलती । परी पाठी असता । रूक्मिणीपती । उणें न पडे त्या कल्पांती ।।६९।। बाजारी चव्हाटच्या वरी बैसून । आल्या गिऱ्हाईकी प्रेमळ भाषण । करूनिया सांगे खरेदी विक्री पूर्ण । जी का सत्य असे आपुली ।।७०।। जग हे मुळी असत्य जाण । त्याशीं सत्य कैसे हे पटावे भाषण । सत्यासत्य याचा विरोध पूर्ण । सत्य सर्वदा असेकी ।।७१।। येणें परी लोक येती जाती । भानुदासाची ती ऐकुनी सत्योक्ती मानुनी ते आपुले चित्तीं ।। माघारा जाती ते तैसेचिं ।।७२।। कोणीही आलीया थोर सान । श्रीमंत अथवा दरिद्री पूर्ण । भानुदासाचे त्या एकची वचन । त्रिकाला बाधीत असेची ।।७३।। भानुदासाचे ऐसे हे सत्य व्रत । व्यवहार न चालेची

किंचित । परी भानुदासालागी तयाची खंत । कदाकाळी नसेंची ।।७४।। भानुदासाची सत्यता पाहुनी । अनुभव आला तो सकळा लागुनी । गिऱ्हायीके मग अवर्जोनी । येऊ लागली साक्षेपे ।।७५।। चोहीकडे तो एकची बोलबाला । म्हणती सत्यवचनी असे तो चाटीवाला । रीघ लागली त्या दुकानाला । अमित विक्री ती होतसे ।।७६।। ऐशा रिती व्यवहार करून । अपार मिळाले भानुदासा धन । परि तो सदासर्वकाळ विरक्त पूर्ण । अंतरी असेची सर्वदा ।।७७।। द्रव्य नसता ज्या न वाटे खंती । त्या काय होय आनंद धनाचीये प्राप्ती । हे न घडेची त्यां कवा कल्पांती । नित्यानंदी । जो बुडाला ।।७८।। परी सहकारी ते त्याचे सांगती । मत्सर उदभवला तयाते चित्तीं । व्यवहार करिता ते बाह्य रीती । बळेच समाधान दाविती ।।७९।। अंतरी ठेवूनी द्वेष पूर्ण । संधी साधु म्हणती ते आपण ।। हानी करावया मार्ग शोधून । काढूं म्हणती निश्चये ।।८०।। एकदा वस्त्र दिंडे घालुनी अश्वावरी । भानुदास चालींला एक्या बाजारी । समागमे असती चाटेंकरी । नित्यापरि सहजची ।।८१।। सर्वाचांची बाजारहाट होऊन । बिऱ्हाडी आले सर्वंची मिळोन । वस्त्र दिंडे ठेवीली सावरून । नित्यापरी सर्वची ।।८२।। तोची मंदिरी कीर्तन ध्वनी ऐकिला । श्रोत्र समुदाय जाता देखिला । भानुदास तात्काळ तेथूनि उठला । जाऊ म्हणतसे कीर्तनां ।।८३।। सहकाऱ्याशी आपण होऊन । भानुदास सांगे वर्तमान । म्हणे जातो मी ऐकावया कीर्तन । बिऱ्हाडी लक्ष असो द्या ।।८४।। ऐकुनी भानुदासाचे वचन । सकळाचे आनंदले मन । म्हणती मनीचा डाव । आजी पूर्ण साधेल ऐसे वाटते ।।८५।। बाह्यात्कारी

म्हणती साचार । आपण जावेची कीर्तना सत्वर । तो पहा होतसे नाम गजर । चिंता न ठेवा ती मानसी ।।८६।। परी भानुदास केव्हाच निघोनी । जाऊनी बैसले त्या कीर्तनी । देहभाव गेलासे विरोनी । अन्य त्यापुढे कायसे ।।८७।। इकडे सर्व सांगती मिळोन । भानुदासाचा अश्व दिधलासे सोडून । वस्त्र दिंडे ती सर्वची नेऊन ।। गर्ती एक्या ठेवली ।।८८।। ऐशी करिता दुष्ट करणी । आनंद सकळाशी जहाला मनीं । म्हणती आम्ही आजी घेतले साधुनी । इच्छीत जे कां आमुचे ।।८९।। परी अघटित ती ईश्वरी लीला । अवचीतची पडला तो तस्कराचा घाला । चोप तो देऊनी चाटीया सकळा मृत: प्राय सर्वची पडी येले ।।९०।। होते तितुके सर्व घेऊन । वस्त्र दिंडे आश्वावरी घालून । तस्कर पसार जाहले तेथून । भान कवणा नसेची ।।९१।। इकडे भानुदास प्रसाद घेऊन । बिऱ्हाडी येतो देखिले दुरून । द्विज एक आपुला आश्व घरून ।। उभा ठाकलासे मार्गी त्या ।।९२।। भानुदासाशी अश्व देऊन । गुप्त जहाला द्विज तेची क्षणी । उमज पडेना भानुदासा लागुनी । प्रकार काय म्हणेनीया ।।९३।। मग अश्व हाती धरून । बिऱ्हाडी येताची कळले वर्तमान । कीं तस्करें करूनिया मारहाण । नागविले समस्तां ।।९४।। प्रकार सर्वची देखून । कळवळले भानुदासाचे मन । आश्रु वाहती नयनातून ।। दु:ख अपार होतसे ।।९५।। पश्चाताप होऊनी सकळां अंतरी । भानुदासाचीये लोळती पायावरी । म्हणती हो महाराजा क्षमा करी । अपराधी आम्हीच सर्वथा ।।९६।। म्हणती तुमची वस्त्र दिंडे आम्हीच होऊनी । गर्तीमाजी ठेविले नेऊनी । प्रायश्चित तयाचे आम्हा लागुनी । श्रीहरिनें दिधळे सहजची ।।९७।। अश्व तो तुमचा आम्हीच सोडिला । आता

आम्हाशीं पश्चात्ताप जहाला । नेणुनी अधिकार आम्ही आपुला । व्यर्थ छळ हा केलासे ।।९८।। भानुदासाचे अंत:करण । दु:खे गेले होरपळून । म्हणे आजी मी कष्टविला रूक्मिणीरमण । कारण किंचित नसेची ।।९९।। म्हणे ज्या व्यवसायी श्रीहरी कष्टला । कासया करावे त्या व्यवसायाला । वस्त्र दिंडे ती सर्वची सहकाऱ्याला । वाटूनिया तात्काळ टाकीली ।।१००।। पुडे ती अयाचित वृत्ति ठेवून । परमार्थ करी तो प्रपंची राहून । नित्य हरिकथा पुराण श्रवण । सदा सर्वकाळ होतसे ।।१०१।। सर्वांभूती समभाव ठेवून । भानुदास वर्तती रात्रंदिन । पंढरीची वारी करून । वैष्णव मार्गी वर्तती ।।१०२।। कथाभाग एवढाची सांगून । प्रथमोध्याय केलासे पूर्ण । पुढील अध्यायीं सुरस वर्णन । येईल तेची परियेसा ।।१०३।। मनीं शंका न घ्यावी किंचित । वदविता असे तो रूक्मिणी कांत । वासुदेव तयाशी हा केवळ निमित्त । लेखना असेची सर्वथा ।।१०४।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार ।*

*प्रथमोध्याय: ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय २ ।।

श्री गणेशायनम: । श्री सरस्वतैनम: । श्रीगोपालकृष्णायनम: जयजयाजी सच्चिदानंद ।। पूर्णपरेशा ब्रह्मानंदा । दयासिंधो तूं ।। पाव मुकुंदा श्रीपते ।।१।। सकळाशी अससी तूं अधिष्ठान ।। म्हणूनी म्हणविसी जगज्जीवन । भक्तासवे खेळ खेळून ।। नाना रिती दावीशीं ।।२।। प्राणाहुनी तुज भक्त आवडती । ऐशी आहे तुझी ख्याती ।। तरी माझीया निमित्तेंची तूं श्रीपती ।। चरित्र बोलवी येथूनी ।।३।। व्यवसायीं श्रीहरि कष्टला ।। म्हणुनिया भानुदास दु:खी जहाला ।। व्यवहार सर्वंची सांडिला ।। गत कथार्त एवढाची जहालासे ।।४।। पुढे आषाढी एकादशी निमित्त ।। भानुदास आले पंढरीत ।। अमित वारकरी संतभक्त ।। निज दृष्टी देखीले ।।५।। चंद्रभागे माजीं करूनिया स्नान ।। पुंडलिकाचे घेतले दर्शन ।। राऊळी येताची हलकल्लोळ पूर्ण । निज दृष्टी तो देखीला ।।६।। किती एक आक्रोश करीती ।। धब धबा ते ऊर बडविती ।। किती एकाचें त्या नेत्री वाहती ।। आश्रुधारा सारीख्या ।।७।। चोहीकडे एकची हाहा:कार ।। भानुदासा नुमजे काही प्रकार ।। दृष्टी पडताची विटेवर ।। तो देव्हारीं दैवत नसेची ।।८।। गाभारा सर्व धुंडाळीला ।। परी मूर्ती न मिळेची भानुदासाला ।। म्हणें देव कसा कोणीं केंव्हा नेला ।। किंचित काही कळेना ।।९।। तो अकस्मात वारकरीयांचा मेळा । भानुदासाचीयाकडे तो लोटला ।। रूदन शब्देंची ते भानुदासाला ।। सर्व प्रकार सांगती ।।१०।। म्हणती विजयानगरचा येऊनी नृपती ।। तयानेची नेली पांडुरंग मूर्ती ।। सत्ताधारी बळीवंत अती । कवणाचेही त्यापुढे चाले ।।११।। कृष्णदेवराव तयाचे नामाभिधान ।।

न कळे तो आला केंव्हा कोठून । स्वारीवर असता दर्शना म्हणून ।। आला कोणी म्हणताती ।।१२।। जरी म्हणाल नृपतीने येऊन ।। पांडुरंगा केवी नेले येथून ।। कैशा रिती ती तेथे जाऊन ।। व्यवस्था कैशी ती केलीसे ।।१३।। तरी येवढ्याशी नसे प्रयोजन ।। केलीया सविस्तर वर्णन ।। व्यर्थची वाढेल ग्रंथ लेखन ।। कारण त्यां किंचित नसेची ।।१४।। मथितार्थ येथीचा येवढाची जाण ।। नृपति असावा भक्तपूर्ण ।। श्रीहरि सर्वदा भक्ताधीन ।। हे प्रसिद्ध असेची ।।१५।। नृपतीच्या भक्तीलागी भुलोन ।। पांडुरंग गेला नगरा येथून ।। परी नृपासी औघीच वचन ।। देऊनीया ठेविले हरिनें ।।१६।। म्हणे तूच अधर्म घडता जाण ।। किंवा संतभक्ताचे होता छळण ।। मती तत्काळ येईन निघोन ।। माघारा आपुल्या स्वस्थानीं ।।१७।। असो मागील पहावे अनुसंधान । भानुदास सकळाचे समाधान ।। करूनीया म्हणे मी आताची जाऊन ।। घेऊन येतो देवाशीं ।।१८।। यापरी सकळाशी बोलुनी सत्वर ।। गाठले ते राजधानी विजयानगर ।। नगरीं प्रवेशोनी पुसे मंदिर ।। कोठे आहे हरिचे ।।१९।। परी कोणी न काही उत्तर देती ।। सांगता क्षोभेल म्हणती नृपती ।। म्हणोनीया उगेच निघोन जाती ।। काही न बोलता तसेची ।।२०।। हिंडता फिरता सहज रीती ।। भानुदासा आला मंदिराप्रतीं । परी तेथे कुलूपे असूनी या पहारे दिसती ।। मंदिरीं प्रवेशता नयेची ।।२१।।

भानुदासा लागी ते पाहून ।। परिचारक सांगती पुढे येऊन ।। दर्शन वेळा ती आता गेलीसे निघोन ।। उदयी यावेजी दर्शनां ।।२२।।ऐकुनी परिचारीकाचे वचन ।। गोंधळले भानुदासाचे मन ।। लटीकाची धन्यवाद देवा देऊन ।। लडीवाळेची बोलत ।।२३।। धन्य म्हणे देवा तुझी करणी ।।

बरा बैसलासी येथे येऊनी ।। गेलासी आपुल्या ब्रीदा विसरूनी ।। नकळे कैसा विलासी जहाला ।।२४।। पुंडलिकाशी कासया दिधले वचन ।। अलंकारादि भोग भोगतोशी येथे येऊन ।। विटलासी वाटे संत भक्तालागून ।। म्हणुनीया येऊनि बैसला ।।२५।। राजविलास भोगीतोसी रात्रंदिन ।। मग कासया होईल संत भक्ताची आठवण ।। संत भक्त ते तिकडे कंठी प्राण ।। आणुनी बैसले त्यां पंढरी ।।२६।। यापरी मानसींच करीता भाषण ।। कंठ आलासे गहिवरोन ।। शब्द तो नयेची मुखातून ।। नयनी आश्रुधारा वाहती ।।२७।। निज भक्ताची दशा पाहून ।। कळवळले पांडुरंगाचे मन ।। कड्या कुलूपा पडल्या गळोन ।। द्वार खुले जहाले ।।२८।। भूली पडली सकळालागून ।। निद्राडोहीं बुडाले रक्षकजन ।। भानुदास देखताची धाव घेऊन ।। प्रवेश केला मंदिरी ।।२९।।

सामोरा पाहुनी पांडुरंग दृष्टीं ।। पायी घातली तत्काळ मिठी ।। कडकडून उभयता घेती भेटी ।। प्रेमभरेची एकदां ।।३०।। पंढरीचे सांगुनी वर्तमान ।। म्हणे मी आलो तुज न्यावया लागून ।। दयाघना तूं आताची येथून ।। चाल मजसवेची झडकरी ।।३१।। समाचार निजभक्ताचा ऐकून ।। गहिवरले श्रीहरिचे मन ।। अश्रु वाहती नयनांतून ।। भक्तासवे ते बोलवेना ।।३२।। सावरूनिया मग आपुले मन ।। भानुदासासी बोले श्रीहरिवचन ।। उदयीक तुजसवे मी येईन ।। चिंता न करावी मानसी ।।३३।। ऐसे बोलता रक्मिणी पती ।। आनंद जहाला तो भक्ताप्रती ।। भानुदासा भेटुनी मागुता श्रीपती ।। निरोप देत जावया ।।३४।। निरोप मिळताची साचार ।। मस्तक पायी ठेविले सत्वर ।। उठूनी निजभक्ताचीये कंठी हार काढुनीया आपुला घातीला ।।३५।। हे तो नेणेची

भानुदासाचे मन ।। प्रेमानंदेची तो निघाला तेथून ।। स्नान संध्यादि कर्म सारून ।। तुंगभद्रा तीरी बैसला ।।३६।। इकडे काकड आरती समयासी ।। हार नाही कळले पुजाऱ्याशीं ।। तेणें तात्काळची ते सकळाशीं ।। वर्तमान श्रुत केलेसे ।।३७।। सकळची जहाले चिंतातुर ।। म्हणती कसा केंव्हा आला तस्कर ।। नृपती लागी ते जाऊनी सत्वर ।। समाचार तो सर्व सांगती ।।३८।। संतप्त होऊनी नृपती ।। सांगे सकळ त्या अनुचराप्रती ।। धुंडोनी आणा त्या तस्कराप्रतीं ।। अति वेगेची सत्वर ।।३९।। राजदूत निघाले सत्वरगती ।। सैरावैरा चोहीकडे हिंडती ।। तो अकस्मात तुंगभद्रा तीराप्रतीं ।। ब्राह्मण तो नयनी देखीला ।।४०।। भानुदास बैसला आसनावर ।। गळा झळके तो नवरत्न हार ।। गलबला एकची जहाला म्हणती तस्कर ।। मुद्यासह तो आजी घरीयेला ।।४१।। राजयासी समाचार तो कळला ।। मुद्यासह मग तो तस्कर आणीला ।। क्रोधयुक्त म्हणे तो नृपती या नीचाला ।। सुळीं ते द्यावे आताची ।।४२।। नृपतीचे ऐकताची ऐसे वचन ।। भानुदास म्हणे त्या पंढरीशा लागून ।। बरी दिलीस आमुची विल्हेवाट लावून ।। सुखे तूं आता रहावे येथेची ।।४३।। इकडे शूळ रोविताची सत्वरगती ।। भानुदासालागी ते न्यावयाप्रती ।। अनुचर तैसे ते वेगे धावती ।। घेऊनीया जाती तस्करां ।।४४।। अघटित असे ईश्वरी लीला ।। पर्णे फुटली त्या शुळाला ।। शूळ तोची वृक्ष जहाला ।। देखूनी आश्चर्य सकळीकीं ।।४५।। नृपतीलागीती कळताची मात ।। तेथे आला तात्काळ धावत ।। म्हणे तस्कर नसुनी कोणी संत भक्त ।। अविचारेंची धरीयेला ।।४६।। मग भानुदासालागुनी ।। मिरवीत आणिले राज सदनी ।। यथोपचारे ती पूजा करूनी ।। पायीं

मस्तक ठेविले ।।४७।।म्हणे अज्ञानेची अपराध घडाला ।। क्षमा ती करावी बालकाला ।। मग क्षमावचन मिळताची राऊळा ।। उभयता येती ते तत्काळ ।।४८।। पांडुरंगाचे घेताची दर्शन । उभयताचे जहाले समाधान ।। भानुदासाचा उद्देश जाणून ।। दचकले मन रायाचे ।।४९।। म्हणे भाक श्रीहरिची मजलागून ।। किं अधर्म अथवा भक्ताचे छळण ।। होता मग मी नीजस्थळा जाईन ।। वचन प्रमाण ऐसेची ।।५०।। राव बोले भानुदासाप्रती ।। अवश्य न्यावा हा तुमचा श्रीपती ।। वचन भंग जहाला आजी निश्चीतीं ।। बोल हा तुम्हावरी नसेची ।।५१।। परिसताची नृपतीचे ऐसे वचन ।। भानुदासाचे जहाले उद्विग्न मन ।। म्हणे देवादि देवा ही दुजी अडचण ।। आम्हा पुढे ती आलीसे ।।५२।। मी तो गरीब दुबळा ब्राह्मण ।। कैसे न्यावे ते तुज उचलोन ।। दीन दयाळा तूं होऊनी लहान ।। संबळी माजींया बैसावे ।।५३।। भानुदासाचे ऐकुनी वचन ।। हासो आले समस्ता लागून ।। परी भक्ताधीन असे रूक्मिणी रमण ।। चमत्कार तो सर्वची पाहती ।।५४।। मूर्ती सावळी सुकुमार ।। लहान जहाला रूक्मीणीवर ।। देखुनीया यापरी आनंद अपार ।। भानुदासा प्रती जहालासे ।।५५।। मग मूर्ती ती संबळी माजीं ठेवूनी ।। भानुदास आला पंढरीं घेऊनी ।। चंद्रभागे माजीं उतरोनी ।। मूर्ती बाहेर काढीली ।।५६।। बाहेर काढीताची तात्काळ ।। पूर्ववत जहालासे तो तमालनीला ।। हर्षे नाचती भक्त सकळ ।। अलौकिक लीला देखुनी ।।५७।। मग पांडुरंगा आणुनी राऊळां ।। स्थापनेचा सोहळा तो मांडीला ।। स्थापीताची मागुती गजर जहाला ।। विठ्ठलनामाचा एकदाची ।।५८।।म्हणती धन्य धन्य हा भानुदास । घेऊनी आलासे श्रहरिस ।। उदास ऐशा पंढरीस

।। शोभा आणीली मागुता ।।५९।। भानुदासाप्रती धन्यवाद देऊन ।। हर्षे बोलती ते सकळजन ।। पांडुरंग भक्त हा निका म्हणून ।। सर्वत्र ख्याती जहालीसे ।।६०।। ऐसा हा पवित्र असे कुलवृत्तांत ।। श्रोतीं ऐकला तो समस्ता ।। मग ऐशा कुली तो एकनाथ ।। येता नवल नसेची ।।६१।। पुढील अध्यायी सुरस कथा ।। कीं केवळ अमृताची सरिता ।। वासुदेव प्रार्थी तुम्हां समस्तां ।। प्राशना यावे म्हणोनीया ।।६२।।

*इतिश्रीनाथलीलामृत कथासार द्वितीयोध्याय:*

*श्री कृष्णार्पणमस्तु ।।*

*हरयेनम: । हरयेनम: ।*

## ।। अध्याय ३ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गोपालकृष्णायनमः । जयजयाजी मधुसुदना ।। विश्वव्यापका मनमोहना ।। गोकुळवासिया नंदनंदना ।। कृष्णा विष्णो जगदगुरो ।।१।। जो जो ज्या रिती तुज ये शरण ।। तैसेची करीशी तूं त्याचे रक्षण ।। हा तो श्रेष्ठ अथवा तो याती हीन ।। भेदभाव ऐसा तो नेणूनी ।।२।। परी असावे निर्मळ मन ।। त्यालागी वश होशी तूं नारायण ।। दीनदयाळा कृपे येथून ।। लीलामृता बोलवी ।।३।। आता होऊनीया सावधान ।। मागील पहावे ते अनुसंधान ।। कीं आजा आजी ते करीती संगोपन ।। एकनाथाचे प्रीतीनें ।।४।। वयोवृद्ध उभयता असून ।। त्याच्या छंदेची वर्तती रात्रंदिन ।। उणे पडो न देती त्या काहीं म्हणून ।। नाना यत्नेची सर्वदा ।।५।। नाथाची बालमूर्ती पाहुनी ।। कौतुक वाटे सकळां लागुनी ।। बाळलीला तयाच्या पाहूनी ।। आनंद वाटेची समस्तां ।।६।। दगडाचेची देव सर्व मांडून ।। पूजा करी पत्रपुष्पादि आणून ।। प्रीती नैवेद्यादि समर्पून ।। नमस्कारीत सद्भावे ।।७।। आजा आजी ते आणी धरून ।। म्हणे पहा मी केले हे पूजन ।। तुम्ही नमस्कार करावा तया लागून ।। दैवत आमुचे म्हणोनीया ।।८।। नाथाचे ऐकुनी यापरी बोल ।। वृद्धाच्या अंतरी वाटे नवल ।। नेत्री वाहे प्रेमाश्रुजल ।। शब्द न फुटेची उभयतां ।।९।। नातवाचे कौतुक म्हणून ।। आणीका सांगती उभयता होऊन ।। नवल वाटे सकळ लागून ।। अघटित लीला देखुनी ।।१०।। प्रतिष्ठानीचे सकलजन ।। नाथाचीया भेटी लागून ।। नित्य येती गृही होऊन ।। गुणगान करीती नाथाचे ।।११।। गोकुळीचे नारीनर । पहावया

येती नंदकुमार ।। तैसेच या ठायीं निरंतर ।। समस्त सर्वदा येताती ।।१२।। असो पाच वर्षे लोटताची जाण ।। नाथचे ते केले मौंजी बंधन ।। आजा आजीचे ते समाधान ।। होय बटुशी पाहता ।।१३।। द्विजन्म संस्कार होताची पूर्ण ।। आरंभिले मग वेदाध्ययन ।। अल्पची काळ लोटता जाण । मुखोद्‌गत जहाले सर्वची ।।१४।। नित्य पुराणिक गृहीं जे असती ।। संस्कृत विद्या नाथा शिकविती ।। ब्रह्मकर्म आचारादि अर्चन प्रीती ।। नाथा अंगेची करीतसे ।।१५।। आचार कडकडीत पाळून ।। नाथ वर्तती रात्रंदिन ।। स्नानाविण ते कधीही जींवन ।। प्राशीले नसेची सर्वथा ।।१६।। जे सदाचाराचे करीती पालन ।। बुद्धि तयाची न होय मलीन ।। मग पाहिजे त्या विषयाचे आकलन ।। सहजा सहजी होतसे ।।१७।। कुशाग्र बुद्धि नाथ म्हणून ।। सर्वची अवगत जहाले पूर्ण ।। गुरूजनादि यापरी पाहून ।। आश्चर्य मानसी करीताती ।।१८।। गुरूजन येऊनीया प्रीतीं ।। चक्रपाणीलागी गोष्टी सांगती ।। नाथाची पाहुनी ज्ञान संपत्ती ।। कुंठनीत मती ती आमुची ।।१९।। असो वृद्धाची सेवा घडावी म्हणून ।। नाथ तळमळती मनातून ।। उभयताची कामे सर्वची आपण ।। न सांगता करीती प्रीतीनें ।।२०।। यापरी वयाते बारा वर्षे लोटली ।। भारत भागवतादि ग्रंथे पाहिली ।। पाहिली तैसी अंतरी साठविली । एकदाची प्रीतीनें ।।२१।। गोष्टी त्या जहाल्या मुखोद्गत ।। आजा आजीते बैसुनी सांगत ।। ऐकुनीया वृद्धे नवल करीत ।। आणीका सांगती प्रीतीनें ।।२२।।

इतुके करूनिया ग्रंथावलोकन ।। परी नाथा न लाभेची समाधान ।। नाथ म्हणती हे तो शब्द ज्ञान ।। अनुभव रोकडा नसेची ।।२३।। सद्‌गुरूविण अनुभव ज्ञान ।। न मिळेची कल्पांती जाण ।।

या लागी तळमळे नाथचे मन । उपाय काही सुचेना ।।२४।। अनुभव ज्ञान म्हणजेची आत्मज्ञान ।। ते न लाभेची सदगुरूविण ।। यालागीं कवणातें जावे शरण ।। हेतो काही सुचेना ।।२५।। कृष्ण गुरू तो सांदिपनी ।। रामालागी तो वसिष्ठ मुनी ।। तैसा मजलागी सद्‌गुणखाणी ।। कवण गुरू कळेना ।।२६।। यालागी उदास वृत्ती ।। नाथ कवणासीहि न बोलती ।। सदा सर्वकाळ विचार चित्तीं ।। चालु असे तो एकची ।।२७।। आजा आजी यापरी देखून ।। चिंता करीती रात्रंदिन ।। म्हणती न कळे नातवा लागून ।। कवण उपाय तो करावा ।।२८।। सुग्रास तयासी घालीती भोजन ।। इच्छेपरी त्या देती वस्त्र प्रावर्ण ।। परी नाथाचे न रमे कोठेही मन ।। काही केल्याची सर्वथा ।।२९।। प्रपंची गुंतले जयाचे मन ।। परमार्थ न कळे त्या कल्पांती जाण ।। नाही तेची करूनीया अनमान ।। व्यर्थ चिंता ती वाहात ।।३०।। जीवनाविण जैसी का मासोळी । तैशी अवस्था नाथाची जहाली ।। सद्‌गुरूध्यास सदासर्वंकाळी ।। अंतरीं भरलासे सर्वंथा ।।३१।। जागृतीं स्वप्नीं तैसे सुषुप्तीं ।। एकची ध्यास नाथाचीये चित्तीं ।। कैसा गुरू कवण गुरू कैसी प्राप्ती ।। अन्य प्रश्नोत्तर नसेची ।।३२।। ऐशीया अवस्थे एके दिनीं ।। बैसले ते एका शिवालयां जाऊनी ।। शिवाच्या पायीं मिठी घालुनी ।। ध्यानमग्न जहाले तेथेची ।।३३।। अंतर्बाह्य असे सद्‌गुरू ध्यास । सद्‌गुरू म्हणूनी प्रार्थी शिवास ।। रडे पडे सारखा धरणीस ।। भान त्या किंचित नसेची ।।३४।। ऐशी अवस्था विलोकून ।। डळमळले शिवाचे आसन ।। प्रतिध्वनी पडला कानीं येऊन ।। शिवप्रसादेची तात्काळ ।।३५।। म्हणेरे गुरूभक्ता देवगिरी जाऊन ।। जनार्दन स्वामींते असावे शरण ।। तोची गुरू तुज

घडविल दर्शन ।। श्रीहरिचे त्या तेथेंची ।।३६।। ऐसी ऐकता प्रसादवाणी ।। नाथा वाटे की संजीवनी ।। रात्र की दिवस तो न कळे मनीं ।। तैसाची बाहेर पडियेला ।।३७।। ऐशा त्या गडद अंधारा माझारीं ।। बाळभक्त तो निघाला झडकरी ।। पाहिंजे तेवढी सर्व सामग्री ।। समागमे होती ती नाथाच्या ।।३८।। अंतरी श्रद्धा भरलीसे पूर्ण ।। मुखीं ते तैसेची हरिस्मरण ।। साधन चतुष्टय्च ऐशी ती सामग्री घेऊन ।। एकनाथ हा स्वानंदेची जातसे ।।३९।। आजा आजीस न सांगता आपण ।। निघालो ही त्या नोहेची आठवण ।। अविश्रांत ऐसी वाट चालून ।। देवगिरी येऊनी पोहचला ।।४०।। जनार्दन स्वामीचे ते होताची दर्शन ।। नाथ न राहेची ते देहभान ।। आश्रुपूर वाहती ते नयनातून ।। लोटांगण तैसेची घातिले ।।४१।। स्वामीने नाथाशी निजकरे कुर्वाळून ।। अंतर्बाह्य पाहिले त्या विलोकून ।। अधिकारी ऐसा बाळभक्त देखून ।। आश्चर्य ते वाटले स्वामीशी ।।४२।। म्हणे एवढी साधन संपत्ती या वयांत ।। चकीत जहाले ते स्वामीचे चित्त ।। मग त्यांते कोठील कोण सर्वची वृत्तांत ।। स्वामीनें पुसीला निज प्रीतीं ।।४३।। साद्यंत सकलतो वृत्तांत ।। स्वामीलागीते सांगती नाथ ।। परीसता वृत्तांत ते स्वामीचे चित्त ।। गहिवरूनीया गेलेसे ।।४४।। असो तयाचें ते करूनी सांत्वन ।। सुखें राहावे म्हणती त्या आजपासून ।। ऐकताची ऐसे ते सद्‌गुरू वचन ।। परमानंद तो नाथाशीं जाहला ।।४५।। मागुता सद्‌गरू तयाते म्हणती ।। वृद्धाचीं न घेता अनुमती ।। आलास येथे तयाप्रती । कैशारीती कळावे ।।४६।। असो होणार ते होतसे म्हणून ।। सोडला तो विषयची पूर्ण ।। नाथाशी तो नित्यनेम सर्वची सांगून ।। वरद हस्त शिरी तो ठेविला ।।४७।।

नाथाचे आनंदले मन ।। प्रत्यक्ष देखीले सद्गुरू चरण ।। सांगीतल्या परीस अधिक होऊन ।। कामे करीत सर्वदा ।।४८।। सद्गुरू दर्शन जहालीयापासूनी ।। नित्यसेवेचे व्रत घेतले नाथानीं ।। क्षणहि न दवडी सेवे वाचुनी ।। आनंद सेवेंची मानीत ।।४९।। आपुले नित्यकर्म सारूनी । गुरूसेवें तत्पर ठाके येऊनी ।। ब्रह्मानंद लाधे या सेवेतुनीं । प्रत्यय ऐसा येतसे ।।५०।। सद्गुरू म्हणताची नाथ सत्वरी ।। येऊनी ठाके सामोरी । नम्र वचने जोडोनी करी ।। आज्ञा काय पुसतसे ।।५१।। शके चवदाशे सदुसष्टीं ।। गुरू शिष्याची जहाली भेटी ।। भेटी होताची ती कृपादृष्टी ।। नाथावरी जहालीसे ।।५२।। ऐशा रिती सेवा सतत ।। गुरूगृहीं करीती नाथ ।। पडल्या कामीं ते धाऊनी त्वरित ।। होऊनीया करीत निजांगें ।।५३।। एकदा नाथाशीं बोलावून ।। सद्गुरू सांगतीं आपण होऊन ।। म्हणतीरे हिशेब आजी आणून ।। दावावा आम्हासी सत्वरी ।।५४।। फेर तपासणी करीत असता ।। एका अधेल्याची चूक आलीसे हाता ।। पुन्हा पुन्हा ते सर्वची पाहता ।। चूक न मिळेची सर्वथा ।।५६।। चोहीकडे निजा निज जहाली ।। नाथाची फेर तपासणी चालीली ।। जै चार प्रहर रात्र होऊनी गेली ।। तो अवचीतची चूक मिळाली ।।५७।। चूक मिळताची मिळाली म्हणून ।। ओरडला आणिती टाळी पिटून ।। आनंदले ते नाथाचे अंत:करण ।। तो सद्गुरू जागृत जहाले ।।५८।। म्हणती कारे कसला आनंद जहाला ।। मग गुरूते वृत्तांत सांगितला ।। ऐकताची गहिवरोनी एकनाथाला । प्रेमभरेंची बोलती ।।५९।। म्हणती रे जैसे का हिशेबीं ठेविले मन ।। तैसेच ईश्वरीं व्हावे विलीन ।। देहाचेहि नसावे भान ।। कार्याकारण ते एकची ।।६०।। एवढ्याच वचनीं सवसार

।। उमज पडला नाथाशी सत्वर ।। धन्य मायबाप म्हणे तूं सद्‌गुरू थोर ।। चरणीं माथा ठेविला ।।६१।। नाथाशीं उचलोनी ह्रदयीं ।। धरीले गुरूनें अंगेची पाही ।। कार्यकारण ते वेगळे नाही ।। प्रत्यय दुजा दाविला ।।६२।। नाथ भूमिका ती स्फटिका प्रमाण ।। गुरू तो भेटला प्रत्यक्ष नारायण ।। मग द्वैताद्वैत गेलीया तेथे विरोन ।। आश्चर्य नोहेची सर्वथा ।।६३।। नाथाची पाहावया चित्तवृत्ती ।। हिशेबाचे केले निमित्त पुढती ।। उत्तीर्ण नाथ गुरू प्रचीती ।। येर येरां लाधली ।।६४।। मागुती परीक्षा पाहावी म्हणून ।। सद्‌गुरू बैसले समाधी लावून ।। नाथ करीती द्वारी रक्षण ।। तो अघटित घटना घडलीसे ।।६५।। अवचीतची परचक्राचा घाला ।। देवगडावरी येऊनी पडीला ।। हलकल्लोळ सर्वची जहाला ।। कोणी न कोणा पुसती ।।६६।। स्वामीकडे धावले दूत ।। कळऊ म्हणती स्वामीशी मात ।। परी स्वामी बैसले समाधिस्त ।। उपाय काहीं सुचेना ।।६७।। नाथाशी सांगुनी वर्तमान ।। म्हणतीं स्वामीस कळवावे आताची आपण ।। नाहींतरीं अनर्थ पूर्ण ।। होईल ऐसेची वाटते ।।६८।। नाथ म्हणती आपणाशी आपण ।। समाधी भंग करावया काय कारण ।। सद्‌गुरू तो मीच, नसता दुजेपण ।। चिंता मग कासया करावी ।।६९।। ऐसा विचार येताची मनीं ।। शस्त्रागार गाठीले तत्क्षणीं ।। सद्‌गुरू रणवेश आपण करूनी ।। तात्काळ बाहेर पडिले ।।७०।। गुरूमूर्ती अंतरी साठवून ।। अश्व तो घेतीला त्यांचाची आणून ।। शस्त्रास्त्रे मग करी घेऊन ।। रणकंदना निघती तैसेची ।।७१।। सकळाशीं वाटले आपुल्या मनीं ।। स्वामीच आले अश्वावरूनी ।। पाठीराखा निकट पाहूनी ।। स्फुरण चढले समस्तां ।।७२।। वीर नाथ येती द्वारा बाहेर ।। पाठी असे

सैन्यसागर ।। मोर्चे बंदि करूनी साचार ।। युद्धारंभ केलासे ।।७३।। नाथाचे युद्ध कौशल्य पाहुन ।। हादरली परचक्रीं सेना पूर्ण ।। पाठ दाऊनी ते पलायन ।। करीती एकदाची सर्वहि ।।७४।। युद्ध जहाले चार घटिका तुंबळ ।। परचक्राने तो काढीलासे पळ ।। परचक्रीं होऊनी हल्लकल्लोळ ।। दाणा दाण सर्वची जहाली ।।७५।। म्हणती स्वामीचे सैन्य अपार ।। न निघे आम्हाशीं त्यापुढे धीर ।। धन्य ती गुरूमाऊली महिमा थोर ।। नाथां विजयी केलेसे ।।७६।। श्रोती ऐकावे ते सावधान ।। ऐसे व्हावया काय कारण ।। तरी गुरूशिष्या माजीं दुजेपण ।। किंचित काही ते नसेची ।।७७।। ऐसा भाव नाथाचीये मनी ।। म्हणुनीया विजय जहाला रणीं ।। शांतता चहाली ऐसे देखूनी ।। गडावरी सर्वची पातले ।।७८।। मागुता शस्त्रागारी जाऊन ।। नाथ तो रणवेश ठेविती काढून ।। पुनरपि आपुले ते द्वाररक्षण ।। करीती अति प्रीतीनें ।।७९।। तोची स्वामी बाहेर येऊन ।। चोहिकडे पाहती विलोकून ।। मग तात्काळ पाकगृहीं येऊन ।। भोजनालागी बैसती ।।८०।। कोणीं काही न सांगताची जाण ।। स्वामीलागी आलेसे कळोन ।। म्हणती विपरीत काही अकस्मात होऊन ।। गेले ऐसेची वाटते ।।८१।। मग परस्परेची परचक्राची मात ।। स्वामीलागीं कळली समस्त ।। विजयी कैसे जहाले नाथ ।। वृत्तांत साराची ऐकिला ।।८२।। आश्चर्य वाटले स्वामीलागुनी ।। विजयी नाथ रणीं कैसे म्हणोनी ।। वीरता एवढी आली कोठूनी ।। युद्ध कौशल्य तैसेची ।।८३।। पुनश्च मी विजयी जहालो म्हणून ।। ऐसा शब्दहि न निघे नाथाकडून ।। कौतुक वाटे हेची मनांतून ।। विनय पाहुनी नाथाचा ।।८४।। मग प्रत्यक्ष नाथाशी बोलावुन ।। अंगेची पुसती गुरू आपण ।।

परी न बोलता नाथ येऊन ।। सामोरा ठाकती विनयेची ।।८५।। स्वामीचा आग्रह पाहुन ।। नाथ सांगती कर जोडोन ।। कार्य कारण एकची म्हणोन ।। विजय आजीचा जहाला ।।८६।। गुरूभाव मनीं साविता पूर्ण ।। मग राहिले कोठें दुजेपण ।। स्वामीचाची रणवेश अंगी लेऊन ।। समरीं प्रवेश केलासे ।।८७।। शस्त्रास्त्रे स्वामीचीच होती । आणि गुरूभाव भरलासे चित्तीं ।। मीपण विराले त्वरित गती ।। युद्ध जहाले तुंबळ ।।८८।। स्वामीची कृपा शिरीं म्हणून ।। समरी विजय जहाला पूर्ण ।। ऐसे असता व्यर्थ अभिमान ।। कासया म्हणूनी करावा ।।८९।। ऐसे ऐकताची नम्रवचन ।। गहिवर दाटला स्वामीलागून ।। धन्य धन्य म्हणती नाथा ओढून ।। ह्रदयीं धरिले प्रीतीनें ।।९०।।

नाथाचा अधिकार जाणून ।। स्वामी ते विचारीती आपणां आपण ।। म्हणती करवावे दत्त दर्शन ।। नाथा लागी आताची ।।९१।। पुढील अध्यायीं तेची वर्णन ।। येईल करावे तुम्ही श्रवण ।। वदविता असे रक्मिणीरमण ।। विश्वास मानसीं असो द्या ।।९२।। तो वदविता आहे म्हणून ।। वासुदेव प्रार्थी तुम्हा लागूनी ।। तरी श्रव्णी सादर असावे येथूनी ।। इच्छित आमुचे हेची पै।।९३।।

*इति श्री नाथलीलामृतसार तृतीयोध्याय:*

*।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।*

*हरयेनम: ।। हरयेनम: ।।*

## ।। अध्याय ४ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गोपालकृष्णायनमः । जयजयाजी पूर्णपरेशा ।। परब्रह्मरूपा तूं विश्वेशा ।। गोकुळवासीया गोपवेषा ।। कृष्णा विष्णो कंसारे ।।१।। संकटीं पडता भक्तजन ।। अवतार घेशीं तूं नारायण ।। दुष्टजनालागी निर्दाळून ।। स्वभक्तां रक्षीसी निजांगे ।।२।। भक्त काजाची आवडी म्हणून ।। सांडीसी तूं आपुले थोरपण ।। दीनदयाळा कृपें येथून ।। लीलामृत पुढे बोलावी ।।३।। हिशोब परचक्रादि निमित्तें करून ।। नाथाची वृत्ती पाहिली कसून ।। सुवर्ण पहावे कसा लावून ।। तैसे स्वामीने हे केलेसे ।।४।। नाथ उत्तीर्ण जहाले पाहून ।। आनंद जहाला स्वामी लागून ।। करवावे म्हणती दत्त दर्शन ।। गत कथार्त जहाला तो इतुकाची ।।५।। मग नाथाशी एकांती नेऊन ।। स्वामीनें सांगीतली अंतरीची खूण ।। म्हणती तुज आता प्रत्यक्ष दर्शन ।। करवीन अनुसयासुताचे ।।६।। सद्गुरू सेवा मनापासूनी ।। केली आजवरी येथे राहूनी ।। त्या योगे मी पण तुझे मुळीहुनी ।। विलया गेलेची सर्वथा ।।७।। अहंभाव तुझा मावळला ।। सोऽहं भाव उदया आला ।। अंतरी ठाव नसेची द्वैताला ।। स्वयंप्रकाश जहाला तूं ।।८।। ऐसे परीसताची सद्गुरू वचन ।। ब्रह्मानंद जहाला नाथालागून ।। सद्गुरू भाव मनीं साठवून ।। चरणीं माथा ठेविला ।।९।। येणें परी परिसता वृत्तांत ।। साशंकीत जहाले श्रोतयाचे चित्त ।। म्हणती स्वामी अधिकारी की संतं ।। गुढ हे आम्हा नुमजेचीं ।।१०।। तरी ऐकावे आता सावधान ।। श्रीमंत दरिद्री अथवा यातिहीन ।। संत व्हावया पाहिजे जटा अथवा मुंडण ।। ऐसा

मथितार्थ नसेचीं ।।११।। संताचे असती बहुत लक्षण ।। ते कासया पाहिजे येथे वर्णन ।। महत्वाची ती एकची खूण ।। परिसा सावधान होऊनी ।।१२।। जो जाणेल भगवंत ।। तया नांव बोलीजे संत ।। शाश्वत आणि अशाश्वत ।। ओळखीले जेणेंका अंतरी ।।१३।। असो ऐसे आहेत ज्यापाशी लक्षण ।। आश्रम याति मग तो कोणी का असेन ।। वेषभुषादिकाचे येथे बंधन ।। किंचित काहीसे नसेची ।।१४।। असो स्वामी हे कोठील आहेत कवण ।। तेची मी सांगेन तुम्हां लागून ।। चाळीसगांव खानदेशी वस्ती स्थान ।। स्वामीचे ते असेची ।।१५।। तेथील देशपांडे घराणे विख्यात ।। देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण कुळांत ।। शके चवदाशे सव्वीसांत ।। जन्म जहाला स्वामीचा ।।१६।। मुत्सद्दिपणादि अंगीचे गुण पाहून ।। देवगिरीते जहाले पाचारण । यवणीकाळ परी तो स्वामीचाची मान ।। सर्वत्र ठायीं जहालासे ।।१७।। देवगडी किल्लेदार म्हणून ।। स्वामी लागी मिळाला अग्रमान । प्रपंचाशी परमार्थरूप देऊन ।। स्वामी वर्तती सर्वदा ।।१८।। व्यवहारी जीतुके स्वामीदक्ष ।। तितुकेची असे परमार्थी लक्ष ।। द्वैताद्वैत पक्षापक्ष ।। अंतरी नसे स्वामीच्या ।।१९।। ऐसा महापुरूष हा अधिकारी संत ।। म्हणुनीया वंश जहाला अनुसयासूत ।। मस्तकी ठेवूनीया वरदहस्त कृतार्थ केले ते तेणेंची ।।२०।। आता मागील पहावे अनुसंधान ।। स्वामीने नाथाशीं दिंधले वचन ।। करऊ म्हणुनी तुज दत्त दर्शन ।। आठव मानसीं असो द्या ।।२१।। पुढे येताची शुक्रवार दिवस ।। स्वामी म्हणती नाथास ।। जाणे असे आजी उपवनास ।। आम्हा लागी सत्वरी ।।२२।। स्वामीची आज्ञा ती शिरी वंदून । पर्वतावरी जाती नाथ चढून ।। शिखरी जाता ते

सरोवर पाहून ।। काठौ तयाच्या बैसती ।।२३।। वन ते अत्यंत शोभायमान । वृक्ष वेली ते गेलेसे फुलून ।। ऐशा त्या उंचठायीं निर्मळ जीवन ।। तुडुंब सरोवरी भरलेसे ।।२४।। स्वामी ते बैसले दत्त ध्यानीं ।। नाथ ते वन शोभा पहाती नयनीं ।। तोची मलंग वेषधारी सामोरा येऊनी ।। बैसला तेथे अवचित ।।२५।। मलंगाचा वेष अत्यंत मलीन ।। गलिच्छ तैसे चर्म आच्छादन ।। भिक्षापात्र कटोरा करी घेऊन ।। येऊनी वनी त्या बैसला ।।२६।। काखे ती कामधेनु भिक्षेची झोळी ।। समागमें सवत्स कुत्री काळी ।। ऐसाहा मलंग तो नेत्रकमळीं ।। नाथ पहाती आपुल्या ।।२७।। तो अकस्मात ध्यान भंग होऊनी ।। स्वामीने देखीला मलंग नयनीं ।। धाऊनी तात्काळ मलंग चरणीं ।। माथा तो ठेविती आपुला ।।२८।। स्वामी लागी उठवून ।। मलंग त्यां देई मग प्रेमालिंगन ।। नाथ पहाती हे सर्वची दुरून ।। उभे राहुनी ठायीच ।।२९।। मलंग बोले मी क्षुधातूर ।। वेगी आणीरे काढूनी क्षीर ।। कुत्री कडेतो दाऊनी कर ।। भिक्षापात्र हाती दिधले ।।३०।। स्वामी तात्काळ उठोंनी झडकरी ।। कटोरा भिक्षांपात्र घेतले करीं ।। काढुनीया कुत्रीचे क्षीर सत्वरीं ।। मलंगा पुढे ते ठेविले ।।३१।। त्या माजी घालुनी भिक्षेचे अन्न ।। काला तो केलासे कटोरा भरून ।। एकासनी मग उभयतां बैसूनी ।। भोजन करीती प्रीतीने ।।३२।। प्रकार ऐसा पाहुनी नयनीं ।। नाथ दचकले आपुले मनीं ।। म्हणती स्वामीचा आचार आपणा लागुनी ।। विदीत असे सर्वची ।।३३।। इकडे चालीले अमृतभोजन ।। नाथ पहाती सर्वची दुरून ।। मिटक्या मारीती दोघे जण ।। वेळो वेळीं जेविता ।।३४।। उभयताची ज्ञान चर्चा ऐकुनी ।। नाथ तंद्रिमाजीं निमग्न मनीं ।। तोची

नाथ ऐशी हांक कानीं ।। येऊनी या पडली नाथाच्या ।।३५।। स्वामीचा शब्द येताचि कानी ।। नाथ गेले तेथे धावूनी ।। उच्छिष्ट कटोरा करीं घेऊनी ।। तात्काळ सरोवरी आणिला ।।३६।। त्या माजीं घालीताची जीवन ।। वरी तरंगले अन्नाचे कण ।। म्हणे जे कां स्वामीनें केले भोजन ।। अमृत निश्चित असेची ।।३७।। म्हणें हे उच्छिष्ट भागिरथी ।। उगीच का दवडावी आपुले हातीं ।। मुखीं तो कटोरा सत्वर गती ।। लळानी प्राशन केलासे ।।३८।। मागूती कटोरा स्वच्छ धुऊन ।। मलंगा सन्निध ठेविला आणून ।। मग उभयता लागी करूनी नमन ।। चरणीं मिठी मारीली ।।३९।। मलंग नाथाशी निजकरे उठवित ।। तो प्रत्यक्ष तीन शिरे सहा हात ।। देखुनीया मग पुन्हा दंडवत ।। नाथ घालीतीं प्रीतीनें ।।४०।। मग नाथाशी प्रेमे अलिंगून ।। स्वामीशी बोले तो यती वचन ।। म्हणें तुमचा शिष्य हा अवतारी पूर्ण ।। उद्धार करील सकळाचा ।।४१।। ऐसे बोलोनी झडकरी ।। कृपाहस्त ठेवोनी नाथ शिरीं ।। अंतर्धान पावला तेथेची सत्वरी ।। स्वामीचा सद्गुरू निश्चये ।।४२।। असो गुरू शिष्य निघाले तेथून ।। गडावरी येती ना लागताक्षण ।। स्वामी नाथाशी सांगती बैसून ।। निज खूण आपुली ।।४३।। शूळभंजन पर्वतावरी ।। जाई बा वेगें तेथे झडकरी ।। सूर्यकुंडा समिप जाऊन निर्धारी ।। अनुष्ठाना लागी बैसावे ।।४४।। नित्य राहूनीया तेथे मौन ।। चित्त करावे एकाग्रपूर्ण ।। माध्यान्ह होईतो श्रीहरिचे ध्यान ।। नित्यनेम ऐसाची ठेवावा ।।४५।।

काही साक्षात्कार जहालीयाविण ।। न यावे रे गृहीं त्या परतोन ।। यापरी नाथाशी ते सांगून ।। निरोप दिधला स्वामीनें ।।४६।। प्रत्यक्ष जाहली या दत्त दर्शन ।। मग अनुष्ठान करावया काय कारण

।। साशंकित जरी कां श्रोत्यांचे मन ।। तरी सावधान होऊनी परिसावे ।।४७।। जहाले ज्ञान दृढ व्हावया कारण ।। वैराग्य पाहिजे त्या लागून ।। वैराग्य साधावया अनुष्ठान । केलेचि पाहिजे निश्चयें ।।४८।। असो निरोप घेऊनी गुरू माऊलीचा ।। मार्ग धरला शूळभंजनाचा ।। भार सर्वस्वी योगक्षेमाचा ।। श्रीहरिवरी असेची ।।४९।। पाहून उत्तम ऐशा त्या रम्य स्थानी ।। नाथ बैसले तात्काळ अनुष्ठानी ।। तोची शेतकरी एक नित्यनेमें करूनी ।। प्राशना दुग्ध देतसे ।।५०।। तेज:पुंज ऐशा नाथा पाहून ।। शेतकऱ्याशी वाटले समाधान ।। आदरेचि मग तो प्राशना लागून ।। दुग्ध आणुनी देतसे ।।५१।। नित्या परी तो एकदां दुग्ध घेऊन ।। नाथा समिप येताची दचकले मन ।। नाथ शरीरी विळखा घालून महासर्प एक बैसला ।।५२।। अंगाशीं तो विळखा घातिला ।। फणातो मस्तकीं उभारिला ।। समाधिस्थ ऐशा त्या बालभक्ताला ।। जाणीव की किंचीत नसेची ।।५३।। भयानक ऐसे दुश्य पाहुन ।। अवचित ओरडला शेतकरी होऊन ।। समाधी भंग होताची विळखा काढून ।। महासर्प तो गेलासे ।।५४।। नाथ पहाती सावध होऊनी ।। तोची शेतकरी सांगे पुढे होऊनी ।। घडला वृत्तांत तो सर्वची ऐकुनी ।। नाथा उमगले ते सर्वची ।।५५।। नेत्री वाहती अश्रुधारा ।। म्हणेरे देवाधि देवा परमेश्वरा ।। काळसर्प तूं जहालाशी विश्वंभरा ।। रक्षावया मज दीनाशी ।।५६।। ऐसा आठव होता चित्तीं ।। अश्रू घळघळा नेत्रीं वाहतीं ।। तो तात्काल सावळी चतुर्भुंज मूर्ती ।। प्रगट जहालीसे तेथेचि ।।५७।। गोपालकृष्णाचे होताची दर्शन ।। नाथ धावूनी धरीती चरण ।। चौभुजी मग नाथा उठवून ।। प्रेमालिंगन ते दिधले ।।५८।। निष्काम सेवेचे फळ

।। शेतकऱ्या लागी मिळाले तात्काळ ।। दृष्टी देखीला घननीळ ।। समाधान पूर्ण जहाले त्यां ।।५९।। अघटित वृत्तांत हा घडला म्हणुन ।। नाथ निघाले तत्काल तेथून ।। गडा येऊनीया स्वामीचे दर्शन ।। घेऊनी वृत्तांत कथीयेला ।।६०।। ऐकुनीया ऐशा वृत्तांताला ।। स्वामीलागी परमानंद जहाला ।। म्हणती येऊनीया बाप्पा नरदेहाला ।। साधावया पाहिजे ते साधिले ।।६१।। असो स्वामी म्हणती ते नाथाशीं ।। आपण जाऊरे आता तीर्थ यात्रेशी ।। पंचवटी आणि त्या त्र्यंबकेश्वराशी ।। जाऊनी येऊरे माघारी ।।६२।। मग सुमुहूर्त पाहूनी उत्तम दिन । गुरू शिष्य निघाले यात्रेंलागून ।। द्वया अश्वावरी ते आरूढोन ।। मार्ग क्रमीती स्वानंदे ।।६३।। गोदावरी उत्तर तीरीं ।। चंद्रावती नामे होती नगरी ।। चंद्रभट्टद्विज येऊनी सामोरीं ।। स्वगृहीं नेले उभयतां ।।६४।। उभयतांचा करूनी परमादर ।। चतु:श्लोकी भागवत सांगती साचार ।। स्वामीचे सुखावोनी अंतर ।। नाथा बोलती तत्क्षणीं ।।६५।। म्हणती महाराष्ट्र भाषी साचार टिका लिहावी भागवतावर ।। तरीं वरदहस्त माऊलींचा शिरावर ।। असता मग चिंता कासया ।।६६।। चतु:श्लोकी भागवताचे लेखन ।। नाथानें संपविले तेथेचीं राहून ।। परमानंद जहाला स्वामी लागून ।। टीका ती ऐकता सहजची ।।६७।। घट मृत्तिकेशी विलोकिता जाण ।। कीं अलंकारादि आणि सुवर्ण ।। अथवा तंतु पट देखीलीया वाटे दोन ।। अज्ञानेंची समस्तां ।।६८।। तैशापरी जग आणि जगज्जींवन ।। आम्हां भासती पदार्थ दोन ।। विचारे पाहता तरी हे अभिन्न ।। रज्जु सर्प ज्यापरी ।।६९।। विवर्तरूप जग हे भासे पूर्ण ।। परी ब्रह्मची असे त्यां आधिष्ठान ।। नामरूप सर्वंची जाता निघोन ।। अंती उरी ब्रह्मची

।।७०।। पाहता चतु:श्लोकी भागवत ।। एवढाची तेथीचा मथितार्थ ।। भूताभास गेलीया समस्त ।। अधिष्ठान उरे एकचीं ।।७१।। असो पंचवटी त्या त्र्यंबकेश्वरीं जाऊन ।। यथा विधी केली यात्रा पूर्ण ।। पुढे नाथाशी ते स्वामी सांगती होऊन ।। दक्षिणोत्तर तीर्थे ती कराया ।।७२।। नाथालागी या परी सांगून ।। गडावरी आले स्वामी निघोन ।। इकडे नाथ गुरूआज्ञा म्हणोन ।। यथाविधी तीर्थे करीताती ।।७३।। असो पुर्वानुसंधान मनी ठेवून ।। प्रतिष्ठानीचे वृत्त परिसावे पूर्ण ।। आजा आजीचे कंठी प्राण ।। नाथालागी आलेसे ।।७४।। नाथाचा विरहाग्नि जाण ।। न साहेची त्या उभयता लागून ।। दु:खाग्निमाजीं होरपळून ।। गेली असती उभयतां ।।७५।। वंशतंतू हा आमुचा म्हणती ।। दु:खे धबधबा ह्रदय पिटीती ।। शोध तयाचा आम्हाप्रती ।। न लागेची सर्वथा ।।७६।। तोची वृद्धाशी कळली मात ।। कीं देवगडीं असे तुमचा नाथ ।। क्षण न दवडीता जावया त्वरित ।। मार्ग धरीती गडाचा ।।७७।। अतिकष्टेची मार्ग क्रमून ।। स्वामीचे घेतले येऊनी दर्शन ।। रूदन स्वरें वृत्तांत पूर्ण ।। स्वामी लागी कथीयेला ।।७८।। नातवाची आठव ते येताची मनीं ।। भडभडून आले त्या उभयता लागुनी ।। स्वामी चरणी ती मिठी मारूनी ।। स्फुंद स्फुंदोनी रडताती ।।७९।। वृद्धाची अवस्था पाहुनी ।। गहिवर आला स्वामी लागोनी ।। उठवोनी उभयता मग सन्निध बैसवोनी ।। समाधान करीती तयाचे ।।८०।। म्हणती नाथाचा तो अधिकार ।। काय सांगुहो मी तुम्हा साचार ।। प्रत्यक्ष असे हा ईश्वरी अवतार ।। जडजीव उद्धारा आलासे ।।८१।। तुम्ही असावे शांतमनीं ।। नाथ येईल यात्रा करूनी ।। आदरे बहुत्या उभयता लागुनी ।। ठेवूनीया तेथेची घेतले

।।८२।। परी उभयता उदास चित्तीं ।। स्वामी लागी येऊनी प्रार्थीती ।। म्हणती नाथ यापुढे गृहाप्रतीं ।। येईल ऐसेची करावे ।।८३।। मनीचा आशय ओळखून ।। स्वामी म्हणती उभयता लागून ।। कीं पत्र एक देतो तुम्हाशी लीहून ।। चिंता न करावी मानसी ।।८४।। पत्र लिहीले ऐशारीता । कीं गृहींच तूं असावे या पुढती ।। सुखी करावे उभयाप्रती ।। निज सेवेनी आपुल्या ।।८५।। असो स्वामीचे ते आज्ञा पत्र घेऊन । प्रतिष्ठानी तात्काळ राहीले येऊन ।। इच्छा एकची असे मनातून ।। कीं भेटी व्हावी नाथाची ।।८६।। इतुका काळ लोटल्यावरी ।। नाथ येतील पैठणा भितरी ।। पुढील अध्यायी ती कथा निर्धारी ।। येईल सुरस परियेसा ।।८७।। आजा आजी नातवाची भेटी ।। हृदयभेदक हा प्रसंग दृष्टीं ।। प्रसंग वदविता असे जगजेठी ।। वासुदेव निमित्त असेची ।।८८।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार ।*

*चतुर्थोऽध्याय: ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय ५ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गोपालकृष्णायनमः । जयजयाजी लक्ष्मीरमणा ।। आदिपुरूषा नारायणा ।। असुरांत का मुरमर्दना ।। प्रल्हाद रक्षका नरहरे ।।१।। जगच्चालक तूं जगज्जीवन ।। सकळाशी अससी तू अधिष्ठान ।। उत्पत्ती स्थिती त्या लयाशी कारण ।। तुची अससी गा श्रीहरि ।।२।। तुझीया सतेंवाचून ।। किंचितहि कार्य न घडे कोणा कडून ।। जगज्जीवना तू कृपे येथून ।। लीलामृताते बोलवी ।।३।। स्वामीने सांगीतले वृद्धा लागून ।। नाथ आता येईल यात्रा करून ।। पत्र दिधले वृद्धाशी लिहून ।। आशय मनीचा जाणूनी ।।४।। स्वामीचा निरोप घेऊन ।। आजा आजीं राहिले पैठणीं येऊन ।। गताध्यायीं जहाले ते येवढेचि कथन ।। आठव असोद्या हा मानसी ।।५।। असे तीर्थापाठी तीर्थे करूनी ।। नाथ राहिले जुनागडीं येऊनी ।। तो अकस्माताची जन्म भुमीचा आठव मनीं ।। नाथालागी जहालासे ।।६।। आठव होताची ऐसा मनीं ।। नाथ निघाले तात्काळ तेथूनी ।। मार्ग क्रमोनीया निशीदिनी ।। प्रतिष्ठान नयनी देखीले ।।७।। जन्मभुमीचे होताच दर्शन ।। नाथा वाटले समाधान ।। गोदातीर ऐसे हे पुण्यपावन ।। पाहुनी आल्हाद वाटला ।।८।। नाथ म्हणती आपणाशी आपण ।। अवधी बारा वर्षाचा पूर्ण निघुनीया गेलासे मज ग्राम सोडून ।। सहजासहजी आजवरी ।।९।। यापरी विचार करूनीया अंतरी ।। प्रवेश केला ग्रामाभितरीं ।। तो दर्शना लागी नरनारी ।। असंख्य येती नाथाच्या ।।१०।। समुदाय ऐशारिती लोटला ।। मार्ग न मिळे जावयाला ।। देखुनीया ऐशा बालभक्ताला ।। आनंद सकळाशी होतसे ।।११।। समुदाय

देखुनीया ऐसा भारी ।। नवल वाटले नाथाचे अंतरी ।। मग तेथेची बैसुनीया पिंपळपारी ।। क्षेम समाचार पुसती ।।१२।। तेज:पुंज ऐसा हा महात्मा पाहुनी ।। लोक दर्शनाते येती धावूनी ।। परस्पराच्या बोलावरूनी ।। संबंध नाथाचा कळालासे ।।१३।। भानुदास कुळींचा हा महात्मा थोर ।। कळले समस्तां लागी ते सत्वर ।। वायु वेगे हा सकळ समाचार ।। समस्तां श्रुत जहालासे ।।१४।। श्रुत होताची त्या वृद्धालागुनी ।। निघती यष्टीका करी घेऊनी ।। मार्गी चालता शिण येऊनी ।। ठायी ठायी बैसती ।।१५।। तोची कोणी येऊनी नाथा सांगती ।। कीं आजा आजी भेटाया येती ।। नाथ उठोनीया मग सत्वर गती ।। सामोरा धावती भेटाया ।।१६।। अर्ध्या मार्गी येऊन ।। नाथ धरीती वृद्धाचे चरण ।। आजा आजीस वाटले काय निधान ।। सापडले आजी आम्हांशी ।।१७।। ह्रदयीं धरीताची नाथालागुनी ।। अश्रुधारा वाहती लोचनीं ।। शब्द न निघे मुखातुनी ।। काही केल्याची सर्वथा ।।१८।। ह्रदयभेदक प्रसंग पाहुनी ।। सकळाशीच दु:ख जहाले मनीं ।। कोणी न बोलती कोणा लागूनी ।। क्षण एक गेला ऐसाची ।।१९।। मग मिळोनीया थोर सान ।। आजा आजीचे त्या करीती समाधान ।। म्हणती नातु तो तुमचा भेटला येऊन ।। मग व्यर्थ चिंता ही कासया ।।२०।। मग कापऱ्या स्वरेची ते भाषण ।। आजा आजी म्हणती नाथालागून ।। आता तरी तूंवा येथेची राहून ।। सांभाळ करीरे आमुचा ।।२१।। ऐसे ऐकताची करूणावचन ।। गहिवरले मग नाथाचे मन ।। म्हणती आधी गुरूआज्ञा घेऊन ।। मागुता विचार करावा ।।२२।।

तोची गाठीचे पत्र काढून ।। नाथाकरी दिधले आपण होऊन ।। गुरू हस्ताक्षर तात्काळ पाहुन

।। वंदन त्या आधी केलेसे ।।२३।। पत्रातील आशय पाहुन ।। म्हणती गुरूआज्ञा मज प्रमाण ।। यापुढे आता मी येथेची राहीन ।। विश्वास मानसीं असो द्या ।।२४।। ज्या ठायीं गुरूआज्ञा पाहिली ।। तेथेची नाथाने वस्ती केली ।। भजन पूजनादि सदासर्वकाळी ।। यथा पद्धती होतसे ।।२५।। गावीचे सकळजन ।। भजना लागी येती मीळोन ।। तैसे कीर्तनादि पुराण श्रवण ।। करावया येती प्रीतीनें ।।२६।। नाथ सांगती जे जे वचन ।। सकळ लोक मानीती ते ते प्रमाण ।। भाव जडलासे नाथावरी पूर्ण ।। एकसरेची सारीखा ।।२७।। ईश्वरावरी भाव ठेवून ।। जोका प्रपंची वर्ते रात्रंदिन ।। त्याचा योगक्षेम सर्वची जाण ।। अंगेची चालवी श्रीहरि ।।२८।। नाथाची पर्ण कुटिका होती जेथें ।। टोलेजंग वाडा तो जहाला तेथें ।। ईश्वरकरणी ही अज्ञान जीवातें ।। न कळेची काही सर्वथा ।।२९।। अन्नवस्त्रादि वस्तु त्या पाही ।। नाथा न पडेची उणें कांही ।। आजा आजीस ते पाहुनी सर्वही ।। नित्यानंद होतसे ।।३०।। कुलधर्म कुलाचार यथा पद्धती ।। नाथ सर्वची यथासांग करीती ।। पंचपक्वान्नाच्या नित्य पंक्ति ।। नाना निमित्तें होताती ।।३१।। एकदां जन्माष्टमी उत्सव आला ।। निमंत्रण दिधले समस्ताला ।। असंख्य समुदाय जमा जहाला ।। मिती नाही तयाची ।।३२।। दिवसा सुग्रास भोजन ।। रात्रौ चाले अखंड कीर्तन ।। दृष्टी ठेवूनी समसमान ।। नाथ वर्तती सर्वदा ।।३३।। भागवत धर्म ऐशा रीती ।। नाथ वाढविती दिवसराती ।। या योगें चोहीकडे कीर्ती ।। होऊनी उत्सव चालीला ।।३४।। उत्सवाची ऐशी ती मात । स्वामी लागी कळली समस्त ।। मग ते स्वानंदेची परीवारासहीत ।। प्रतिष्ठानी पातले ।।३५।। नाथगृहीं येताची द्वारावर ।। द्वार

रक्षक देखीला अत्रिकुमार ।। मग साष्टांग करूनीया नमस्कार ।। पायीं मिठी घाली ।।३६।। ऐसा महाराज तो अत्रिसूत्र ।। स्वामीचे कर्णी सांगतसे मात ।। म्हणे नाथ हा साक्षात् लक्ष्मीकांत ।। भानुदास कुळीं तो आलासे ।।३७।। नाथगृहींची कामे करीता जाण ।। न वाटे आम्हाशी ती थोर सान ।। तो नाथाशीं सांगती कोणी ते येऊन ।। स्वामीस आले म्हणोनीया ।।३८।। तो तात्काळची मग सामोरा येऊन ।। नाथ वंदिती स्वामीचे चरण ।। उच्चासनीं बैसवीती आणूनी ।। आनंद न माये अंतरी ।।३९।। इकडे संतर्पणे उठती ।। सकळाची होय सारीखी तृप्ती ।। नाम घोष सारीखा दिवसराती ।। एकसरेची होतसे ।।४०।। ऐशीही उत्साहाचिये वेळी ।। येऊनी भेटली सद्गुरू माऊली ।। नाथाचा आनंद गगन मंडळी ।। भरूनीया सर्वत्र गेलासे ।।४१।। पुढे यथा समयीं काला करून ।। प्रसाद दिधला समस्ता लागून ।। शेवटी हरिनामाचा गजर होऊन ।। सोहळा संपूर्ण जहालासे ।।४२।। असो आजा आजी पुढे होऊन ।। स्वामीते सांगती संकेते करून ।। वंशवृक्ष आमुचा जातसे सुकोन ।। दारूण चिंता ही असेकी ।।४३।। वृद्धाचा मानस ओळखून ।। स्वामी म्हणती नाथा लागून ।। गृहस्थाश्रमाची दीक्षा घेऊन ।। सुखी करावे आम्हासी ।।४४।। नाथ म्हणती कर जोडून ।। स्वामीची आज्ञा मज प्रमाण ।। मग स्वामी तात्काळ निरोप घेऊन ।। गडा आलेसे परतोनी ।।४५।। पाठी असता रूक्मिणीरमण ।। उणे न पडे त्या भक्तालागून ।। ती सत्पात्र द्विज एक कन्या घेऊन ।। नाथगृहीं तो पातला ।।४६।। त्याशी आधीच जहाला दृष्टांत । कीं कन्या द्यावी भानुदास कुळांत ।। जामात करावा संत एकनाथ ।। उद्धार तुमचा याचेनी ।।४७।। असो

आजा आजीलागी भेटून ।। पदरीं घ्या म्हणतसे मजलागून ।। घटी गोत्र मग सर्वची पाहून ।। मुहूर्त सन्निध धरीयेला ।।४८।। निमंत्रणे दिधली सकळाप्रतीं ।। लोक समुदाय जमलासे अती ।। सगे सोयरे त्या माजीं असती ।। उद्धवादि सर्वची पातले ।।४९।। लग्नाचा सर्वची भार ।। उद्धवाने घेतला आपल्यावर ।। शुभ मंगल होऊन विवाह संस्कार ।। यथाविधी संपविला ।।५०।। चार दिवस अन्नदान ।। चालु होते रात्रंदिन ।। लग्न सोहळा या रिती होऊन ।। आनंद सकळाशी जाहला ।।५१।। नाथ गिरजेचा जोडा पाहून ।। साक्षात् वाटे कीं लक्ष्मीनारायण ।। आजा आजीस वधुवरा पाहुन ।। समाधान मनस्वी जाहले ।।५२।। गिरीजेचे करावया गुणवर्णन ।। सामर्थ्य नोहे मजलागून ।। नाथ स्वभावाशी ती अनुकुल पूर्ण ।। मथितार्थ येवढाची येथीचा ।।५३।। अल्पची लोटता ऐंसा काळ ।। गिरीजेच्या श्रमाचे विलोकाचे फळ ।। नाथगृह नोहे ते नांदते गोकुळ ।। करूनीया ठेविले साध्वीनें ।।५४।। गृहस्थाश्रम ऐसा नाथाचा पाहून ।। आजा आजी गेले निजधामा लागून ।। द्वैताद्वैता ते एकरूप देऊन ।। नाथ संसारीं वर्तती ।।५५।। उद्धव जो आला तो येथेची राहिला ।। व्यवहार सर्वची तो पाहु लागला ।। गिरीजा ती पहातसे गृहकाजाला ।। नाथ मोकळे परमार्थी ।।५६।। निष्काम असावा परमार्थ ।। कामना नसावी तेथे किंचित ।। तरीच सापडे रमाकांत ।। त्या विण हाती गवसेना ।।५७।। जेणें कामनायुक्त परमार्थ केला ।। देव देऊनीयां होतो त्या मोकळा ।। त्याचा योगक्षेम मग पाहावयाला ।। मागुता कारण नसेची ।।५८।। निष्काम परमार्थाची गोडी ।। हरिलागी चाखावया बहुआवडी ।। थोरपण सांडुनी जो गोप गडी ।। स्वानंदेची जहाला ।।५९।।

एकदां श्रीकृष्ण आणी मनीं ।। कीं नाथाचा संसार पहावा जाऊनी ।। द्विज रूप मग तात्काळ धरूनी ।। नाथ गृहीं आलासे ।।६०।। सामोरा देखताची ब्राह्मण ।। नाथ करीती त्या आधी नमन ।। मागुता आसनी त्या बैसऊन ।। क्षेम समाचार पुसती ।।६१।। म्हणती स्वामीचे आगमन । जहाले असे आजी कोठून ।। उद्देश तैसे नामाभिधान ।। सांगूनी संशय फेडावा ।।६२।। तोची श्रीहरी बोले वचन ।। मी तो असे अनाथ ब्राह्मण ।। श्रीखंड्या ऐसे नामाभिधान ।। ठाव मज नसेची वस्तीचा ।।६३।। परिवार माझा विलक्षण ।। पुत्र गृहीं असती दोन ।। एक विषयीं दुसरा तो संताचे छळण ।। सदासर्वदा करीतसे ।।६४।। कांता असेची अविचारी ।। नित्य हिंडे दारोदारी ।। स्वामीची कीर्ती ऐकुनी अंतरी ।। रहावया आलो मी येथेची ।।६५।। तरी मजवरी कृपा करूनी ।। आश्रय द्यावाजी आपुले चरणी ।। सेवा करूनी आपुले सदनीं ।। कृतार्थ होईन निश्चये ।।६६।। ऐकुनी ब्राह्मणाचा वृत्तांत ।। सुखे राहावे म्हणती नाथ ।। अविश्रांत ऐशी सेवा सतत ।। करिता द्वादश वर्षे ती लोटली ।।६७।। शुद्ध गंगेचे निर्मळ जीवन ।। अंगेची आणी जगज्जीवन ।। पूजा सामग्री तयार करून ।। नित्य देत नाथाशी ।।६८।। अधिक ते सांगावे तुम्हा किती ।। पडल्या कामा करी श्रीपती ।। इकडे द्वारकेच्या घटने प्रती ।। सादर तुम्ही परीसावे ।।६९।। सात्विक श्रद्धाळु एक ब्राह्मण ।। अनुष्ठाना लागी द्वारकेशी येऊन ।। श्रद्धायुक्त मांडीले अनुष्ठान ।। प्रत्यक्ष दर्शन व्हावया ।।७०।। अमित काळ अनुष्ठानी लोटला ।। परी प्रत्यक्ष दर्शन न होय त्या ब्राह्मणाला ।। मागुती बैसता अनुष्ठानाला ।। तो स्वप्नीं दृष्टांत जाहला ।।७१।। म्हणेरे तुज पाहीजे प्रत्यक्ष दर्शन ।। तरी

पैठणी तूं नाथगृहीं चे निघोन ।। श्रीखंड्या नामे मी ब्राह्मण होऊन ।। सेवा करीतो नाथाची ।।७२।। अंतरीचे स्वप्न आठवून ।। अविलंबे निघाला ब्राह्मण ।। पैठणी येता श्रीखंड्यास पाहून ।। गृह विचारी नाथाचे ।।७३।। संकेतेची श्रीखंड्या दावी दुरून ।। मनीं म्हणे आले हे सेवेशी विघ्न ।। असो द्विज इकडे तात्काळ येऊन ।। नाथा नमन केलेसे ।।७४।। नाथांनी ब्राह्मणाशी नमिले ।। क्षेम कुशलादि प्रश्न पुसीले ।। म्हणती कार्य नि:शक सांगावे आपुले ।। आगमन कैसे जाहले ।।७५।। ब्राह्मण बोले कर जोडून ।। मज पाहीजे श्रीहरिचे दर्शन ।। नाथ म्हणती विनयेची हासून ।। श्रीहरि सर्वत्र भरलासे ।।७६।। हा शास्त्रार्थ मी आजवरी ऐकिला ।। अनुभव रोकडा पाहिजे मला ।। हे कोरडे पांडित्य ऐकावयाला ।। आलो नसेची येथवरी ।।७७।। श्रीखंड्या नावाने श्रीहरि ।। नित्य राबतो तुमच्या घरीं ।। मज दृष्टांत जाहला याचपरीं ।। बोलवा आधी तयातें ।।७८।। ऐसे ऐकता विप्राचे वचन ।। गडबडले नाथांचे अंत:करण ।। श्रीखंड्या श्रीखंड्या करीतची तेथून ।। उठोनिया शोधीती अंगेची ।।७९।। परी श्रीखंड्या बाहेर गेला तो गेला ।। पुन्हा तो परतोनी नाहीच आला ।। ऐसे देखुनीया त्या नाथ दु:खाला ।। अंत नसेची राहिला ।।८०।। नाथ म्हणती दुखें करून ।। कवण्यातोंडे आळवू तुज लागून ।। नाही ती सर्व कामे तुज हातून ।। करूनीया मी घेतीली ।।८१।। अनावर ऐसा शोक जहाला ।। न देखवेची तो कवणाशी डोळा ।। तोची चतुर्भुज द्वारकेचा सावळा ।। प्रगटला प्रत्यक्ष मंदिरीं ।।८२।। प्रकाश पडताची मंदिरी ।। साक्षात देखिला श्रीहरि ।। मूर्ती सावळी ती गोजीरी ।। चतुर्भुज प्रत्यक्ष देखीली ।।८३।। नाथ

गडबडा लोळती चरणीं ।। निजकरें उठवी त्या चक्रपाणी ।। म्हणे मी स्वयेची कष्टलो आपण होऊनी ।। अपराध तुमचा नसेची ।।८४।। ब्राह्मणाशी प्रत्यक्ष दर्शन जहाले ।। अनुष्ठानाचे श्रम फळा आले ।। नाथ ब्राह्मण परस्पर भेटले ।। उपकारी म्हणती ते अन्योन्या ।।८५।। पुढील अध्यायीं नाथ होऊन ।। भागवत धर्म सांगतील विस्तारोन ।। वासुदेव प्रार्थी तुम्हा लागून ।। श्रवणीं सादर असावे।।८६।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार ।*

*पंचमोध्याय: ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय ६ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यैनमः । श्री गोपालकृष्णायनमः । जयजयाजी कमललोचना ।। कमलपत्राक्षा । देवकीनंदना पांडवरक्षका यदुकुलभूषणा ।। जगदात्मा तूं जगत्पते ।।१।।

तुझीया स्मरणेंची भवबंधन ।। तुटोनीया जायते न लागता क्षण ।। ऐसे असोनीया तुज यशोदा येऊन ।। बांधु पाहे उखळाशी ।।२।। तुझ्या लीला त्या अगम्य असती ।। कुंठीत होय सकळाची मती ।। अर्जुन सखया तूं रमापती ।। पुढे लीलामृत बोलवी।।३।। नाथाचे दु:ख अनिवार पाहून ।। मंदिरी प्रगटला मनमोहन ।। नाथ ब्राह्मणां दिधले दर्शन ।। गत कथार्त इतुका ।।४।। असो कर्मकांडी नाही कोणाचेचि मन ।। जे करीती त्या न साधेची यत्ने करून ।। मग सर्वची जहालो न केल्यासमान ।। लाभ तो कोणता ऐसे नो ।।५।। यालागी सुलभ करावे साधन ।। कीं ज्यामाजी रूची होय सकळालागून ।। परमार्थीही गोडी लागावी म्हणून ।। ऐसाची यत्न करावा ।।६।। ऐसा आशय मनीं ठेवुन ।। नाथ करींती रात्रौ किर्तन ।। श्रवणा येती भाविकजन ।। नित्य नेम ऐसा चालीला ।।७।। पैठणी चोहीकडे पसरली मात । कीं रात्रौ किर्तन होतसे मंदिरात ।। येर येरां म्हणती जाऊ समस्त ।। श्रवणालागी सर्वची ।।८।। किती एक म्हणती श्रवणा येऊन ।। व्यर्थ शिण वाटे आम्हालागून ।। उमजेना बुवाचे शास्त्रीय भाषण ।। मग येणे जाणे व्यर्थची ।।९।। तोची दुजा बोले समस्ता लागुनीं ।। अवश्य चलावे म्हणे आपण कीर्तनी ।। कांही नाही तरी रामनाम कानीं ।। येईल सहजची आपुल्या ।।१०।।यापरी नित्याचा हा गलबला ।। नाथाच्या कानीं सहजची

आला ।। नाथांना प्रश्न हा जीवी लागला ।। मार्ग धरीला मग वेगळाची ।।११।। कोण्याही मिषें करून ।। घडावे सकळाते हरि चिंतन ।। ज्या योगें परमार्थी लागुनी मन ।। सार्थक होईल जन्माचे ।।१२।। भोळे भाविक अज्ञानी जन ।। येती नित्य ते श्रवणालागून ।। त्यांचीच भाषा मग नाथ उचलून ।। निरूपण सांगती समस्तां ।।१३।। व्यवहारा माजी ते जे जे करीती ।। तेची कीर्तनी नाथ सांगती ।। परमार्थ ऐसा सुलभ रीती ।। समजावूनी देती समस्तां ।।१४।। हमामा हुमरी जोशी पिंगळा ।। दृष्टांत हेची सांगती सकळां ।। परिचीत म्हणुनीया सर्व लोकाला ।। ठसु लागले कीं अंतरी ।।१५।। दिवसे दिवस यापरी कीर्तनाला ।। असंख्य समुदाय येऊ लागला ।। वेडची ऐसे हे पैठणीं सकळा ।। एकसरेची लागले ।।१६।। येरयेरा माजीं बोलती वचन ।। व्यवहारची सांगती हा परमार्थ करून ।। काय तो जोशी आणि ती कोल्हाटीण ।। त्यामाजीं परमार्थ भरलासे ।।१७।। असो मृदंगी थाप पडताची जाण ।। लोक येती चोहीकडोन ।। हातीचे काम सर्व सांडून ।। कीर्तनी येती साक्षेपें ।।१८।। मग असो का भलत्या याती ।। मज्जाव नसेची कोणा प्रति ।। नित्यनाम गजर ऐशा रीती ।। होतसे सर्वदा ।।१९।। भक्ती मार्गाचा उदय जाहला ।। नामस्मरणीं सकळाचा भाव जडला ।। न पुसती मग कोणीं कर्मकांडाला ।। एकसरेची सर्वथा ।।२०।। नामस्मरण आवडे सकळा भारूडाचा मार्ग जो का अवलंबिला ।। सकळाचे मनी तों अधीकची ठसला ।। विसरूनिया मग देहभावाला ।। ब्रह्मनंदे सर्वचि नाचती ।।२१।।नाथांचा देखुनी बोलबाला ।। वैदिक वर्ग सर्वची खवळला ।। तैसाची शास्त्री पंडीताचा मेळा ।। द्वेष करीती नाथाचा ।।२२।। म्हणती वेदधर्म

त्यानीच बुडविला ।। प्रधानता दिधलीसे भक्तिला ।। कर्ममार्ग धूळीं मेळविला ।। लोकां सांगुनी कीर्तनी ।।२३।। पैठण म्हणजे शास्त्री पंडितांचे माहेरघर ।। येथे न साहेचि हा अनाचार ।। संत भक्ताचे खरे अंतर ।। कैसे कळावे या पंडिता ।।२४।। शास्त्री पंडित म्हणजे शब्दज्ञानी ।। परमार्थ न कळे तो तया लागुनी ।। अहंकारा माजीं ते व्यर्थ पडोनी ।। सुविचार अंगीचा घालविती ।।२५।। कोणताही अभ्यास व्हावा पूर्ण ।। तरीच मावळे द्वैतपण ।। द्वैतपण गेलीया विदेही होऊन ।। संसार राहेती सर्वदा सहाजची ।।२६।। अपूर्ण ज्याचा अभ्यास जाहला ।। अहंकारें तो सर्वस्वी बुडाला ।। इहपर सुख मग कल्पांती त्याला ।। न साधेची सर्वथा ।।२७।। पैठणीची ती ऐशीच मात ।। नाथा नोळखती शास्त्री पंडित ।। द्वेषभाव ठेवूनी मनांत ।। निंदा करीती नाथाची ।।२८।। कोणी येऊनीया हे नाथा सांगती ।। नाथ तेथेची त्या उपदेशीती ।। आणीकाचे दोष ते न पहावे म्हणती ।। व्यर्थची शिणतो कासया ।।२९।। इकडे शास्त्री पंडीत उघड्यावरी ।। नाथा निंदीती लोका भितरीं ।। म्हणती हा असेहो दुराचारी । धर्म येणेंची बुडविला ।।३०।। कोणतेही निमित्त काढून ।। त्रास देऊ म्हणती नाथा लागुन ।। परी पाठीं त्या असे रूक्मिणी रमण ।। हे न कळेची पंडिता ।।३१।। वैदिक जीतुके कां खवळुनी म्हणती ।। कधी तरी नाथ येती हातीं ।। तो श्राद्धाचे आमंत्रण द्यावया प्रती ।। नाथ अवचीत पातले ।।३२।। श्राद्धाचे आमंत्रण घेऊन ।। आनंद जहाला ब्राह्मणा लागून ।। म्हणती काही तरी छिद्र काढून ।। छळ करू नाथाचा ।।३३।। असो श्राद्ध दिवस उजाडला ।। पंच पक्वान्नांचा बेत ठरला ।। उणे न पडेची साहित्याला ।। पाक निष्पत्ती होतसे ।।३४।। ऐसे रांधीले

सुग्रास अन्न ।। मकरंद सुटला चोहीकडोन ।। मार्गी त्या अंत्यजा सुवास येऊन ।। येर येरामाजी बोलती ।।३५।। म्हणती ऐसे अन्न आम्हा लागून ।। न मिळेची कल्पांती जाण ।। आम्ही एवढाची मकरंद घेऊन ।। समाधान अंतरी मानावे ।।३६।। संवाद ऐसा पडताची कानीं ।। दया उपजली नाथा लागुनी ।। म्हणती सर्वत्र भरलासे चक्रपाणी ।। मग यासी अतृप्त कंठेवावे ।।३७।। पत्नीची अनुमती घेऊन ।। पाचारिले मग अंत्यजा लागून ।। परी त्याचे संकोचीतची मन ।। पाहुनीया नाथ बोलती ।।३८।। म्हणती संकोच न ठेविता चित्तीं ।। बायालेकुरे आणावी सांगाती ।। आनंद होऊनी सकला चिंत्ती ।। सहपरिवारे मग आले ती ।।३९।। मार्गी घातल्या पत्रावाळी ।। अंत्यजाची बैसली मंडळी ।। पंचपक्वान्नांची ती वाढ जहाली ।। अद्वैतपणेंची सर्वथा ।।४०।। अवघे तृप्त होताची सानथोर ।। नाथा म्हणती ते साक्षात ईश्वर ।। नाथ नामाचा तो ऐसा गजर ।। करूनीया जाती माघारा ।।४१।। मागुती सडा सम्मार्जन शुद्ध करूनी ।। गृहादि घेतले सर्व सारूनी ।। पाक निष्पती पुन्हा करूनी ।। पाचारीती मग ब्राह्मणा ।।४२।। इकडे वायु वेगेची ही वार्ता ।। कळली एकसरेचि समस्तां ।। उघड्यावरी ते मग येऊनी नाथा ।। अद्वातद्वा बोलती ।।४३।। नाथ बोलाविती ब्राह्मणाला ।। पुनरपि म्हणती स्वयंपाक केला ।। रोषभरेची मग नाथाला ।। न येऊ म्हणती सर्वथा ।।४४।। आश्चर्य वाटते आमुचे चित्ती ।। आज आहे म्हणतोसी पितृतिथि ।। ब्राह्मणा आधी अंत्यजा प्रती ।। जेऊ घातिलेसी निर्लज्जा ।।४५।। पाहुनी ऐसा हा वृत्तांत ।। नाथा बैसले सचिंत ।। तोची श्रीखंड्या पुढे त्वरीत ।। होऊनी सांगे नाथाशी ।।४६।। म्हणे हो महाराजा न करावी

चिंता ।। वाढा वेगी त्या पत्रावळी आता ।। साक्षात् तुमचे ते पितर तत्वता ।। येतील निश्चय असोद्या ।।४७।। आगतम् उच्चार करिताचि झणीं ।। पितृत्रयीती बैसली येऊन ।। मग यथा सांग भोजन सारूनी ।। स्वस्थाना पितर गेलेसे ।।४८।। प्रत्यक्ष पितरां पाहुनी नयनीं ।। लज्जित जहाले ब्राह्मण मनीं ।। क्षण एकचित परी पश्चात्ताप होऊनी ।। शांत चित्तेची बैसती ।।४९।। साक्षात पितर ते प्रगट होऊनी ।। जेविले नाथ गृहीं येऊनी ।। समाचार ऐसा हा सर्वत्र पैठणीं ।। कुटाळ सांगती समस्तां ।।५०।। वैदिक सांगती समाचार सकळां ।। ऐकता शास्त्री पंडिता धक्काचि बैसला ।। क्षणैकचि ते मग त्या नाथाला ।। धन्यवाद तो देताती ।।५१।। परि जेवी श्वानपुच्छ करिता सरळ ।। मागुता तैसेचि होय ये तात्काल ।। तेवी पाहू म्हणती येईल वेळ ।। सूड तो उगवू नाथाचा ।।५२।। नाथ प्रत्यक्ष दयेची मूर्ती ।। वाईट ना चांगले कांहीच नेणति ।। सर्वांभूती तो रूक्मिणीपती ।। भाव अंतरी भरलासे ।।५३।। नित्य अक्रोधवृत्ति ठेवून ।। नाथ वर्तती रात्रं दिन ।। क्रोध कैसा कधी म्हणून ।। नाथाशीं नसे ठाऊका ।।५४।। पहा एकदा प्रसंग ऐसा घडून ।। आला कोणी पैठणीं ब्राह्मण ।। ग्रामामाजी हिंडे गृहा गृहातून ।। द्रव्यार्जन करिता स्वेच्छेचि ।।५५।। कुटाळ पुसती त्या बोलावुन ।। काहो हिंडतसाते कष्टी होऊन ।। विप्र बोले मज पाहिजे धन । मौजीबंधना कारणें ।।५६।। कुटाळ कंपु म्हणे ब्राह्मणाला ।। जरी का नाथाशी तुम्ही क्रोध आणिला । तरी रूपये ते देऊ दोनशे तुम्हाला ।। चिंतन करावी मानसीं ।।५७।। ब्राह्माणाचे लोभावले मन ।। म्हणे मी कार्य हे अवश्य करीन ।। सांगा मज नाथाचे ठावठिकाण ।। जाऊनिया येतो मी आताचि

।।५८।। नाथ ते ध्यानस्थ होते मंदिरी ।। ब्राह्मण गेला तेथे सत्वरी ।। पादत्राणांसह मांडीवरी ।। जाऊनी तात्काळ बसला ।।५९।। समाधि भंग होताचि नयनीं ।। मांडीवरी पाहिले द्विजालागुनी ।। मनी म्हणे कैसे काय हे आले घडोनी ।। न कळेचि कांही सर्वथा ।।६०।। नाथ म्हणती द्विजालागून ।। किती प्रेमी अहा हो आपण ।। पादत्राणहि न काढीता तैसेचीं येऊन ।। मांडीवरी बैसलाती ।।६१।। ऐकुनीया ऐसे शांतवचन ।। ब्राह्मणाचे ते जहाले खिन्न मन ।। प्रकार ऐसा हा सर्वचि दुरून ।। कुटाळ पाहती चोरूनि ।।६२।। ब्राह्मण बोले कुटाळा लागुनी ।। करीन आता मी अनुचित करणी ।। मग भोजन समयीं तो तात्काळ उठोनी ।। गिरीजे पाठी बैसला ।।६३।। ऐसे अनुचित कर्म ते पाहुनी ।। नाथ म्हणती पत्नी लागूनी ।। सांभाळगे भटजी पडू नयें धरणी ।। ऐसी चिंता वहावी ।।६४।। ऐसे ऐकताचि प्रेमाचे बोल ।। ओशाळुनि ब्राह्मण जहालासे खजील ।। दयासिंधु असे हा म्हणे केवळ ।। मग चरणीं मस्तक ठेविले ।।६५।। रोदन शब्देची मग ती मात ।। घडले जें जे सांगितले समस्त ।। नाथ म्हणती पूर्वी जरी हे सांगता वृत्त ।। तरी जहालो असतो क्रोधित ।।६६।। असो जे जे होणार ते चुकेना ।। दोन शत रूपये ते देती ब्राह्मणां ।। खजील होऊनी कुटिलजाणा ।। निजस्थाना गेले तात्काळ ।।६७।। द्वैतामाजीं ते अद्वैतपण । नाथाचे कैसे ते पहा आपण ।। एकदा प्रसंग आला ऐसाचि घडोन ।। सांगेन तोची तत्वता ।।६८।। जन समुदाय कीर्तना अपार ।। जमला त्यामाजी नारी नर ।। असती खळ दुर्जनादि साचार ।। कोणो न कोणा ओळखती ।।६९।। कीर्तन होताची प्रसाद आरती ।। समुदाय गेला सत्वरगती ।। तिघे तस्कर दडोनि बैसती

।। अंधारी मग तेथेचि ।।७०।। मध्यरात्र होताची ते उठति ।। उद्योग आपुला सकळ सारिती ।। मागुता तीघेहि मंदिरी येती ।। तो नयनी देखीले नाथाशी ।।७१।। नाथ दृष्टी पडताचि केवळ ।। अंध जहाले ते तिघे खळ ।। अंध होताचि खुंटले बळ ।। उपाय कांही सुचेना ।।७२।। जे जे का सामग्री साधीली ।। नाठवेचि मग ती कोठे ठेविली ।। चाचपितचि चालता तिघे पडली ।। शब्द तो अनावर जाहला ।।७३।। नाथ समाधि भंग होऊन ।। तात्काळ आले बाहेर धाऊन ।। तो तस्कर देखुनि तिघेजण ।। दया उपजली अंतरी ।।७४।। पत्नीशीं मग बोलावून ।। सांगती न कळे हे कोठील कोण ।। कोठे लागले पहा म्हणोन ।। उद्धवा लागी सांगती ।।७५।। तस्कर गेले ओशाळून ।। नाथचरणीं घेती लोळण ।। सर्वचित प्रकार नाथाशी सांगोन स्फुंद स्फुंदोनि रडताती ।।७६।। सर्व प्रकार आणुनी चित्तीं ।। नेत्रावरूनी हात फिरविती ।। तोचि पूर्ववत् ती तीघाप्रतीं ।। दृष्टी आलीसे तात्काळ ।।७७।। दृष्टी येताचि मग पायी लोळति ।। नाथा लागीते क्षमा मागती ।। नाथा म्हणती त्या खंतचित्तीं ।। करून येचि सर्वथा ।।७८।। कांतेसी म्हणतो हे उपवासी जाण ।। दिसती त्या घालावे आधी भोजन ।। गिरीजेनें तात्काळ तिनपात्रे मांडून ।। सुग्रास भोजन घातिले त्या ।।७९।। सामग्री जीका ठेविली बांधोनी ।। सर्वचि त्या पुढें ठेविती आणून ।। सुवर्ण मुद्रिका वरी देऊन ।। सुखे जा म्हणती घेऊनी ।।८०।। या परी पाहाताची नाथाचे वर्तन । पायावरी लोळती तिघेजण । घळघळा आश्रु वाहति नयनातून । शब्द नयची बोलता ।।८१।। लज्जीत होऊनीया अति ।। शपथ घेऊनिया नाथा सांगती ।। पुन्हां कर्म ऐसे हे न करू म्हणती ।। निरोप घेती तात्काळ

।।८२।। आले तेंव्हां ते तस्कर म्हणुनी ।। गेले आता पाहुणचार खाऊनी ।। द्वैता माजी अद्वैत आचरूनी ।। कैसे ते सकळाशी दाविले ।।८३।। लोह झगटताची परिसासी ।। सुवर्ण होय बावन्नकशी ।। तेवी तस्करसात्विक होऊनि घराशीं ।। निघोनिया जाती माघारा ।।८४।। असो नाथाचे केवळ दर्शन होता ।। दुष्टहित सात्विक होती तत्वता ।। ये विषयीं पैठणीं घडल्या वृत्तांता ।। सांगेन तुम्हाशी परियेसा ।।८५।। पैठणी ग्रामाचिये भितरी ।। यवन एक नित्य बैसे ओटयावरी ।। दुष्ट दुराचारी हा खळ निर्धारी ।। दु:ख देतसे समस्तां ।।८६।। एकदां नाथ त्याच मार्गानी ।। गंगास्नान आले सारूनी ।। तोचि दुष्टयवन हा पान खाऊनी ।। नाथावरी थुंकलासे ।।८७।। मागुता स्नान करोनी येती घरी ।। तो पुन्हां थुंकलासे नाथावरी ।। ऐशी अष्टोत्तरशत स्नाने होता निर्धारी ।। यवन लज्जित जहाला ।।८८।। नाथा लागुनी करी नमन ।। म्हणे क्षमा ती करावी मजलागून ।। नाथ त्या उठविती निजकरे धरून ।। विनयेचि बोलती तयातें ।।८९।। स्नाने ही सर्व व्हावया आम्हा लागून ।। बाप्पा तु जाहालाशी कारण ।। तुझा उपकार आम्हा लागून । न फिटेचि सर्वथा ।।९०।। दुष्ट दुराचारी तो यवन ।। सात्विक जाहलासे न लागता क्षण ।। केवळ दर्शन मात्रेंचि तो दुष्ट दुर्जन ।। सात्विक पूर्ण जाहलासे ।।९१।। प्रपंचा माजीं विवेक ठेवून । नाथ वर्तती रात्रंदिन ।। तोचि आदर्श पुढे ठेवून ।। प्रपंच आम्ही करावा ।।९२।। पुढील अध्यायी तेचीं दृष्टांत ।। येती परिसा देऊनी चित्त ।। वासुदेव प्रार्थी जोडूनि हस्त ।। पांडुरंग पुरविता म्हणोनीं ।।९३।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार । षष्टमोध्याय: । श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय ७ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतैनमः । श्रीगोपालकृष्णायनमः । जयजयाजी पुरूषोत्तमा ।। परब्रह्मरूपा तूं मेघश्यामा ।। रघुकुलभूषणा श्रीरामा ।। रावणांतका श्रीपते ।।१।। माया लाघवी तूं श्रीहरि ।। इचेनि योगें ती तुझी थोरी ।। अंगेंची नटुनिया चराचरीं ।। जगदाकार जाहलासी ।।२।। असो तुजवाचूनी मायेची सत्ता ।। काहीच नसेगा पंढरीनाथा ।। जगन्निवासा जगन्नाथा ।। पुढे चरित्र बोलवी ।।३।। दर्शन मात्रेचि दुष्ट यवन ।। तात्काळ जहालासे सात्विक पूर्ण ।। गताध्यायी जहालेचि कथन ।। आठव मानसीं असोद्या ।।४।। ईश्वरी सत्तेमाजीं कधींहि चुकोन ।। सिद्धिचा उपयोग न करावा आपण ।। केलीया सृष्टीक्रमतो जाय नासोन ।। शिकवण ऐशी ही नाथाची ।।५।। या विषयीच्या परिसावे वृत्तांताला ।। पैठणी यति एक होऊनि गेला ।। मार्गी चालता जे जे दृष्टीला ।। पडे त्या दंडवत करीतो ।।६।। नित्य दंडवत घाली म्हणून ।। दंडवत स्वामींच म्हणती त्यालागून ।। एकदा मार्गी जाता स्वामीते पाहून ।। कुटाळ त्यापाठी लागती ।।७।। मृत एक गाढव पडिले पाहूनी ।। कुटाळ म्हणती स्वामी लागुनी ।। दंडवत करा त्या गाढवा जाऊनी ।। चुकोनीया तो सहज राहिला ।।८।। खरालागीं त्या दंडवत घातिले ।। मृत असूनिया ते तात्काळ उठिले ।। ऐसे ऐकताचि तेथे नाथ आले ।। समाधी दिधली स्वामीते ।।९।। वार्ता सकळ पडिताची कानीं ।। शास्त्री पंडित आले धावूनी ।। दोष देती नाथा लागुनी ।। म्हणती ब्रह्महत्या तुज घडलीसे ।।१०।। ब्रह्महत्येचे नाव ऐकून ।। क्षण एक दचकले नाथाचे मन ।। निर्दोषी असता मज दूषण ।। व्यर्थ

कासा या लाविता ।।११।। शास्त्रीं पंडित कोरडे ज्ञानी ।। दोष देती नाथा लागुनी ।। तुम्ही निर्दोषी म्हणता आपणा मनीं ।। तरी वचन आमुचे परिसावे ।।१२।। तृणाची मागती पेंढी आणून ।। चारा म्हणती या नंदीलागून ।। पाषाण नंदी हा जरीका खाईन ।। तरीच निर्दोषी तुम्ही असा ।।१३।। नाथ ती पेंढीं घेवोनी हातीं ।। नंदिकेश्वरा तूं खावे म्हणती ।। तोचि पाषाण नंदी ती खाऊनी प्रीती ।। रवंथ करीत बैसला ।।१४।। लज्जित जहाले शास्त्री पंडित ।। आधो वंदनें पाहती समस्त ।। भाविक म्हणती महात्मा नाथ निर्दोषी सत्य असेकी ।।१५।। असो नाथ सांगती नंदीचे कर्णी ।। म्हणती रे जावे तू आता येथूनी ।। नंदी तात्काळ उडी घेऊनी ।। गंगेमाजीं प्रवेशला ।।१६।। नाथ दयेची केवळ मूर्ती ।। सर्वांठायीं दिसे रूक्मिणी पतीं ।। आप परभाव नसेची चित्ती ।। दृष्टांत तोची परियेसा ।।१७।। दोन प्रहर एकदां प्रखर उनीं ।। नाथ निघाले मध्यान्ह स्नानी ।। तो वाळवंटी मूल एक देखिले दुरूनि ।। जे कां आक्रंदोनी नाचत ।।१८।। प्रखर पडले ऐसे ऊन ।। वाळवंट तापले अग्निसमान ।। मूल रडतसे ते नाच नाचून । परी न पाहेचि कोणी त्याकडे ।।१९।। शास्त्री पंडितांचा तो काळ ।। कैसे शिवावे महाराचे मूल ।। शिवता आमुचे होईल छळ ।। धाक हाचि समस्ता ।।२०।। नाथ तेथें धाऊनी गेले ।। उचलोनिया मुला कडिये घेतले ।। नेऊनीया त्या गृहीं पोंहचविले ।। माय बाप त्याचे शोधुनी ।।२१।। सकळांशी वाटे हे विपरीत ।। परी धर्म तो हाचि असे यथार्थ ।। भूतमात्रीं दया सतत ।। अंतरीं असावी सर्वदा ।।२२।। शास्त्री पंडीत हे शब्द ज्ञानी ।। सत्य धर्म तो नुमजे त्या लागुनी ।। अभिमान डोहीं गेलेसे बुडोनी ।। व्यर्थ गलबला करिताती ।।२३।। उदंड

शास्त्राचा अभ्यास केला ।। परीं आचरणा माजीं नाहीं आणिला ।। काय करावे त्या अभ्यासाला ।। व्यर्थ शीण जाणावा ।।२४।। ऐसे हे शास्त्री पंडीत साचार ।। कैसे कळावे त्या नाथाचे अंतर ।। वायाची कोलाहल निरंतर ।। करूनिया नाथा दंडिती ।।२५।। शास्त्री पंडिताशी मी विरोधि म्हणुनी ।। ऐसे न समजावें कोणी मनीं ।। ज्याही अभ्यासापरी दाविले आचरोनी ।। ते वंद्य असति मज सर्वदा ।।२६।। असो नाथ असती शांती सागर ।। नित्य त्या प्रार्थीती जोडोनी कर ।। म्हणती भूदेव तुम्ही आम्हा साचार ।। शब्द प्रमाण तुमचा ।।२७।। सर्वांतरी भरलासे विठ्ठल ।। जाणता की भूदेव तुम्ही सकळ ।। मग उचलिता अंत्यजाचे मूल ।। कवण दोष नुमजेचीं ।।२८।। जरी म्हणाल दोष घडला ।। तरी घेऊ आम्ही प्रायश्चित्ताला ।। तुमचा शब्दचि तो प्रमाण आम्हाला ।। सत्यसर्वदा असेचि ।।२९।। परी पालथे घागरीये पाणी घालिता ।। लाभ नसेचि दृष्टि पाहता ।। तैसे या अभिमानी शास्त्री पंडिता ।। उमज पडेना कल्पांती ।।३०।। प्रत्यक्ष नाथाचा पुत्र हरिपंडित ।। विपरीत कृत्यें समजुनी समस्त ।। सहकुटुंब गेला निघोनि त्वरित ।। वाराणशीं वास्तव्य कराया ।।३१।। तेथेचि करूनिया गृहविस्तीर्ण ।। पुत्रकलत्रेशी राहिला जाऊन ।। आगाध तयाची विद्वत्ता पाहून ।। मान सर्वत्र देती त्या ।।३२।। पैठणीं ते शास्त्री पंडित मिळोन ।। विचार करिती रात्रंदिन ।। म्हणती कैसा अधम हा भानुदास कुळीं जन्मून ।। धर्म यानेचि बुडविला ।।३३।। किती सांगावे याचे अवगुण ।। श्राद्धाचिये दिवशी अंत्यजा आणून ।। ब्राह्मणा आधी त्या घालुनी भोजन ।। समाधान यातचि मानीती ।।३४।। महाराचे मूल कडेवर घेऊनी ।। पोहोंचविले काय ते त्या घरी

जाऊनी ।। दांभीकच्चि ऐसी ही दया दाऊनी ।। साधु म्हणवितो आपणा ।।३५।। तो अकस्मातचि एक कुष्टी ब्राह्मण ।। सामोरा येऊन करी नमन ।। म्हणजे मजसी ते दावाही सदन ।। नाथाचे या पैठणीं ।।३६।। महाव्याधीन पीडिलो म्हणोन ।। त्रिंबकेश्वरी केले ते अनुष्ठान ।। आराधिता गौरीरमण ।। दृष्टांत मजसी जाहला ।।३७।। प्रत्यक्ष शिव प्रगटुनी स्वप्नी ।। जारे म्हणे तूं त्या प्रतिष्ठानीं ।। नाथाशी त्या आदरे तेथे भेटुनि ।। याचना ती करीरे एकची ।।३८।। म्हणावे वाळवंटी प्रखर उन्हातून ।। अंत्यजाचे मूल कडीये घेऊन ।। पोहचविले त्याचे गृही जाऊन ।। तेवढेचि पुण्य मज अर्पावे ।।३९।। म्हणें इतके पुण्य तुज मिळाले जरी ।। कुष्ट हे जाईल क्षणाभितरीं ।। शास्त्री पंडित हे ऐकताची अंतरीं ।। आश्चर्य चकीतचि जाहले ।।४०।। क्षण एकचि पश्चात्ताप होऊन ।। दाविती ब्राह्मणाशीं नाथ सदन ।। विप्र तात्काळ तेथे जाऊन ।। दंडवत करी नाथातें ।।४१।। अंत्यज मुलाचा तो वृत्तांत सांगुनी ।। म्हणे एवढेचि पुण्य अर्पावे मजलागुनी ।। तेणे ही व्याधी जाईल निधोनी ।। दृष्टांत ऐसाची शिवाचा ।।४२।। नाथ म्हणतीं पुण्य नेणे मी किंचित ।। परी जहाला म्हणता तुम्हा दृष्टांत ।। तरी अर्पण करीतो ते पुण्य समस्त ।। आत्ताचि उदका सोडुनी ।।४३।। उदक करीं आपुल्या घेऊन ।। म्हणे मी ब्राह्मणाशी पुण्य करितो अर्पण ।। बोलोनिया ऐसे तात्काळ वचन ।। उदक ते हातीचे सोडिले ।।४४।। ऐसे सोडिताचि करीचे जीवन ।। व्याधीहीन जहाला तात्काळ ब्राह्मण ।। जयजयकारें गर्जती सकळजन ।। अधिकार नाथाचा पाहुनी ।।४५।। असो नाथाची दृष्टी समसमान ।। नेणे हा थोर अथवा यातीहीन ।। सर्वा भूतीं रूक्मिणीरमण ।।

एकसरेचि पाहती ।।४६।। योमां पश्यति सर्वत्र सर्वचे मयि पश्यति ।। उक्तिहि कैसी बिंबली नाथाचिये चित्तीं ।। दृष्टांतेचि हे सर्व तुम्हा प्रती ।। सांगेन तेचि परीयेसा ।।४७।। एकदां पाथरवटाची माणसे तीन ।। त्या माजी एक स्त्री पुरूष दोन ।। ऐशा परी ते तिघे मिळोन ।। कीर्तनीं आलीसे ऐंकाया ।।४८।। परी बसावया न मिळेचि त्या स्थान ।। शयन गृहीं मग बैसती जाऊन ।। नाथ शय्या सर्वोत्तम पाहून ।। संतोष मनस्वी जाहला ।।४९।। सहज शय्येवरी ती आडवी झाली ।। परी गाढनिद्रा तिघा लागली ।। इकडे मंगळ आरती होवूनी गेली ।। प्रसाद तोही मग वाटिला ।।५०।। प्रसाद वाटताचि सकळजन ।। तात्काळ गृही गेले निघोन ।। शय्यागृहीं तो उद्धव येऊन ।। नयनी निद्रिस्त देखिले ।।५१।। क्रोधेंचि मग उठविले तयाला ।। म्हणे लज्जा न वाटेका कांही तुम्हाला ।। कीर्तना आले की झोपावयाला ।। निघा येथुनि आताचि ।।५२।। तोचि नाथ म्हणती उद्धवाला ।। बोलु नयेंचि ऐसे कोणाला ।। मग तेथेचि निजा म्हणती त्या तिघाला ।। संकोच न करिता मानसीं ।।५३।। लज्जित होऊनिया ते तिघे जण ।। म्हणती अपराध घडला आम्हाकडून ।। क्षमा ती करावी महाराजा थोर आपण ।। निद्रावशेचि हे घडलेसे ।।५४।। मग दुसरिये दिनीं त्यां वस्त्र प्रावर्ते देऊन ।। यथासांग केली बोळवण ।। जैसे का असति आप्तजन ।। तैशा परी आदर केलासे ।।५५।। असो समभाव नाथाचियें चित्तीं ।। ऐसाची असे तो सहज रीती ।। प्रत्यक्ष गंगा एकदां गाढवाप्रति ।। प्रसंगेचि पाजिली ।।५६।। तैसाचि त्या वेश्येचा भाव पाहून ।। तिच्या गृहीं गेले नाथ होऊन ।। रामकृष्ण हरि हा मंत्र देऊन ।। कृतार्थ तिजलागी केलेसे ।।५७।। एकदां

सुजला नाथाचा गळा ।। उद्धवादि करिती उपायाला ।। तोचि माऊलींनें दृष्टांत दिधला ।। स्वप्नीं येऊनि नाथाच्या ।।५८।। म्हणे अश्वत्थ वृक्षांची मुळी ।। माझिया गळा येऊनि रूतली ।। ती तूं काढिताचि तात्काळी ।। सूज उतरेल निश्चये ।।५९।। भेटीची इच्छा प्रबळ म्हणोन ।। निमित्त केले हे त्या लागून ।। नाथहि उद्धवादिका बोलावून ।। समाचार तो सर्व सांगती ।।६०।। मुहूर्त काढुनीं उत्तम दिन ।। नाथ निघती पैठणाहून ।। समागमे असती असंख्य जन ।। भोळें भाविक सर्वहि ।।६१।। नित्य हरिकथा पुराण श्रवण ।। मार्गी होतसे रात्रंदिन ।। गावोगावीचे लोक सामोरा येऊन ।। आदर करिती नाथाचा ।।६२।। ऐशा परि मार्ग क्रमून ।। नाथ पोहोचती आळंदी येऊन ।। इंद्रायणीं समीप स्थान विस्तीर्ण ।। पाहूनी तेथेचि राहिले ।।६३।। नाना वृक्ष लतादि करूनी ।। समाधिस्थान गेले झाकोनी ।। मार्ग न दिसेची जावयालागुनी ।। देखुनी भयभीत सर्वंचि ।।६४।। नाथ समस्तां सांगती बोलावून ।। मी एकटाची येतो समाधी पाहुन ।। तुम्हीं न सोडावें आपुले स्थान ।। शांत असावे येथेचि ।।६५।। यापरीं समस्तांशीं सांगूनी ।। नाथ निघाले तात्काळ तेथूनी ।। दाट वनीं शिरता मार्ग म्हणोनी ।। कोठेही न दिसेची सर्वथा ।।६६।। आडमार्गीच तैशा दाट वनी ।। समाधिस्थान काढिले हुडकोनी ।। द्वारींचा धोंडा जो नामदेवानीं ।। लाविला तो निजदृष्टीं देखिला ।।६७।। धोंडा तात्काळ बाजूस सारूनि ।। नाथ उतरले त्या सभास्थानीं ।। प्रत्यक्ष पाहता माऊलीस नयनीं ।। परमानंद तो जाहला ।।६८।। नेत्रीं वाहती प्रेमाश्रुधारा ।। धन्य धन्य म्हणती त्या ज्ञानेश्वरा ।। भेटी देऊनिया तूं मज पामरां ।। धन्य आजी केले ।।६९।। अश्वत्थ मुळी जी गळा

रूतली ।। प्रत्यक्ष नाथाने ती दृष्टीं देखिली ।। दृष्टीं देखताची निजकरें काढिली । माथा चरणी मग ठेविला ।।७०।। तोचि माऊलीने निजकरें उठवून ।। परस्परे दिधले ते आलिंगन ।। उभयतां वाटले ते समाधान ।। गुजगोष्टी बोलती ।।७१।। इकडे नाथ शिरताचि दाट वनी ।। उद्धवादि बिऱ्हाडी येऊनी ।। तोचि चिंताग्रस्त समुदाय देखिला नयनी ।। कारण किंचित कळेना ।।७२।। भोळे भाविक सर्वची येऊन ।। उद्धवा सांगती पुढे होऊन ।। म्हणती महाराजा अन्नसामुग्री म्हणोन ।। न मिळेची येथे धुंडीता ।।७३।। वाणीयाचे न दिसे ते कोठे दुकान ।। आहे ते न देती द्रव्यावीण ।। द्रव्य आणि सामुग्री पूर्ण ।। आजी येथेचि संपली ।।७४।। समागमे असती बहुत जन ।। कैसे मिळावे इतुक्याशी अन्न ।। तो अकस्मातची एक वाणी पुढे येऊन ।। सामोरा ठाकला तेथेचि ।।७५।। उद्धवासी म्हणें तो आपण होऊन ।। कांही चिंताग्रस्त दिसती अवघेजन ।। तुमचा समुदाय हा यात्रेचा पाहून ।। येथवरी आलो मी साक्षेपे ।।७६।। कांही तो व्यवहार होईल म्हणोन ।। समागमे आणिले ते मोठे दुकान ।। तरी पाहिजे ती सामुग्री घ्यावी येऊन समस्तांलागी हे कळो द्या ।।७७।। वाणियाची ऐकता ती अमृतवाणी ।। आनंद तो जहाला सकळा लागुनी ।। परी द्रव्य ते द्यावया आणावे कोठुनी ।। विचार हाचि पडियेला ।।७८।। तोचि वाणी बोले सकळा लागून ।। पाहिजे ती सामुग्री घ्या तुम्ही येऊन ।। द्रव्य ते पाठवावे पैठणी जाऊनी ।। व्यवहार आमुचा ऐसाचि ।।७९।। श्रवणीं पडताचि वाणीयाचे बोल ।। सकळाशी वाटले त्याचे नवल ।। मग दुकानी घेती धाव सकळ ।। पाहिजे सामुग्री आणिती ।।८०।। यापरी तीन दिवस लोटले ।। परी

नाथ बाहेर नाही आले ।। चिंताग्रस्त होऊनी सगळे ।। वाट पाहती नाथाचीं ।।८१।। इकडे निरोप देता नाथा लागून ।। मनीचे इच्छीत सांगती पूर्ण ।। भावार्थ दीपिकेचे संशोधन ।। करूनिया शुद्ध प्रत करावी ।।८२।। निरोप घेताचि झडकरी ।। मस्तक ठेविले पायावरी ।। मग तात्काळ येऊनी समाधी बाहेरी ।। धोंडा पुर्ववत लाविला ।।८३।। मागुता घातिले लोटांगण ।। अश्रुपूर येती नयनांतून ।। धन्य माऊली श्री ज्ञानेश्वर म्हणोन ।। समुदायी तात्काल पातले ।।८४।। नाथ आले पाहता नयनीं ।। आनंद जहाला ।। सकळाचिये मनीं ।। लोटांगणे घालिती पुढे येऊनी । एकसरेचि सर्वथा ।।८५।। उद्धवादि म्हणती आपणा जाऊन ।। तिन दिवस जहाले पूर्ण ।। नाथ म्हणती काय सांगू मज वाटे हा एकचि क्षण ।। जाहला आजी जाऊनी ।।८६।। असो अन्न सामुग्री मिळाली कैशा रिती ।। नाथा सकळ ते होऊनी सांगती ।। धन्य म्हणती वाणी उदार चित्तीं ।। द्रव्यावीण देत सर्वचि ।।८७।। मधुर वचनें समस्ता लागून ।। म्हणे पाहिजें वस्तु जावी घेऊन ।। द्रव्य पाठवावे मागावून ।। गांवी जाता आपुल्या ।।८८।। ऐशी ऐकता विपरीत करणी ।। नाथा उमज पडला मनीं ।। मग म्हणे बोलवा आधी वाण्या लागूनी ।। हिशेब पाहु सर्वचि ।।८९।। परी जे जाती बोलाऊ म्हणोन ।। न दिसे त्या वाणी आणि ते दुकान ।। चोहीकडे त्याचा शोध करून ।। तैसेचि येती माघारा ।।९०।।ऐकुनी वाणियाची ती मात ।। आश्चर्य जकित जहाले समस्त ।। नाथ म्हणती कोण वाणी ऐसाहा समर्थ ।। माऊलीवीण प्रकार हा नसेची ।।९१।। मग उद्धवा सांगती बोलाऊनी ।। सकळ हिशेब यथार्थ पाहूनी ।। द्रव्य जितुके होईलते आणुनी ।। इंद्रायणी माजीं अर्पावे ।।९२।।

धन्य माऊली म्हणोनी तो ज्ञानेश्वर । साष्टांग घातिला तो नमस्कार ।। समुदाया समवेत मग साचार ।। पैठणी येऊनी पोहचले ।।९३।। ज्ञानेशाची आज्ञा म्हणोन ।। भावार्थ दीपीकेचे संशोधन ।। करूनिया शुद्ध प्रत ।। तात्काळ लिहून ।। ठेविली असे ती नाथाची ।।९४।। मर्यादा ठेविली ऐंसी लीहून ।। की या पुढे ओवी न घालावी कोणी ।। कालि हा शके पंधराशे सहा म्हणोनी ।। नाथाने लिहिला तो अंगेची ।।९५।। पुढील अध्यायी कथा सुरस ।। की अमृताहुनी गोड विशेष ।। वासुदेव प्रार्थी तुम्हा सकळास ।। श्रवर्णीं सादर असाकी ।।९६।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार ।*

*सप्तमोध्याय: ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय ८ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतैनमः । श्रीगोपालकृष्णायनमः । जयजयाजी लक्ष्मीरमण ।। पूर्णब्रह्म जानकीजीवना ।। भक्तरक्षका तूं पतितपावना ।। विश्वव्यापका सीतापते ।।१।। संसार म्हणजे दुःखसागर ।। विवेके पहावे या माजी सार ।। मंगळ नाम तुझे ते निरंतर ।। अंतरी सर्वदा असावे ।।२।। मग संसार दुःखाची काय ती थोरी ।। नित्य रक्षिता तूं श्रीहरी ।। किती ही संकटे आलिया जरी ।। नासुनीया जाती तात्काळ ।।३।। नाना संकटें जाती दुरी ।। परी तुझे नाम असावे अंतरी ।। दीनदयाळा तूं कंसारी ।। पुढे चरित्र बोलवी ।।४।। गताध्यायी ते जहाले कथन ।। भावार्थ दीपीकेचे ते संशोधन ।। करूनीया शुद्ध प्रत ठेविली लिहून ।। आठव मानसी असो द्या ।।५।। पुढे प्रसंग आला ऐसा घडून ।। नाथ करिती मंदिरी प्रवचन ।। अद्वैत विषय समजावून ।। सांगती एकसरेचि समस्तां ।।६।। म्हणती भिन्न भिन्न दिसती सकळ लोक । परी आत्मा त्यामाजीं असे एक । ऐसे ऐकताचि श्रोते सकळीक । ब्रह्मानंदे डुलती ।।७।। जैसे नाना अलंकार दृष्टी देखून । भिन्न भाव उपजे सकळा लागून । परी सर्वालंकारी एकची सुवर्ण । प्रत्यक्ष पाहतो आपणचि ।।८।। कवण्यापरी हे ओळखावे आपण । तरी परिसा ची तयाची खूण । नाम रूपातें द्यावे सोडून । अधिष्ठाना एकि धरावे ।।९।। अद्वैत विषय हा बहुकठीण । धर्मनिष्ठ व्हावे आधी आपण । तरीज उमजे यथार्थ ज्ञान । त्यावीण कल्पांती साधेना ।।१०।। धर्माची अंगे असती दोन । सामान्य तैसे विशेष जाण । दोहीचे मर्म चित्ती आणून । नित्य संसारी वर्तावे ।।११।। सामान्य मानावे शास्त्र

वचन । विशेष धर्म वर्णाश्रम पालन । दोहीचे करावे एकीकरण । तरीच सार्थक जन्माचे ।।१२।। ते नाथचि एक करू जाणती । इतरांची नोहेचि छाती । म्हणूनिया नाथाचा आदर्श पुढती । ठेवोनि संसारी वर्तावें ।।१३।। नाथांचे संसारी कैसे वर्तन । जरीका पुसती श्रोतेजन । तरी सांगणे आहे मज कठीण । सत्य सत्य त्रिवाचा ।।१४।। संत महिमा अनिर्वाच्य गहन । वदवितसे रूक्मिणीरमण । ऐसा विश्वास मानसीं ठेवुन । यथा स्फुर्ती सांगेन मी ।।१५।। तरी नाथांचाची तो दृष्टांत । परीसाकी तुम्ही श्रोते समस्त । ज्या योगें तुमचे शुद्धचित्त । होईल जाणा निश्चये ।।१६।। आता होऊनिया सावधान । मागील पहावे अनुसंधान । सर्वांतरी आत्मा एकचि पूर्ण । नाथ सांगती समस्तां ।।१७।। मग उंचनीच कैसी म्हणावी याती । सर्वांतरी एकचि असे श्रीपती । अद्वैत भाव ठेवोनि चित्तीं । सदासर्वदा वर्तावें ।।१८।। शास्त्राशीं न येता उणेपण । अद्वैतपणें वर्तावे आपण । तेथे साध्य असे रूक्मिणीरमण । विश्वास मानसीं असोद्या ।।१९।। अद्वैत विषयाचे निरूपण । ऐकतां श्रोते जहाले तल्लीन । विसरोनि गेले आपणा आपण । क्षण एक स्तब्ध बैसती ।।२०।। त्या माजी सात्विक श्रद्धाळू भक्त थोर । नामे त्या म्हणती राणुमहार । शुद्ध जहाले तयाचे अंतर । प्रवचन आजी ऐकतां ।।२१।। किती एक दिवसा पासोनी । इच्छा होतीं तयाचें मनी । की भोजन घालावे नाथा लागुनी । परी संशय तो होता मानसीं ।।२२।। आजीचे ऐकुनिया प्रवचन । संशय गेलासे त्याचा निघोन । आता नाथांलागी आमंत्रण । देईन म्हणे मी आजचि ।।२३।। प्रवचन होताचि संपूर्ण । श्रोत्र समुदाय गेलासे निघोन । परी राणु राहिला द्वारीच बैसून । वाट पाहे नाथाची ।।२४।। नाथ येताचि देखीले

दुरून ।। उभा राहिला कर जोडून । म्हणे महाराजां कृपा करून । कृतार्थ मजसी करावे ।।२५।। बरेच दिवसापासोनी । इच्छा होती माझियें मनीं । किं आमंत्रण द्यावे आपणा लागुनी । भोजनांलागी एकदां ।।२६।। तरी आजीचे ऐकुनी प्रवचन । निर्मळ जहाले माझें मन । म्हणूनिया घेऊनी आमंत्रण । इच्छा पुरवावी दासाची ।।२७।। राणुचे ऐकुनिया ऐसे वचन । चकित जहाले नाथाचे मन । परी शास्त्रवचन सत्य म्हणून । आमंत्रण घेतलेचि तात्काळ ।।२८।। मग राणुशीं बोलती नाथ वचन । उदयीक तुझिया घरी मी येईन । तुझे घेतले मी आमंत्रण । विश्वास ठेवीगा मानसीं ।।२९।। असो नाथ म्हणती आपुले मनीं । कैसी करावी आता करणी । जावें तरी बाधा ये वर्णा लागुनी । न जाता ये उणेपण शास्त्राला ।।३०।। म्हणती जेणें का वेद शास्त्रादि विस्तार केला । आणि आम्हां अज्ञापिले तो पाळावयाला । त्याचिया वचनाची चिंता त्याला । शिण तो आम्हासी कासयां ।।३१।। शास्त्रा परिस आमंत्रण घेतलें । कर्तव्य आमुचे येथे संपले । पुढे जें जें का आवश्यक पाहिजे केले । तें तें जाणे तो सर्वचि ।।३२।। असो राणु निज गृहीं जाऊन । निज पत्नीशी सांगे वर्तमान । उभयताचे आनंदले मन । न वर्णवेचि सर्वथा ।।३३।। मग दुसरिये दिनी प्रात:काळीं । उठोनिया कुटिका स्वच्छ केली । सडा सम्मार्जनादिती स्नाने उरकिली ।। पाक यथाशक्ती रांधिला ।।३४।। सामोरा एकचि नाथाचे ध्यान । विसरले मग आपणांशी आपण । मर्म येथीचे इतुकेचि जाण । अन्य लौकिक व्यर्थची ।।३५।। असो इकडे नित्या परी नाथ छठोन । नित्य स्नान संध्या कर्मे सारून । पंचमहायज्ञादि भोजन करून । शांत चित्तेचिं बैसती ।।३६।। तोचि नाथ आता

येतील म्हणोन । राणु वाट पाहे मनापासून । परी माध्यान्ह समय गेलासे टळोन मागुता । वाट पाहे तो सारिखा ।।३७।। मग मनीं निर्धार करोन । उभयता म्हणती येरयेरा लागून । प्राण त्याग करू म्हणती आता आपण । नाथ न येती निश्चयें ।।३८।। मग तात्काळ कुटिका घेतली लावूनी । म्हणती हो आता लावावा अग्नी । नाथ वचना लागी तो चक्रपाणी । तात्काळ तेथेचि प्रगटला ।।३९।। अग्नी लावावा जो आता म्हणती । तोचि नाथरूपे म्हणतसे रूक्मिणीपती । द्वार उघडीरे तूं सत्वरगती । उशीर मजसी जाहला ।।४०।। नाथाचे बोलते ऐकुनी । द्वार उघडिले तात्काळ येऊनी । नाथालागी ते पाटीं बैसवोनी । पूजा ती सर्व समर्पिली ।।४१।। इकडे त्याच वेळीं नाथ ते बैसून । नित्यापरी ते सांगती पुराण । राणुगृहीं ते सुग्रास भोजन । याच समयीं ते चालिले ।।४२।। वार्ता पोहचली वायुपरी कीं नाथ जेविती राणु घरीं । हलकल्लोळ जहाला पैठणा भीतरी धावाधावं सर्वचि होतसे ।।४३।। एक म्हणे ते राणुचे घरांत । जेविता देखीले मी जाऊनी तेथ । दुजा बोले ते पुराण सांगत । बैसले आताचि मंदिरी ।।४४।। शास्त्री पंडित येऊनी पाहती । तो नाथ प्रत्यक्ष पुराण सांगती । कुंठीत जहाली सकळाची मती । सत्यासत्य नुमजेची ।।४५।। यथासांग भोजन करून । बाहेर पडिला तो रूक्मिणारमण । शेला पागोटे नाथगृहीं नेऊन । खुंटीवरी ठेविले ।।४६।। राणु समाधान पाऊन । तात्काळ आला पुराणा लागून । शेला पागोटे नयनी दुरून । खुंटीवरी देखिले ।।४७।। आनंद न समाये राणुचे मनीं । ब्रह्मानंद झळके मुखावरूनी । उमजले सर्वचि नाथा लागुनी । धन्य भाग्य म्हणती राणुचे ।।४८।। असो ज्यां पाठीं असे रक्मिणीरमण । त्या न बाधेचि कदा

विघ्न । ऐसे आहे शास्त्र वचन । विश्वास मानसीं असावा ।।४९।। नाथाचाची पहा दृष्टांत । एकादश स्कंदावरी टीका मराठींत । लिहिली तेव्हा जो घडला वृत्तांत । सादर तोची परियेसा ।।५०।। पैठणीं द्विज एक होता कोणी । सात्विक श्रद्धाळु सदगुण खाणी । नाथभक्त पूर्ण हा यात्रेलागुनी । वाराणशीं गेलासे सद्भावे ।।५१।। नित्यापरी मनकर्णिकेचे घाटीं बैसून । भागवत टीकेचे करि वाचन । ते परिसताची तेथे यति दोन । येऊनीया स्वेच्छेचि बैसती ।।५२।। उभयतां यति संस्कृत पंडित । महाराष्ट्र भाषा नसे अवगत । म्हणुनिया पुसती हा कोणता ग्रंथ । वाचिता आम्हाशी कळोद्या ।।५३।। ऐकता ऐसे यतिचे वचन । नमस्कार करी त्या आधी ब्राह्मण । म्हणे मी भागवताचे करितो पठण । नित्य नेमेंचि यापरी ।।५४।। भागवत म्हणताचि उभयतां हासीले । मराठी भागवत कधी देखीले ना ऐकीले । कवणाचे हे लिखाण आम्हाशी सगळे । सांगोनी संशय फेडावा ।।५५।। ब्राह्मण म्हणे प्रतिष्ठानीं नाथ भक्त थोर । त्यांची ही टीका लिहिली भागवतावर । ऐसे ऐकताचि ते ब्राह्मणाचे उत्तर । येरयेरा माजीं ते बोलती ।।५६।। म्हणती गीरवाण भाषेचा हा अपमान । न साहेचि तो आम्हा लागून । आताचि नेऊ हो तुम्हाशीं बांधून । गुरूजवळी त्यां आमुच्या ।।५७।। मग ब्राह्मणाशीं मठीं आणून । गुरूशी करूनी आधी वंदन । साद्यंत वृत्तांत तयासी सांगून । म्हणती अपराधी येथेचि आणिला ।।५८।। ऐसे एकतांचि वृत्त सकळ । मठीं त्या जहालासे हलकल्लोळ । यति वर्गामाजी ती खळबळ । उडाली असे ती एकची ।।५९।। म्हणती केवढा असे हा अपमान । दंडावे त्या नाथाशी येथे आणून । शिष्या लागी ते मग पत्र देऊन ।

पैठणी पाठविले तात्काळ ।।६०।। मठाधिपतीचे पत्र घेऊन । प्रतीष्ठानीं आले शिष्य निघोन । नाथा लागीं तात्काळ भेटून । आज्ञा पत्र हातीं दिधले ।।६१।। यतिश्रेष्ठांचे पत्र देखून । नाथांनी केले आधी वंदन । मागुता पत्र सर्व वाचून । पुनरपि वंदन केलेसे ।।६२।। म्हणती स्वामीची आज्ञा मज प्रमाण । विश्वेश्वराचे हि होईल आम्हा दर्शन । उद्धवालागी मग बोलावून । समाचार सर्वचि कथियेला ।।६३।। वार्ता पसरली पैठणीं समस्त । आनंदले सर्वचि शास्त्री पंडित । जावें म्हणती धर्माधिकारीया त्वरीत । हितगुज सांगती एकांती ।।६४।। अधिक उणे सांगुनी त्या यतिला । म्हणावे कर्ममार्ग तो यानेंचि बुडविला । बहीष्कृत ठेऊनीया नाथाला । दंड चांगलाचि करावा ।।६५।। असो शिष्या समवेत नाथ निघती । उद्धवादि मंडळी ही सवेचि जाती । धर्माधिकारीहि समागमे असती । वाराणशी आले सर्वचि ।।६६।। शिष्य दोघे ते मठीं जाऊन । सांगती नाथांशी आलो घेऊन । मठाधिपती क्रोधे करून । आज्ञापित समस्ता ।।६७।। म्हणे न करी मी त्याचे मुखावलोकन । वस्त्रपट सामोरा बांधावा आणून । पडद्याआड ऐसाची येथे बैसून । प्रश्नोत्तर करीन मी ।।६८।। आज्ञेपरी वस्त्रपट आणून । बांधिता नाथ आले बाहेरून । नाथा पाहताचि यतिवर्ग खवळून । कुशद्बें चि नाथा बोलती ।।६९।। म्हणती संस्कृत भाषेचा अपमान । केला असे की टीका ही लिहून । पापा जोडिलेसी तूं आपण होऊन । अविचारेचि सर्व ही ।।७०।। भोग म्हणती आता पापाचे फळ । हलकल्लोळ ऐसा करिती सकळ । मठाधिपती ही दुष्ट खळ । अवेशोनी बोले क्रोधेंची ।।७१।। म्हणती या दुष्टाचे न पाहवे वदन । प्राणदंडचि द्यावा या लागून । पैठणींचा

धर्माधिकारी मग पुढे होऊन । काय बोलता जाहला ।।७२।। काय सांगुहो म्हणे मी समस्ताला । धर्म सर्वस्वी यानेची बुडविला । वेडचि लाविले त्या पैठणाला । साधु म्हणवितसे हा आपणा ।।७३।। तोंचि नाथ पुढे सरसावून । सकळां लागी करीती आधी नमन । म्हणती तुम्ही अधिकारी तुमचा शब्द प्रमाण । मान्य मज असे सर्वथा ।।७४।। परी माझी एक परीसावी विनवणी । लिहीता लिहविता असे तो चक्रपाणी । मी तो मतिमंद असे हा अज्ञानीं । दासानु दास तुमचा ।।७५।।

कैसे करावे ते शुद्ध भाषण । येवढे हि मज नसे ज्ञान । तेथे या लेखनाचा मज अभिमान । व्यर्थ कासया लाविता ।।७६।। तुमचे आज्ञापत्र शिरी वंदून । येथवर आलोसे मी चालोन । तरी स्वामीचे व्हावे ते आतां दर्शन । आस ती एवढीच मानसी ।।७७।। नाथचे ऐकताचि विनय बोल । शांत जहाले यती सकळ । मठाधिपती तो असोनि या खळ । शांत चित्तेचिं मग बोलीला ।।७८।। म्हणे आधि पहा टीका वाचून । मुळा वेगळे जरी का असे हे लिखाण । तोचि शास्त्री पंडित पुढे होऊन । संशोधन करिती ग्रंथाचे ।।७९।। संशोधन कार्य होताचि पूर्ण । म्हणती मुळावेगळे ते नसे हे लिखाण । आध्यात्म विषय हा असूनी कठीण । परी मुळावेगळा तो नसेचि ।।८०।। तोचिं एकाने टीकाग्रंथ घेऊन । भागीर्थी माजी दिधलासे फेकोन । तो तात्काळ प्रत्यक्ष भागीर्थी प्रगटून । वरचेवरी टीका धरीयेली ।।८१।। अघटित लीला ही नयनी पाहून । मठाधिपती गेला तेथे धावून । टीकाग्रंथ मग शिरी घेऊन । वाळवंटी आलासे तात्काळ ।।८२।। नाथ नामाचा करोनी गजर । म्हणती साक्षात असे हा ईश्वर । आम्ही नोळखिताचि त्याचा अधिकार । व्यर्थ छळ हा केलासे

।।८३।। मठाधिपती तात्काळ येऊन । नाथाचे दृढ धरितो चरण । नाथ त्या उठविती अंगेचि आपण । आलिंगन देती प्रीतीनें ।।८४।। यती  वर्ग तितुका आला धावूनी । तात्काल लागला नाथाचिये चरणी । म्हणती हो महाराजा क्षमा करोनी । अपराध पोटी घालावा ।।८५।।समस्तालागी ह्रदयी धरोन । नाथ करी तयाचे सांत्वन । मग करूनिया विश्वेश्वर दर्शन । मागुता मठी आले त्या ।।८६।। पुढे नाथाशी घेतले तेथेचि ठेवून । मिरवणूक काढिती हत्तीवरून । भागवत टीका ती आंबारी ठेवून । समस्त क्षेत्री मिरविती ।।८७।। शेवटी नाथाशी जयपत्र देऊन । निरोप दिधला प्रेमे करोन । निरोप मिळताची नाथ निघोन । निज गृहीं आले माघारा ।।८८।। पुढील अध्यायीं निरूपण । की केवळ असे मिष्टान्न भोजन । वासुदेव देतसे ते तुम्हा आमंत्रण । पुरविता श्रीहरि म्हणोनीया।।८९।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार ।*

*अष्टमाध्याय गोड हा ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

## ।। अध्याय ९ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतैनमः । श्रीगोपालकृष्णायनमः । जयजयाजी पंढरीनाथा । विश्वरूपधारका विश्वनाथा । आदिमायेचा तूं निजभर्ता । विश्वात्मका विश्वपते ।।१।। सत्य पाहता हे विश्वची नाही । तुजविण सर्वथा दिसेना कांही । जेवी रज्जुवीण सर्प तो सर्वथाहि । दिसणें अशक्य सर्वथा ।।२।। विश्वाभास जहाला कवणा जरी । अधिष्ठान अससी तूं तेथे श्रीहरि । विश्व ते नाहीच गातो तुं कंसारी । भाव ऐसाचि ठेवावा ।।३।। रज्जु ज्ञान जहाली यावरी । सर्प भीती न राहे क्षणभरी । तैसे तुझे ज्ञान होताचि निर्धारी । मग विश्व भासेना कल्पांतीं ।।४।। परी नाना रत्ने त्यां करोनी । दृढ असावे त्यां अधिष्ठानी । मग दुःखचि सर्वं ते जाय नासोनी । एकसरेची सर्वथा ।।५।। अधिक पाहिजे कासया वर्णन । अधिष्ठानी होय ते सर्वचि विलीन । जगन्नाथा तूं जगज्जीवन । पुढे चरित्र बोलवी ।।६।। वाराणशीचा तो मठाधिपती । शरण येऊनीया नाथाप्रतीं । सन्मान करोनीया मग नाथाप्रती । निरोप दिधला आदरें ।।७।। यापरि विजय नाथाचाचि होऊन । पैठणी आले तात्काळ निघोन । गताध्यायी एवढेचि कथन । जहाले आठव तो असो द्या ।।८।। संत संगतीचा महिमा अपार । ब्रह्मादिकाही न कळे साचार । तेथे मतिमंद मी पामर । केवीं जाणावा सहजची ।।९।। समग्र ग्रंथाचे लेखन । वदविता असे रूक्मिणीरमण । जेवी मृदंगातुनी निघे ध्वनी । परी वाजविल्याविण वाजेन ।।१०।। तैसे पाठीं बैसोनी रूक्मिणीपती । बोलवोनी लिहविले माझे हाती । मी निमित्त मात्र असे निश्चिती । सत्य सत्य त्रिवाचा ।।११।। संत संगती व्हावी

म्हणोन । नाथगृहीं राहिला रूक्मिणीरमण । तीन तपे ऐशी सहज निघोन । गेली न कळे कवणाहि ।।१२।। नाथ कीर्तनी धृपद धरोन । तप एक केले श्रीहरिने पूर्ण । दुजिया तपीं पुराण श्रवण । करूनिया काळ कंठिला ।।१३।। तिसऱ्या तपी श्रीखंड्या ब्राह्मण । होऊनी राहिला पैठणी येऊन । नाथसेवा रात्रंदिन । करूनिया राहिला स्वानंदे ।।१४।। सेवा करिता सान थोर । कधी न मानी रूक्मिणीवर । नाथाचा सर्वची परिवार । सांभाळी निजांगे श्रीहरि ।।१५।। नाथांचा परिवार किती । जरी श्रोते होऊनी पुसती । तरी विश्वची परिवार नाथ मानिती । अन्यभाव नसेची ।।१६।। व्यवहारदृष्टच्या परिवार पाहता । कन्या दोन पुत्र एक असे नाथा । गोदा गंगा हरिपंडित तत्वता । नामाभिधाने तयाची ।।१७।। हरिपंडित अति विद्वान । पित्याचे न साहे त्यां संसारी वर्तन । शब्दज्ञानी हा वाराणशीं जाऊन । राहिला आठव असो द्या ।।१८।। पुत्र असति हरिपंडिता दोन । त्यामाजी राघोबा असें लहान । संकेत एवढाची मनीं ठेऊन । समाधान यातचि मानावे ।।१९।। व्यवहार मुळी हा असत्य जाण । मग चिकित्सा का करावीं व्यर्थ आपण । प्रत्यक्ष विष्णुचा हा अवतार असोन । केवीं परिवार पहावा ।।२०।। असो यात्रेहुनी माघारी येता । नाथ भेटु म्हणती दासोपंता । आंबाजोगाईस मग पोहोचता । पंताचिये द्वारी ठाकले ।।२१।। द्वारपालासी नाथ होऊन । जावे म्हणती ती वर्दी घेऊन पंता सांगावे त्यां पैठणाहून । नाथ आले ती दर्शना ।।२२।। दासोपंत आणि अत्रिनंदन । सारीपाटामाजी होते गृहीं तल्लीन । वर्दी ती द्वारपाल सांगून । सत्वर गेलासे माघारा ।।२३।। द्वारपालाच्या ऐकुनी वचना । गडबड जहाली अत्रिनंदना । जाऊ द्या

म्हणती मग भेटू पुन्हा । अदृश्य जहाले तेथेचि ।।२४।। दासोपंता वाटले मनी । कीं नाथ केवळ संसारी म्हणुनी । केवीं दर्शन घडावे त्या लागुनी । आशय तो येवढाची येथीचा ।।२५।। मग नाथा बोलाविताचि झणीं । मस्तक ठेविले येऊनी चरणी । म्हणती कृतार्थ जहालो मी तुमचे दर्शनी । सुदिन आजीचा उदेला ।।२६।। मनीं भाविती दासोपंत यथार्थ । बोलीला हा संसारी नाथ । नित्य येऊनिया तो आत्रिसुत । भेटी देत आम्हाते ।।२७।। यासी भेटी न व्हावी म्हणोन । अंतर्धान पावला अत्रिनंदन । मग नाथ बोलती कर जोडोन । यावेजी एकदां पैठणी ।।२८।। बोलोनी ऐसी नम्र वाणी । निरोप घेतला तात्काळ तेथुनी । दासोपंत नाथाशीं तुच्छ समजोनी । येऊ म्हणती एकदां ।।२९।। पुढे कृष्णाष्टमीचा उत्सव देखून । दासोपंत म्हणती येऊ पैठणी जाऊन । नाथाने ते आधिच आमंत्रण । देऊनिय ठेविले आम्हांशी ।।३०।। अहंकारेची मग दासोपंत । प्रतिष्ठानी पोहोचले येऊनी त्वरित । नाथ द्वारी तो अनसूया सुत । प्रत्यक्ष द्वारपाल देखिला ।।३१।। चकीत होताची पंताचे मन । कर्णी सांगे अत्रिनंदन । म्हणती प्रत्यक्ष विष्णुचा हा अवतार म्हणून । सेवा करितो येथेचि ।।३२।। नाथा समीप बैसावया लागुनी । अधिकार नोहेची सेवकालागुनी । म्हणुनी अंतर्धान पावलो मी त्या दिनीं । आठव आहे कीं तुम्हा तो ।।३३।। प्रत्यक्ष ऐकता ते दत्तवचन । अहंकार गेला मुळीहून । मग दत्तचरणी मस्तक ठेवून । अपराधी म्हणे मी सर्वथा ।।३४।। म्हणे करवा आता नाथाचे दर्शन । दत्तात्रय बोले मी सांगतो जाऊन । नाथाशी कळता ते अंगेची धावून । पंताजवळी आले त्या ।।३५।। दासोपंत त्यालागी लोटांगण घालीती । नाथ निजकरें उठविती ।

आलिगंन मग देऊनी प्रीतीं । अंत:पुरी नेती प्रीतीने ।।३६।। सत्कार करितां पंताचा नाथ । सद्गदित जहाले पंताचे चित्त । किती विनय हा म्हणती मनांत । मग चरणी मस्तक ठेविती ।।३७।। दासोपंत देऊनी निरोप त्वरीत । सोहळा संपविती उत्सवाचा नाथ । तोचि उमीचंद येऊनी घरांत । काय बोले नाथाशीं ।।३८।। म्हणे हिशेब पाहुनी आजी त्वरीत । रूपये द्यावेजी सातशत । नम्रपणेचि देऊ म्हणती त्या नाथ । उपकार तुमचा असेकीं ।।३९।। उत्सव पाहा तो आतांचि संपला । तुमचे देणें देऊ तुम्हाला । अवधि थोडी द्यावी आम्हाला । कृपा समजू आपुली ।।४०।। परी नायकेची तो कोणे रिती । रूपये पाहिजे म्हणे त्वरित गती । रूपये घेतल्याविण मी निश्चिती । न जाय सर्वथा येथुनी ।।४१।। माझे रूपये दिल्यावाचून । तुम्ही न सेवावे म्हणे अन्न । अन्न सेवाल जरी ती पांडुरंगाची आण । तुम्हालागी असेची ।।४२।। शपथ घालुनिया ऐशारिती । गृहीं गेला तो सत्वरगती । नाथ बैसले सचिंत चित्ती । अंतरी काहीं सुचेना ।।४३।। यापरी लोटता दिवस दोन । तैसेचि बैसले अन्नाविण । ऐसे देखता श्रीखंड्या उठोन । उमीचंद गृहीं गेलासे ।।४४।। मध्यरात्रीच त्याशी उठवून । म्हणे घे रूपये तो कागद दे काढून । तो म्हणे मी उदयीक देईन । श्रीखंड्या म्हणें आतांचि ।।४५।। म्हणे लाज न वाटे तुजलागून । शपथ आलाशी नाथा घालून । दोन दिवस असती ते अन्नाविण । तू मात्र आकंठे जेवितोसी ।।४६।। मग द्रव्य घेऊनी कागद दिधला । प्रात:काळी तो नाथगृही आला । येऊनी नाथाचे चरणीं लागला । म्हणें क्षमा मज करावी ।।४७।। नाथ म्हणती बाप्पा तुझा उपकार । न फिटे आम्हाशी तो जन्मभर । तो म्हणे

तुम्ही पाठविले द्रव्य साचार । ते मज मध्यरात्रीं मिळाले ।।४८।। द्रव्य घेऊन मी कागद दिधला । पुसाकीं तुमच्या श्रीखंड्याला । तेणेचि एवढे द्रव्य आणुनी मला । अपरात्रीं दिधले ।।४९।। तोचि श्रीखंड्या बोले उमीचंदाशीं । बरा धरीतोसी बाप्पा मजसी । इतुके द्रव्य तुज द्यावयासी तुझ्या बापे कां मज दिधले ।।५०।। अरे मी असे दरिद्री ब्राह्मण । द्रव्य मी दिधले म्हणतोसी आणून । हे केवी पटावे आणिका लागून । पोटावरी चाकरी करितो मी ।।५१।। ऐसा संवाद ऐकुनी कानीं । चकीत जहाले नाथ मनी । पोथी सोडीता कागदचि नयनीं । प्रत्यक्ष दृष्टी देखिला ।।५२।। उमज पडला नाथाचिये मनीं । अश्रु वाहती घळाघळा लोचनीं । म्हणेरे दयाळा मी उपवासी म्हणोनी । किती लाघव केलेसे ।।५३।। नाथ म्हणती उमीचंदाला । कैसे सांगू मी आता तुला । प्रत्यक्ष पांडुरंग येऊनी भेटला । भाग्य तुझे म्हणोनिया ।।५४।। असो प्रकार हा ऐसा पाहुनी । सद्गदित जहाला उमीचंद वाणी । म्हणे जितुके कां द्रव्य माझे म्हणुनी । अर्पण चरणी केलेसे ।।५५।। म्हणे काय करू या द्रव्याला । तुमचेनि श्रीहरी मज भेटला । बोलोनिया मग ऐशा बोला । नाथ चरणी लागला ।।५६।। नाथ उठविती त्या प्रेमे करून । देऊ नका म्हणती द्रव्य आणून । तुमचे द्रव्य तुम्हीच ठेवून । परमार्थी सर्व वेचावे ।।५७।। विजय पांडुरंग असता आमुचा धनीं । काय करावे तुमचे द्रव्य घेऊनी । उमीचंदाचे मग सांत्वन करूनी । निरोप त्याशीं दिधला ।।५८।। विजय पांडुरंगाचे नाम ऐकुनी । साशंकित जरी श्रोते मनीं । तरी वृत्तांत तोची आता विस्तारोनी । सांगेन तुम्हांशी परियेसा ।।५९।। कोणे एके ती कर्नाटक प्रांती । उत्तमशि करविली पांडुरंग मूर्ती ।

स्थापनेचा सोहळा करावा प्रीती । म्हणुनिया मुहूर्त धरियेला ।।६०।। मग करोनिया सर्वचि आयती । शास्त्री पंडिता पाचारिती । उत्साह मांडिला ऐशा रिती । तो स्वप्नी दृष्टांत जाहला ।।६१।। स्वप्नी येऊनिया पंढरीनाथ । म्हणे मज पोहचवी पैठणी त्वरित । ना तरी व्यर्थ अपघात । होईल स्थापना केलीया ।।६२।। महाराष्ट्र देशीं पैठणीं । नाथाजवळी मज देई रे नेवूनी । नाथा ऐंसा भक्त या त्रिभुवनीं । पाहता न मिळेचि धुंडिता ।।६३।। सर्वस्वची त्याने मज अर्पुनी । मजलागीं केले बहुत ऋणी । म्हणूनिया वाटे मज तेथे जाऊनी । सदासर्वकाळ असावे ।।६४।। दृष्टांत ऐसा देखुनी । उद्विग्न जहाला तो गृहस्थ मनीं । उत्साह सर्वची गेला विरोनी । अंतरी काही सुचेना ।।६५।। सत्यासत्य कळेना मनीं । म्हणे कैसी करावी आता करणी । तोचि श्रीहरि मग स्वप्नी येऊनीं पूर्ववत् सांगे मागुतां ।।६६।। म्हणे इच्छिती जरी आपुले कल्याण । तरी प्रमाण मानी माझे वचन । जाऊनी नाथाचे करी दर्शन । सार्थक होईल याचेनिं ।।६७।। दृष्टांत सर्वची समस्तां सांगुनी । पैठणी आला तो मूर्ती घेऊनी । नाथालागीं मग प्रत्यक्ष भेटुनी । समाचार सर्व कथीयेला ।।६८।। परमानंद नाथाशी जाहला । स्थापनेचा तो सोहळा मांडिला । असंख्य समुदाय तो जमा जाहला । यथाविधी सर्व सारिले ।।६९।। अद्वैतपणें अन्नदान । होतसे सारिखे रात्रंदिन । कथा कीर्तनादि पुराण श्रवण । करूनिया सोहळा संपविला ।।७०।। सोहळा संपविताचि जाण । कर्नाटकीचा गृहस्थ पुढें येऊन । म्हणे महाराजा मज निरोप देऊन । विनवणी एक परिसावी ।।७१।। तुमच्या दर्शने मी आजी पावन । जहालो असे परि इच्छी मन । कीं पवित्र करावा आश्रम येऊन । कर्नाटक

प्रांती एकदां ।।७२।। म्हणे रूक्मिणीमातेची मूर्ती । घडविली असे मी याच रिती । तरी कृपा करोनी दासावरती । पदरी घ्यावें हो महाराजां ।।७३।। म्हणे बोलवा आधीं ब्राह्मणालागून । मुहूर्त काढा वेगी उत्तम दिन । वऱ्हाड तुम्ही यावे घेऊन । लग्न करू आवडी ।।७४।। मग यथा समयीं ते वऱ्हाड नेऊन । चार दिवस केला तो सोहळा पूर्ण । मग रूक्मिणी माते तें घेऊन । माघारा आले त्या पैठणीं ।।७५।। विजय कर्नाटकी जाहला म्हणून । विजय पांडुरंग म्हणती यालागून । संत महिमा अगाध पूर्ण । संकेत एवढाची येथीचा ।।७६।। असो देवाचे देणे ते कर्माधीन । ऐसे नोहे संतमहिमान । अशक्य दाविती शक्य करून । निज सामर्थ्येची आपुल्या ।।७७।। पुढील अध्यायी तेची कथन । येईल ते करावे तुम्ही श्रवण । वासुदेव प्रार्थी कर जोडून । श्रवणीं सादर असावे ।।७८।।

*इति श्री नाथालीलामृत कथासार नवमाध्याय गोड हा ।*
*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनमः हरये नमः ।।*

## ।। अध्याय १० ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतैनमः । श्रीगोपालकृष्णायनमः । जयजयाजी इंदिरावरा । परमपावना अतिउदारा । यदुकुलभुषणा यादवेंद्रा । पांडवरक्षता यदुपते ।।१।। संत भक्ताचा तूं कैवारी । होऊनी रक्षिसी त्यां निरंतरी ।। भक्त संकटे ती परोपरी । येता वारीसी त्या निजांगे ।।२।। भक्तकाज करावयासाठी । अचल उभा तूं भीमातटी । ठेऊनिया कर आपुल्या कटीं । भक्ता कारणेंसी तिष्ठती ।।३।। सांडुनी आपुले थोरपण ।। भक्तकाज करिसी रात्रंदिन । दीनदयाळा कृपे येथून । लीलामृता तूं बोलवी ।।४।। असो सिंहावलोकने करून ।। मागील पहावे अनुसंधान । पांडुरंग रूक्मिणीचे लग्न होऊन । माघारा आलेति पैठणी ।।५।। विजय जहाला कर्नाटकी म्हणून । विजय पांडुरंग म्हणती त्यालागून । गताध्यायीं जहाले निरूपण । आठव मानसीं असो द्या ।।६।। नाथाचे असे निर्मळ मन । कीं गंगेचे केवळ जीवन । विकार कैसा कधी म्हणोन । नयेचि नाथाच्या अंतरी ।।७।। ब्राह्मण एक पैठण चा येऊन । यात्रेस जातसे म्हणे आपण । एवढा परीस सांभाळा म्हणोन । सामोरा ठेविला काढुनी ।।८।। म्हणे परीसापाशीं माझा प्राण । न देववे तो आणिका लागून । अभिलाषी असती सकळजन । म्हणूनि येथेची ठेविला ।।९।। देव पाटाखाली परीस ठेविला । पहाताचि ऐसे ब्राह्मण गेला । ठेविला परीस तेथेचि राहिला । विसर पडिला नाथाशीं

।।१०।। निर्माल्य टाकीता नेऊनी । परीसहि फेकीला गंगाजीवनी । पुढे अकस्मात द्विज माघारा येऊनी । नाथाजवळी बैसला ।।११।। मनीं म्हणें तो नाथ होऊन । परीस तो देतील आपणा लागून । परी परीस न देता त्यांना निरोप देऊन । स्वस्थ चित्तेचि बैसती ।।१२।। ब्राह्मण चिंताग्रस्त जहाला मनीं ।। म्हणें अभिलाषीला हा परिस नाथानीं । कैसी करावी ती आता करणी । उपाय कांही तो सुचेना ।।१३।। दुसरीये दिनी मागुता जाऊन । आठव दिधला नाथालागून । म्हणे परीस माझा मज देऊन । टाकाकीं हो महाराजा ।।१४।। आठव होताचि नाथा लागुनी । देव्हारीं पाहतीं मग धुंडाळोनी । परी परीस न सापडे यत्नें करूनीं । काही केल्याची सर्वथा ।।१५।। परीस मिळेना ऐसे पाहुनी । मुर्च्छा आली ब्राह्मणालागुनी ।। नाथ करीती त्या सावध येऊनी । घ्यावो म्हणती परीस हा ।।१६।। शब्द पडताचि ऐसा कानी । ब्राह्मण बैसला तात्काळ उठोनी ।। नाथ गंगेवरी जाती घेऊनी । बैसा म्हणती क्षण एक ।।१७।। मग गंगेमाजी बुडी मारून ओंजळभर परीस काढीले तेथून । म्हणती तुमचा तुम्हीच घ्यावो निवडोन । म्हणोनी सामोरा ठेविती ।।१८।। विस्मित होऊनी ब्राह्मण मनीं । तात्काळ लागला नाथाचिये चरणीं ।। म्हणे हो महाराजा क्षमा करोनी । अपराध पोटी घालीका ।।१९।। ललाटी लिहिले असे जैसे । देव करीती तयाचे तैसे । परी संताचे नोहे कधी ऐसे । पाहिजे करूनी दाविती ।।२०।। कृष्णदा नामे एक सात्विक ब्राह्मण । लिहीत होता काहीं ते लिखाण । अवचीतचि तो नाथगृही येऊन । दंडवत घाली नाथा तें ।।२१।। म्हणे अपुरेचि माझे लिखाण । राहिले ते करावे तुम्हीच पूर्ण । मी जातसे ईहलोका

सोडून । अवधि किंचित नसेचि ।।२२।। लिखाण हे पूर्ण व्हावयाशी । अकरा दिवस तरी पाहिजे तयाशीं । काळ दंड असे आजचि निशी । म्हणोनिया आलो मी सांगाया ।।।२३।। नाथ म्हणती त्यां येथेचि राहून । लिखाण तुमचे ते करावे तुम्हीच पूर्ण । अकरा दिवस तुमचे ते जातील निघोन । चिंता न करावी मानसी ।।२४।। शब्द नाथांचा मोडावया प्रति । काळाचि ही नोहेचि छाती । काळ येऊनिया त्याच रिती । तैसाचि गेला तो माघारा ।।२५।। अकरा दिवस संपूर्ण । आयुष्य ब्राह्मणाशी देऊन । तयाचे त्यानेचि लिहूनी लिखाण । नाथ चरणी लागला ।।२६।। कोण्याहि मिसें करून । नाथ करिती समस्ताचे कल्याण । सर्वाभूतीं रूक्मिणीरमण । भाव ठेविती मानसीं ।।२७।। एकदा अश्वत्थ वृक्षाजवळी जाऊन । नाथ पर्णे काढीती खुडोन । तो ब्रह्मराक्षस एक सामोरा येऊन । नाथ चरणीं लागला ।।२८।। नाथाचा स्पर्श होता तयास । उद्धरून गेला तो ब्रह्मराक्षस । अमित दृष्टांत ऐसे सांगता तुम्हास । व्यर्थचि वाढेल ग्रंथ हा ।।२९।। असो प्रसन्न असता एक रूक्मिणीपती । सर्व देवता त्या पाठीं येती । म्हणूनिया ब्रह्मलिखिता त्या संत पुसती । अधिकार ऐसा हा संताचा ।।३०।। प्रत्यक्ष गंगा स्त्रीरूप घेऊन । नित्य बैसे पुराणी येऊन । नाथ पुराण तेवढे श्रवण करून । माघारा जात सर्वदा ।।३१।। तो कोणी दुराचारी संशय घेऊन । पाहु म्हणे नित्य ही स्त्री येती कोठून । काय संबंध यावया ही कोठील कोण ।। म्हणूनिया पाठीं लागला ।।३२।। जो जैसा का असे स्वये आपण । तैसे त्या भासती सकळजन । दुर्योधना दिसती जे का दुर्जन । सज्जन दिसती धर्माशी ।।३३।। असो संपताचि नाथाचे पुराण । युवती ही निघाली तात्काळ तेथून । दुष्ट दुराचारीहि तिचे

मागून । जाऊ लागला सहजचि ।।३४।। गंगेमाजी प्रवेश करूनी । गुप्त जाहली ती नितंबीनी । दुराचारी ऐसा प्रकार पाहूनी । लज्जित जाहला मानसी ।।३५।। मग तात्काळ नाथा जवळी येऊन । सांगे सकळहि वर्तमान । म्हणें हो महाराजां मी अपराधी जाण । नसता उठाठेव केलीसे ।।३६।।

दुसरिये दिनीं मग पुराणीं । आली नसे कि हो ती भामिनी । नाथ सांगती मग त्या बोलावूनी । करू नये म्हणती ऐसे मागुता ।।३७।। असो गृहीं असतां एके दिनी । गिरजा दिसे दु:खीत मनीं । पुत्र नाही जवळी म्हणोनी । उमज पडिला नाथाशी ।।३८।। नाथ म्हणती कांतेलागून । पुत्राशी आणितो मी आताचि जाऊन । मग तात्काळ तयारी करोन । मार्ग धरिला काशीचा ।।३९।। नाथ ते वाराणशी एकदां जाऊन । मागेचि आले त्या यति कारण । आता ते जाती आपण होऊन । पुत्रालागीं ते आणाया ।।४०।। वाराणशीचा मार्ग क्रमून । पोहोचताचि आधी विश्वेश्वर दर्शन । घेऊनिया मग आंगणीं येऊन । उभे ठाकले पुत्राच्या ।।४१।। पितयाशीं पाहताचि आंगणीं । परिपडीत आला धाऊनी । मीठीं घातली तात्काळ चरणीं । स्फुंद स्फुंदोनी रडतसे ।।४२।। दोन्ही बाहुते तात्काळ पसरोन । नाथ घेती त्याजवळी उचलोन । आश्रुधारा वाहती त्या नयनातून । उभयताच्या सारख्या ।।४३।। शब्द न निघेचि मुखातून । विसरोन गेले ते आपणाशी आपण । गहिंवरोन गेले उभयताचे मन । क्षण एक स्तबद्दची ठाकती ।।४४।। पिता पुत्राची होऊनी भेटी । परस्पर जहाल्या त्या सर्वची गोष्टी । नाथ म्हणतीरे राजसा आमुचे साठीं । येऊनी पैठणीं राहिका ।।४५।। माता तळमळे रात्रंदिन । मी ही जाहलो शक्तिहीन । साथ द्यावी आम्हा लागून । शेवट

गोड करीका ।।४६।। ऐकुनी पित्याचे ऐसे वचन । म्हणे तुमची आज्ञाती मज प्रमाण । परी दोन गोष्टीचे ते करावे । पालन निजकृपेंचि आपुल्या ।।४७।। नित्य पुराण मी सांगेन । तुम्ही न सेवावे परान्न । येवढेचि माझे मान्य करून । कृतार्थ मजसी करावे ।।४८।। होकार मिळताची पित्याकडून । पैठणी आले तात्काळ निघोन । गृही येताचि पुत्र पुढे होऊन । चरण वंदी मातेचे ।।४९।।

निधान सापडावे दारिद्रयाशीं । तैसे जहाले त्या मातेशी । पोटी धरूनिया मग पुत्राशी । स्फुंद स्फुंदोनी बोलत ।।५०।। म्हणे बाळा तुं येथेची राहून । आता तरी सांभाळी आम्हा लागून । या पुढे कधीही आम्हा सोडोन । जाऊ नकोरे राजसा ।।५१।। मातेचे करूनी सांत्वन । मग भेटला सकळाशीं जाऊन । आनंद जाहला तो सकळा लागून । एकसरेची सारीखा ।।५२।। पुढे हरिपंडितचि सांगे पुराण । परी नाथाचीं गोडी नये त्यालागून । म्हणूनि न येती श्रोतेगण । पुराणालागी सर्वथा ।।५३।। पुत्राशी येता यापरी दिसोन । म्हणे आपले असे कोरडे ज्ञान । पित्याचा अधिकार विलक्षण । देखुनी अनुताप जाहला ।।५४।। तैसाची सहस्त्र भोजनाचा संकल्प म्हणोन । नाथा एकट्याते घातिले भोजन । तो एका पत्रावळीखाली सहस्त्र पत्रावळी जाण । पुत्रानें निजहस्तेचि काढिल्या ।।५५।। अनुताप होऊनी हरिपंडिताला । पित्याचे चरणी तात्काळ लागला । म्हणे विद्यामदेवी या चरण सेवेला । आजवरी मुकलो असे मी ।।५६।। पुत्राचे व्हावया निर्मळ मन । प्रसंग ते आणिती नाथ घडोन । एकदां धनुर्मासा लागी आमंत्रण । द्यावे म्हणे जामाता ।।५७।। बाह्यदृष्ट्यां जामाताचे वर्तन । हरिपंडिता न आवडे मनापासून । वेश्यागृहीं असे तो रात्रंदिन । स्वानंदेची सर्वदा ।।५८।।

नाथाची ती आज्ञा म्हणून । जाऊनी सांगीतले । भोजन समयी ते समस्ता जाऊन । बोलवी हरिपंडित स्वयेचि ।।५९।। मग हरिपंडित गेला तो वेश्येच्या सदनीं । तो निद्रिस्त देखिले ते दोघे नयनी । विपरीत वाटले ते मनातुनी । परी हाक मारिली तात्काळ ।।६०।। मेहुणा उठला तो खडबडून । आलोचि म्हणे मी पूजा करून । विड्याची पाने ती तात्काळ घेऊन । वेश्येच्या स्तनीं ती ठेविली ।।६१।। नमस्कार करूनी तात्काळ निघाला । हरिपंडिता सेवेतो गृही आला । येऊनी तैसाचि तो पात्रीं बैसला । तो नाथ ते पंडिता बोलती ।।६२।। म्हणतीरे तीर्थ गंध दे त्या आणुनी । हरिपंडित गेला ते आणावया लागूनी । तो नागीलीची पानें पांडूरंग शिरी देखुनी । आश्चर्य वाटले मानसी ।।६३।। मेहुण्याचा अधिकार तो पाहून । समाधान वाटले त्या पंडिता लागून । मग नाथा ते सांगूनी वर्तमान । चरणी माथा ठेविला ।।६४।। नाथ म्हणती हरिपंडिता लागून । बाह्य दृष्ट न ठेवावी कधी आपण । जनी भरलासे तो जनार्दन । भाव तो ऐसाची ठेवावी ।।६५।। असो नाथानें जे जे ग्रंथ रचिले । ते ते सकळाशी मान्य जाहले । भागवत धर्मी त्या स्थान आगळे । मिळाले असेची सर्वथा ।।६६।। आयुष्या लागी उतार लागला । भावार्थ रामायण ते रचावयाला । प्रत्यक्ष रामचंद्र प्रभुने दृष्टांत दिधला । नाथ स्वप्नी तो येऊनी ।।६७।। परी प्रभु आज्ञाती शिरी वंदून । भावार्थचे करिती ते लेखन । अध्यात्म त्या माजी भरलेसे पूर्ण । सगुणा लागी ते रक्षुनी ।।६८।।

युद्धकांडाचे अवघे हे लिखाण । चव्वेचाळीस अध्याय ते जहाले पूर्ण । तो निर्याणाची सूचना ती अंतरातून । नाथा जाहलीसे तात्काळ ।।६९।। तोचि नाथ हे सर्व सांगती । म्हणती हो होणार

ते होईल निश्चिती ।। ऐकुनीया यापरि ते सकळां चित्ती । दु:ख अपार जाहले ।।७०।। म्हणती एवढा सर्वांग सुंदर ग्रंथ रचिला । तो अर्धवटचि आता ऐसा राहिला । तरी कृपा करूनिया ग्रंथ रचनेला । पूर्ण कराकी महाराजा ।।७१।। नाथ म्हणती सकळा लागून । माझा गावबा करीलकिं ग्रंथ पूर्ण । गावबाचे ऐकता नामाभिधान । हास्य ते जहाले सर्वंचि ।।७२।। गावबाचे कितीसे आहे ज्ञान । सकळा होते ते विदित पूर्ण । म्हणूनिया हास्य पिकले चोहीकडोन । सीमा त्या नसेचि किंचित ।।७३।। आता परिसावे ते गावबाचे कथन । हा एक मठ्ठ मती मंद असे कीं ब्राह्मण । गायत्री मंत्र हि तो त्या लागून । शुद्ध नयेची सर्वथा ।।७४।। विद्येची त्या कधी नसेचि गोडी । पुरण पोळ्यांची त्या असे आवडी । त्या मिळतील म्हणोनिया तातडी । नाथ गृहीं तो राहिला ।।७५।। परी त्याचा अंतरंग शुद्ध पाहुन । नाथ कृपा ती जाहली त्यावरी पूर्ण । याशी ते तात्काळ बोलावून । वृत्तांत तो सर्वची कथियेला ।।७६।। तोचि गावबाशी रडुं कोसळले । तैसेची नाथाचे चरण वंदिले । नाथानें ही त्या ह्रदयी धरले । प्रेमभरेचि आपुल्या ।।७७।। म्हणे चिंता न करीरे किंचित । पाठी असे तो जानकीकांत । ऐसे सांगुनी कृपेच तो हस्त । तयाच्या मस्तकि ठेवीला ।।७८।। असो नाथ स्मरण ते करूनी मनी । प्रारंभ केला तो लेखना लागुनी । पंचेचाळिसावा अध्याय पूर्ण करूनी नाथापुढे ठेविला ।।७९।। नाथ म्हणती दावीरें वाचून । गावबा तो वाची सामोरा बैसून । पूर्ण ती रचना नाथा ऐसीच पाहून । आश्चर्य वाटे ते सकळाशीं ।।८०।। या रिती हे भावार्थ रामायण । गावबानें केले ते समस्त पूर्ण । परी नाथाचेचि वाटे हे लिखाण । श्रवणीं ऐकताचि

समस्ता ।।८१।। पुढील अध्यायीं ते निरूपण । वदविता असे तो जगज्जीवन । वासुदेव असे त्या निमित्त जाण । विश्वास मानसीं असोद्या ।।८२।।

*इति श्री नाथालीलामृत कथासार दशमाध्याय गोड हा ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनमः हरये नमः ।।*

## ।। अध्याय ११ ।।

श्री गणेशायनमः । श्री सरस्वतैनमः । श्रीगोपालकृष्णायनमः ।

जयजयाजी मूरमर्दना । मन्मथ जनका मधुसूदना । गोकुळवासीया तूं नंदनदना । असुरांतका कंसारे ।।१।। तुझ्या लीला त्या अगम्य असती । ब्राह्मदिकाची हि नचले जेथें मती । तेथें मज पामराचा तो पाड किती । तुंचि पाहे पा श्रीहरि ।।२।। तुझी लीला ती जाणाया समर्थ । एक असती कीं संतमहंत । किं संतमहिमा तो तूंचि भगवंत । अंतरी जाणसी दयाळा ।।३।। म्हणूनिया लीलामृताचा वदविता । तुचि अससीगा रूक्मिणीकांता । पुढे लीलामृत ते बोलवी आता । निज कृपेंचि आपुल्या ।।४।। भावार्थं रामायणाचे जे राहिले लिखाण । गावबानेंचि केले ते समस्त पूर्ण । गताध्यायीं ते येवढेचि कथन । जहाले आठव असोद्या ।।५।। एकादश अध्याय अति सुरस । लीलामृताचा हा पूर्ण कळस । भोजनापाठी तो सुग्रास । येऊनी तृप्त असाकीं ।।६।। पुढे नाथ ते बसुनी एकांती । विचार तो करिती अपुले चित्तीं । काळ वंचना ती करू नये म्हणती । सर्वथाहि ती आपण ।।७।। विचार तो करोनी सगळा । निर्याणाचा दिवस तो निश्चित केला । उघड्यावरी मग ते होऊनी सकळां । वृत्तांत अवघाचि सांगती ।।८।। दु:खद् वार्ता ही ऐकताचि कानीं । आश्रु वाहती ते सकळाचे नयनीं । हाहा:कार तो एकची गेला होऊन । पैठण ग्रामा भितरी ।।९।। दु:खे रडती सकळजन । कोणी न बोलती कोणा लागून । कामकाज ते सर्वची सोडून । नाथ दर्शना ते येताति ।।१०।। गावो गावी वार्ता ही कळली । आप्त इष्टादि ती मंडळी आली । दु:ख सागरी ती

अवघी बुडाली । कवणा न काहीं ते सुचेना ।।११।। नाथ सकळाचे सांत्वन करीती । आल्या गेल्या ते समजाविती । म्हणती प्रपंच करूनिया ते परमार्थी । लक्ष ते सर्वदा असावे ।।१२।। ऐशी ऐकता अमृतवाणीं । खळाखळा वाहतसे लोचनीं पाणी । नाथ जाती हो आम्हां सोडूनी । बोलोनि ऐसे रडताती ।।१३।। असो निर्याणाचा तो दिवस उदेला । असंख्य समुदाय तो द्वारी लोटला । जागा न मिळेचि मग त्या मार्गाला । ठाकती दर्शना निमित्तेची ।१४।। स्नान संध्यादिकर्म सारून । नाथ ते घेती श्रीहरिचे दर्शन । स्कंधावरी मग तो विणा घेऊन । वंदन करिती प्रीतीनें ।।१५।। रामकृष्ण हरि मंत्र उच्चारूनी । द्वारी ठाकले ते तात्काळ येऊनी । अफाट समुदाय तो देखोनी नयनीं । तटस्थ ते राहिले क्षण एक ।।१६।। दृष्टी देऊनी चोहीकडे पाहिले । समस्ता लागी ते खुणाविले । म्हणती अपराध ते विसरोन आमुचे सगळे । कृपा ती असावी या पुढे ।।१७।। ऐसे बोलोनिया मार्गावरी । पाऊल टाकीले ते झडकरी । तोचि समुदाय तो लोटलासे भारी । दर्शनालागीं त्या नाथांच्या ।।१८।। किती एक ते मार्गी आडखळोन । पडती मागुता ते तैसेची उठोन । धावूनी धरिती नाथाचे चरण । भान त्या किंचित नसेचि ।।१९।। तोचि किती एक येऊनी नाथां पुजीती । पुष्पहार तैसे ते गळा घालीती । बुक्का जे उधळिती त्या नाहिच मिती । किती म्हणोनी वर्णावे ।।२०।। टाळ मृदंगाचा तो ध्वनी । गगनी गेलासे भेदुनी विठ्ठलनाम गजरे त्या दिशा भरोनी । हलकल्लोळ एकचि जाहला ।।२१।। अंध पंगुते मार्गी रडती । माय बाप आमुचा हा जातसे म्हणती । तो किती एक धरणीं त्या अंग टाकीती । हंबर्डा फोडिती किती ते ।।२२।। ऐशा परी नाथा

मिरवीत आणिले । गोदातीरी येता ते सर्वचि थांबले । तो शास्त्री पंडितादि येऊनी सगळे । नाथ चरणीं लागती ।।२३।। नेत्रीं वाहती आश्रुधारा । नाथ उठविती त्या धरूनी करां । स्फुंद स्फुंदोनी त्या नाथ शरीरां । मिठीती मारिती मागुतां ।।२४।। मुखीं न निघे तो शब्द म्हणुनी । नाथा बोलती ते स्फुंद स्फुंदोनी । म्हणती हो तुमचा तो अधिकार नेणुनी । व्यर्थ छळ तो आम्ही केलासे ।।२५।। विद्या मदेंचि आम्ही भुलोन । ओळखीले नाही ते तुम्हां लागून । परी आता काय तो अनुताप होऊन । निधान ते हातीचे चालिले ।।२६।। नाथ सकळाशी ह्रदयीं धरोन । एक सरेचि करिती सांत्वन । म्हणती हो तुमची कृपाती होती म्हणोन । सुदिन आजीचा देखिला ।।२७।। असो वाळवंटामाजी सकळां बैसऊन । नाथ करिती श्रीहरिचे कीर्तन । चोहीकडे ते होऊनिया नामस्मरण । गजर एकचि होतसे ।।२८।। नाथ सकळा लागुनी सांगतीं । नित्य आठवावा रूक्मिणीपती । त्याविण तुम्हां आम्हां नाहीं गती । सत्य सत्य त्रिवाचा ।।२९।। भूत मात्रीं आपुले नयनीं । एक पाहावा तो चक्रपाणी । द्वेषभाव तो सांडावा मुळीहुनी । तरीच सार्थक जन्माचे ।।३०।। या परी ऐकता ते निरूपण । आश्रुधारा वाहती त्या नयनातून । लोक हंबर्डा फोडिती नाथा पाहून । म्हणती देव तो आमुचा चालिला ।।३१।। सकळाच्या आश्रुपातें करोन । वाळवंट गेले ते सर्वचि भिजोन । नाथ समस्तां पुढे ते कर जोडून । काय ते बोलती मागुतां ।।३२।। म्हणती अवघे तुम्ही संत सज्जन । येवढी भिक्षाती घालावी मज लागून । भागवत धर्म तो या पुढे पाळून । कृतार्थ मजसी करावे ।।३३।। घडल्या अपराधा क्षमा करून । निरोप द्यावा तो आम्हां लागून । मग समस्तां लागी

ते करोनी नमन । नाथ ते चालिले तेथूनी ।।३४।। हळुहळू जाती ते गंगा जीवनीं ।। लोक पाहती आपुले नयनी । गेले गेले ऐसा तो उठताचि ध्वनी । नाथ ते अदृश्य जाहले ।।३५।। नाथ गंगे माजी गेले ते गेले । मागुता परतोनी नाहीच आले । गडबडा लोळती लोक सगळे । अक्रोष करूनिया तैसाची ।।३६।। शेवटी समुदाय सर्वचि परतला । आपापल्या गृहीं तो निघोनी । मनीं आठवूनिया त्या नाथ लीलेला । समाधान त्यांतचि मानिती ।।३७।। म्हणती देव तो होता आमुचे जवळी । तेव्हा कैसी पडली आम्हां भुली । आता ही तळमळ आमुची सगळी । व्यर्थ असेची सर्वथा ।।३८।। परी नाथ वचनी सदभाव ठेवून । जेका वर्तती संसारी राहून । इहपरसुख त्या दोन्ही साधून । उबय कुळांत उद्धरती ।।३९।। या लागी उद्धार व्हावया लागुनी । संत सेवक कुळीं तो असावा कोणी । ऐशी ती इच्छा धरूनी मनीं । पितर स्वर्गी ते तिष्ठती ।।४०।। संत सेवा ती घडता निश्चित । समस्त पितरते होती मुक्त । वचन ऐसे हे श्रुति संमत् । सामोरा असावे सर्वदा ।।४१।। असो साल शके पंधराशे एकविस । वद्य षष्ठी ती फाल्गुन मास । नाथ समाधी त्यां म्हणताती ।।४२।। सर्वानुमतें मग ते वृंदावन । गोदा तीरीच काढिले बांधोन । त्यावरी नाथ पादुका त्या स्थापून । नाथ समाधी त्यां म्हणताती ।।४३।। नाथ षष्ठि लागीं ते प्रतिवर्षी जाण । असंख्य येती ते भाविक जन । नित्य हरिकथा ती पुराण श्रवण । स्वानंदेची करिताती ।।४४।। असो अधिक पाहिजे कासया वर्णन । नाथाचा आदर्श पुढेतो ठेवून । प्रपंच केलिया तो परमार्थ पूर्ण । होईल जाणा निश्चये ।।४५।। आद्यापितो रूक्मिणी रमण । नाथ गृहीं वाहे तो जीवन । श्रींहरिची त्या

कावड आल्याविण । हौद तो न भरेचि सर्वथा ।।४६।। एक संवत्सर पावेतो जाण । हौदामाजी असे हे जीवन । परी ते नासले ऐसे कोणीहि म्हणोन देखिलेना कधी ऐकीले ।।४७।। अनेक तज्ज्ञानीं हे संशोधून । पाहिले पैठणी साक्षेपें येऊन । मती तयाचीती कुंठित होऊन । ईश्वरी सत्ताही ऐसेचि बोलिले ।।४८।। किती सांगावे ते संत महिमान । अंगेचि सांगे तो जगज्जीवन । म्हणे मी तो स्वयेची असे हा भक्ताधीन । सदा सर्वकाळ स्वानंदें ।।४९।। ज्यां कोणाही घडे ती संतसेवा । ती प्राप्तचि होय मज वासुदेवा । श्रुति शास्त्रे ती देती ऐसा पुरावा । एक मुखेंची सर्वदा ।।५०।। या लागी लीलामृताशी ते वरदान । देतसे अंगेचि रूक्मिणीरमण । जेणेका होय मन कामना पूर्ण । विवरण तेची परियेसा ।।५१।। नित्य घडे ज्यां लीलामृताचे श्रवण पठण । पुनरपिन होय त्यां जन्म मरण । एक अध्याय वाचिता नेमें करोन । संसार बंधन त्या घडेना ।।५२।। अथवा लीलामृताच्या पांच ओव्या सतत । नित्य श्रवण पठण घडे ज्यां श्रद्धा युक्त । तो होय तात्काळ जीवमुक्त । मागुता जन्म त्या नसेचि ।।५३।। हेहि न घडे जरी कोणाशीं । तरी ग्रंथचि ठेवावा संग्रहासी । ज्यायोगें इह पर दोन्हीं त्याशीं । सहजा सहजी साधेची ।।५४।। श्रीहरि सांगे नारदाशी । संता ऐसे सामर्थ्य नोहेचि मजसी । म्हणूनिया संतकथा परिसावयासी । आवडी मजवाटे अंतरी ।।५५।। संतमहिमा तो आहे ऐशा रिती । म्हणूनिया वरदान । दिधले ग्रंथाप्रती । श्रद्धाळु भाविक ऐसे जे असती । उद्धरती श्रवणेंचि निश्चयें ।।५६।। कलीमाजीं न होय संतभेटी। म्हणूनिया संत चरित्रें पहावी उठा उठी । फलश्रुती एकचि म्हणेतो जगजेठी । विश्वास मानसी असोद्या ।।५७।। ज्याही संतसेवा केली सतत

। त्याही बांधीला तो पंढरी नाथ । जेवी वत्साशी बांधीता नेऊनी गृहांत । धेनुये सहजची त्या हातां ।।५८।। आता सांगेन अवतरणिका । चित्त देऊनी सकळ ऐका । जेणे का ग्रंथाचा पूर्ण देखा । आठव होय मानसी ।।५९।। प्रथमाध्यायी मंगलाचरण । द्वितीयाध्यायी तो कुलीवृत्तांत पूर्ण । होऊनीया मागुती पांडुरंगासी आणून । पुनरपि पंढरीयें स्थापिले ।।६०।। नाथाचे ते बालपण । विद्याभ्यास आणि गुरूगृही गमन । नाथ परीक्षती सदगुरूनें पूर्ण । तृतियाध्यायीं केलीसे ।।६१।। पुढे दत्ताचे ते प्रत्यक्ष दर्शन । शूळभंजनी । अनुष्ठान होऊनी पूर्ण । तीर्थयात्रा ती गुरू आज्ञा म्हणून । चतुर्थाध्यायी केलीसे ।।६२।। नाथ ते पैठणीं येऊन । गृहस्थाश्रमाची ती दीक्षा घेऊन । श्रीखंड्यारूपे प्रत्यक्ष भगवान । पंचमाध्यायी सेवा करीतसे ।।६३।। भागवत धर्माचा प्रसार करूनी । भक्तिमार्गा लाविले सकळा लागुनी । तस्करा लागी दिव्य दृष्टी ती देऊनी । षष्ठाध्याय संपविला ।।६४।। सप्तमाध्यायीं नाथाचा छळ । शास्त्री पंडित ते करीती सकळ । आळंदी यात्रेचा सोहळा सोज्वळ । अष्टमाध्यायी जहालासे ।।६५।। दासोपंताचा गर्व हरण । नवमाध्यायी जहालासे पूर्ण । उमीचंदाचे ते देणें ते देऊन । एकदाची टाकीले त्या हरिनें ।।६६।। वाराणशी लागी ते जाऊन । नाथ आले त्या निजपुत्रा घेऊन । गावबाकरविं भावार्थ रामायण दशमाध्यायीं पूर्ण केलेसे ।।६७।। एकादशाध्याय पूर्ण कळस । नाथ गेले ते निजधामास । उपदेश ऐसा हा थोर सानास । देऊनी आदर्श ठेविला ।।६८।। असो ज्या श्रीहरिच्या कृपेकरून । समस्त चरित्राचे या जहाले लेखन । त्याचि या चरणीं साष्टांगे नमून । संपविला ग्रंथ येथेची ।।६९।। वदता वदविता तो श्रीहरि । इतराची असेतो काय

थोरी । व्यर्थ शंका ती न घ्यावी अंतरी । वासुदेव प्रार्थी तुम्हातें ।।७०।।

*इति श्री नाथ लीलामृत कथासार एकादशोध्याय: ।*

*श्री कृष्णार्पणमस्तु हरयेनम: हरये नम: ।।*

**- समाप्त -**

## आरती

आरती एकनाथा ।। महाराज समर्था ।। त्रिभुवनी तूंचि थोर ।।
जगदगुरू जगन्नाथा ।।धृ.।।
एकनाथ नामसार ।। वेदशास्त्रांचे गुज ।। संसार दुःख नासे
महामंत्राचे बीज ।। आरती ।।१।।
एकनाथ नाम घेतां ।। सुख वाटले चित्ता ।। अनंता गोपाळदासा ।।
धणी न पुरे गातां ।। आरती ।।२।।

श्री नाथलीलामृत या पोथीच्या प्रकाशनासाठी खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ देणगी प्राप्त झाली आहे.

श्रीमती पार्वतीबाई विश्वनाथराव नाईक (नानेगाव)
श्रीमती सुशिलाबाई दिनकरराव सहस्त्रबुद्धे
श्री. गोविंदराव लक्ष्मणराव दिवाण

।। सद्‌गुरू वासुदेव देव । ज्या नसे ज्ञानाचा अभाव ।
आडनाव शोभे देव । टेंभुर्णीकर महाराज ।। - वरद स्तोत्र

जालना येथे भास्कर वासुदेवराव देव यांच्या घरात महाराजांचा वरील फोटो व पादुकांची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. गुरूपौर्णिमेस महाराजांचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. जालना, औरंगाबाद तसेच नाशिक व खानदेशात महाराजांचा शिष्य वर्ग पसरलेला आहे. महाराजांनी हैदराबाद संस्थानात करोडगिरी खात्यात नोकरी केली. सरकारी नोकरीत असताना त्यानी अनेक संतांचे चरित्र आपल्या ओघवती, प्रासादिक व ससाळ भाषेत लिहिली आहेत. त्यांनी लिहिलेले श्री नाथलीलामृत हे श्री संत एकनाथ महाराज यांचे ओवीबद्ध चरित्र अंदाजे पन्नास वर्षापूर्वी प्रथम छापण्यात आले असावे. याची पहिली आवृत्ती शेलगाव येथील श्रीमान चुन्नीलालशेट चेचाणी यांनी प्रकाशित केली होती. त्या आवृत्तीची प्रस्तावना श्री एकनाथ संशोधन मंदिर औरंगाबादचे अध्यक्ष न्यायमूर्ती कै. बळवंतराव घाटे यांनी लिहिली होती. पैठण येथील श्री एकनाथ महाराज संस्थानचे नाथ वंशज नरहरबुवा जहागीरदार वकील यांचा त्यास अभिप्राय लाभला होता.

प्रस्तुत आवृत्तीस नाथ वाङ्गमयाच्या जेष्ठ अभ्यासक डॉ. सौ. कुमुद गोसावी यांची अतिशय माहितीपूर्ण प्रस्तावना लाभली आहे.